# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १८-०४-१९९२ ते १८-०५-१९९२**

**रजिष्टर क्र.१०**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

**शनिवार दिनांक १८/०४/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**
**शनिवार दिनांक १८.४.९२ रोजी मा. महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या अध्यक्षतेखाली अंदाजे ११.३० वाजता "वंदे मात्रम" या गिताने सभेस सुरुवात झाली.**
**या सभेस मा.आयुक्त उपआयुक्त,अधिकारी आणि खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) मा.श्री. यादव अशोक सायन्ना
२) मा.श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) मा.श्री. विधाते प्रभाकर सिताराम
४) मा.श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
५) मा.श्री. पंडागळे रतनकुमार नारायण
६) मा.श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) मा.श्री. सोनवणे केशव मनोहरराव
८) मा.श्री. भुगरे तुळशीराम छगन
९) मा.श्री. सुर्यवंशी महादेव पुडलीक
१०) मा.श्री. पाटील नरेंद्र यादवराव
११) मा.श्री. मुजिब आलमशा खान
१२) मा.श्री. प्रधान बंडु गोविंदराव
१३) मा.श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) मा.श्री. जावेद हसनखान कासिम हसनखान
१५) मा.श्री. तकीहसन खान कासिम हसनखान
१६) मा.श्री. स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
१७) मा.श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१८) मा.श्री. ओक जयवंत केशवराव
१९) मा.श्री. वंजारे विटर प्रभाकरराव
२०) मा.श्री. अ. रशिद खान (मामु)अ. हमीद खान
२१) मा.सौ. दलाल लता श्रीनिवास
२२) मा.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२३) मा.श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२४) मा.श्री. हाजी मोहमंद हफिजोद्दीन
२५) मा.श्री. छापरवाल रमेश नारायण
२६) मा.श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२७) मा.श्री. म. इस्माईल अ. करीम
२८) मा.श्री. फैय्याज खान अहमदखान
२९) मा.श्री. अलिम बेग मिर्झा कमील बेग
३०) मा.श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद
३१) मा.श्री. स. हुसैन स. अहमद
३२) मा.श्री. मगर शंकर जिजाराम
३३) मा.श्री. मानकापे नामदेवराव शामराव
३४) मा.श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३५) मा.श्री. सुग्रिम हरलाल रिडलान
३६) मा.श्री. अलफखान हुसैन खान
३७) मा.श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी

३८) मा.श्री. अजिमखान दादामियॉ अ.रहेमान
३९) मा.श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४०) मा.श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव
४१) मा.श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
४२) मा.श्री. बारवाल गजानन रामकिसन
४३) मा.श्री. गोडसे आनंद जगदिश
४४) मा.श्री. जहागिरदार अजिज मुक्तार अहमद
४५) मा.श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
४६) मा.श्री. जावळे प्रकाश शिवराम
४७) मा.श्री. गाडे गंगाधर सुखदेव
४८) मा.श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४९) मा.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५०) मा.श्री. परदेशी सुभाष शिवलाल
५१) मा.श्री. नवपुते कचरु चंद्रभान

**विषय क्र.१ :.** दिनांक १७.३.९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व दिनांक ३१.३.९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :.**

**श्री. पांडुरंग पैठणकर :.** शहरात डास व मच्छरांचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात वाढलेला असुन याबाबत प्रतिबंद करण्याच्या दृष्टीने मनपा तर्फे उपाय योजना करणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :.** सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, इतर बाबीकडे सभागृहाचे लक्ष न घालता प्रथमता इतिवृत्तावर चर्चा करावी.

**श्री. चंद्रकांत खैरे :.** स. सदस्य श्री. गजानन बारवाल यांच्या वडीलाचे दिर्घ आजाराने निधन झाल्याने सभागृहात त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा.महापौर :.** ठिक आहे. स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार सभागृहात सर्वानी ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करावी.(००.०२ मिनिटे उभे राहुन कै. रामकिसन बारवाल यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**श्री. पांडुरंग पैठणकर :.** मी यापुर्वी सुचित केल्यानुसार शहरातील डास व मच्छर यांची वाढती उत्पत्ती लक्षात घेता मनपा तर्फे कोणती उपाय योजना करणार याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :.** इतिवृत्ता व्यतिरिक्त इतर बाबीवर चर्चा करु नये.

**श्री. बंडु प्रधान :.** इतिवृत्तातील पान क्र.१५ मध्ये मागील सभेतील चर्चेनुसार आरोग्य विभागातील वर्ग.१ व वर्ग .२ चे पद भरणे बाबत सभागृहात मान्यता द्यावी.

**मा.महापौर :.** मा.आयुक्त याबाबत खुलासा देतील.

**मा.आयुक्त :.** स. सदस्यांच्या सुचनेनुसार वर्ग. २ च्या तीन पदासाठी शासनाकडून मंजुरी मिळालेली आहे. व ती पदे भरण्यात येतील तर वर्ग .१ च्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव मंजुरीस्तव पाठविण्यात आलेला आहे.

**श्री. बंडु प्रधान :.** सिडको भागामध्ये ज्या ठिकाणी २२ खाटाचा दवाखाना सुरु करण्यात आलेला आहे त्या ठिकाणी सदरचे पद भरुन कार्यरत करावे.

**मा.महापौर :.** मा.आयुक्त यांनी खुलासा केल्याप्रमाणे कार्यवाही होईल.

**श्री. मुजिब आलमशा खान :.** मागील इतिवृत्तातील पान क्र. ७ पहावे या वेळी सभागृहात पाणी पुरवठा संदर्भात माझ्या वार्डाच्या बाबतीत चर्चा झालेली होती. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी या बाबातीत अद्यापही कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

मी वारंवार सुचना करित आहे की, माझ्या वार्डातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न अतिशय चिघळत आहे आणि या ठिकाणी टाकण्यात आलेली पाईप लाईन सुध्दा चोरीला गेलेली आहे. त्यामुळे पाण्याचा पुरवठा सुरळीत होत नाही. या संदर्भात काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी. लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी सांगुन ही कामे होत नसल्यास सभागृहात बोलण्याचा अर्थच उरत नाही. यापुर्वी या भागातील विहिरीची साफ.सफाई करुन नागरिकांना पाण्याची सोय करुन देण्याबाबत सुचना केली,परंतु त्यावर सुध्दा काहीही कार्यवाही केली नाही. म्हणजे प्रशासन जाणुन बुजून असे करते काय ?

**मा.महापौर** : स.सदस्यांच्या सुचनेनुसार त्या ठिकाणची पाईप लाईन दोन वेळेस बदलण्यात आली परंतु ती फुटल्याने पुन्हा टाकण्यात आलेली होती.

**श्री. मुजिब आलमशा खान :** तेथील पाईप लाईन दोन्ही वेळेस चोरीला गेली त्यामुळे नविन पाईप लाईन पुन्हा टाकण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिक पाण्या आभावे संतप्त झ ालेले आहेत. अनेक ठिकाणी पाईप लाईन फोडण्याचे प्रकार आपलयाला दिसुन येतील. यासाठी चांगले पाईप लाईन टाकण्याचे प्रयत्न व्हावेत.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** स. सदस्यांनी सुचित केल्या प्रमाणे.

**श्री. अजिज जहागिरदार :** सभागृहात सुरुवातीस बोलत असतांना मा. महापौर व सभागृह यांच्या नावांचा उल्लेख करावा व नंतरच बोलण्यास प्रारंभ व्हावा अशी पध्दत आहे. तेंव्हा सबंधित अधिकाऱ्यांनी अशी सुरुवात करुन बोलावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.):** मा.महापौर आणि स. सभागृह स. सदस्यांच्या सुचनेनुसार त्या ठिकाणी दोन वेळेस पाईप लाईन बदलुन नविन लाईन टाकण्यात आलेली आहे. परंतु अजुनही पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्यास योग्य ती कार्यवाही पाहाणी करुन करण्यात येईल.

**श्री. मुजिब आलमशा खान :** या भागातील विहिरींची साफ.सफाई करुन लोकांना पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.

**मा.महापौर :** ठिक आहे. अशा कामाबाबत सेपरेट अंदाजपत्रक तयार करावे. परंतु त्या ठिकाणी विटाच्या भट्टया जादा प्रमाणात आहेत त्याचा उपयोग त्यांनी करावयास नको याची ख्बरदारी घ्यावी.

**श्री. बंडु प्रधान :** विकास आराखडया नुसार नविन डी.पी. रोडमध्ये बाधीत होणारी घरे यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणुन मजनुहिलच्या पायथ्याशी जी नविन वसाहत झालेली आहे. त्या ठिकाणी पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी सेपरेट अंदाजपत्रक तयार करुन कार्यवाही करावी.

**श्री. मुजिब आलमशा खान :** विहीरींची साफ.सफाई आणि पाईपलाईनची व्यवस्था होण्यासाठी अंदाजपत्रक तयार करुन कार्यवाही त्वरीत व्हावी.

**मा. महापौर :.** ठिक आहे.याबाबतीत अंदाजपत्रक तयार करण्यात येईल.

**श्री. शांताराम काळे :.** शहरातील बऱ्याचशा भागातील लोकांनी बेटरमेंट चार्जेस पुर्णपणे भरलेले असुनही त्यांना नागरी सुविधा मिळत नाही. पाणी पाहिजे त्याप्रमाणात मिळत नाही. याबाबत सबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करावी जर सबंधित नागरिकांना चार्जेस पुर्ण भरुनही., त्यांचेवर अन्याय होत असल्यास ते योग्य नाही. याचा विचार व्हावा.

**मा. महापौर :.** सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, इतर बाबीवर चर्चा करुन इतिवृत्तावरच चर्चा व्हावी.

**श्री. केशव सोनवणे :.** इतिवृत्तांतील पान क्र.३ मध्ये एखादया स. सदस्यांचा नातलग कर्मचारी म्हणून नौकरीत असल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते याबाबतचे मनपा नियमा मध्ये

वेळोवेळी अमेंटमेंट झालेल्या आहे. असा खुलासा केलेला होता. त्या अमेंटमेंटची प्रत सर्व सदस्यांना देण्याची सूचना केली होती.

**मा.महापौर :.** विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** या संदर्भात सन १९६७ मध्ये नियमामध्ये अमेंटमेट झालेले आहे. आणि त्या पुस्तिकेमध्ये आहे परंतु त्याच्या प्रति स. सदस्यांना वाटप केलेल्या नाहीत.

**श्री. केशव सोनवणे :** आम्ही आपण सुचित केल्या प्रमाणे ज्या नियमांवली मध्ये समेंटमेंट झालेले आहे त्याच्या प्रति आपल्या कडुन सर्व स. सदस्यांना वाटप करण्यास सुचित केले होते.

**श्री. चंद्रकांत खैरे :** मा. महापौर स. सदस्यांच्या सुचनेचा विचार करुन आपण सबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत.

**मा.महापौर :** पुढील सभेपर्यन्त सर्व स. सदस्यांना अमेंटमेंट संदर्भातील प्रति वाटप करावेत.

**श्री. शांताराम काळे :** या संदर्भात काही स. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यानुसार माझा एक उपप्रश्न आहे की, ज्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईक नाव बदलुन या ठिकाणी गुत्तेदारी करीत असतील तर आपण काय करणार ? किंवा स. सदस्यांचे नातेवाईक करीत असेल तर आपण काय करणार ?

**मा.महापौर :** या संदर्भात विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

**श्री. शंकर मगर :.** स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे अशा प्रकारची कायदयात तरतुद नसावी. असे मला वाटते. दुसरे असे की, मागील इतिवृत्तातील पान क्र.१८ मध्ये स. सदस्य श्री. अजिजुल्ला बेग व अलफखान यांनी सुचिवल्या प्रमाणे सन १९८६ व १९८८ चे जी.आर. च्या प्रति सर्व स. सदस्यांना वाटप कराव्या आणि तोपर्यन्त प्रस्ताव स्थगित ठेवावा त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री. अजिजुल्ला बेग :.** परंतु या सभेमध्ये जी.आर. च्या प्रति वाटप करण्यात आलेल्या नाहीत आणि त्यामुळे प्रस्ताव स्थगित आहे असा त्याचा अर्थ आहे.

**श्री. शंकर मगर :.** जोपर्यन्त संबंधित जी.आर. च्या प्रति सर्व सदस्यांना वाटप करीत नाहीत तोपर्यन्त प्रस्ताव स्थगित ठेवावा परंतु यामध्ये (ब) चा प्रस्ताव आहे त्यामध्ये कर योग्य मुल्यावर अधारित हस्तातरण शुल्क व नामांतर शुल्कचा प्रस्तावावर सर्वानुमते विचार होणे आवश्यक आहे.

**श्री. शांताराम काळे :.** स. सदस्य श्री. शंकर मगर यांनी सुचविलेल्या विचारांशी सहमत असुन सर्वानी याबाबत एकत्रीत विचार करणे आवश्यक आहे.

**श्री. शंकर मगर :.** सदरील प्रस्ताव प्रशासनाने मांडलेला आहे तर विचार करुनच प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री. अविनाश कुमावत :.** जोपर्यंत जी.आर. च्या प्रति सर्व स. सदस्यांना वाटप होत नाही तोपर्यन्त प्रस्ताव स्थगित समजावा .

**श्री. अजिजुल्ला बेग :.** प्रशासनातर्फे प्रस्ताव मांडलेला असुन या सबंधिचा खुलासा कर मुल्य निर्धारण अधिकारी देतील.

**मा. महापौर :.** मनपाने जर झोडपट्टी व अनधिकृत बांधकाम बाबत योग्य तो निर्णय घेऊन प्रस्ताव मंजुर केला तर शासनसुध्दा त्या प्रस्तावा सबंधित आवश्यक तो विचार करेल असे सचिव नगरविकास विभाग यांचेशी झालेल्या बोलणी वरुन समजले.

**श्री. अजिजुल्ला बेग :.** पुढील बैठकीपर्यन्त सबंधित जी.आर.च्या प्रति सर्व स.सदस्यांना पाठविण्यात याव्या.

**मा.महापौर** :. ठिक आहे.येत्या आठ दिवसात सर्व स. सदस्यांना जी.आर. च्या प्रति देण्यात येतील.

**श्री. अविनाश कुमावत :.** मागील बैठकीत सुचित केल्याप्रमाणे या बैठकीत जी.आर. च्या प्रति देण्यात येणार मग का देण्यात आलेल्या नाहीत.

**मा.महापौर :.** ठिक आहे. पुढील बैठकीत आपल्यासर्वांना या बाबतीत माहिती मिळेल त्यासाठी येत्या आठ दिवसा पर्यन्त जी.आर. च्या प्रति सर्व स. सदस्यांना वाटप करण्याची व्यवस्था सबंधित अधिकारी करतील.

**श्री. प्रकाश जावळे :.** माझ्या मते सदरील प्रस्ताव आजच्या बैठकीत मंजुर करण्यास काहीच हरकत नाही. कारण झोपडपट्टी भागातील बऱ्याचशा घरांना अद्यापही कर लावल्या गेलेला नाही. तेथील लोक सर्व गरीब परिस्थितीतील असुन त्यांना कोणत्याही प्रकारचा व्यवसाय सुध्दा करता येत नाही. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मंजुर करुन जी काही दुरुस्ती करावयाची असेल ती पुढील सभेत इतिवृत्त कायम करतेवेळी करण्यात यावे.

**श्री. शंकर मगर :.** स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार योग्य आहे. कारण सध्या जी.आर. च्या प्रति वाटप केलेल्या नाहीत तेंव्हा झोपडपट्टी भागातील लोकांना प्रश्न त्वरीत सुटुन मार्गी लावण्याच्या दृष्टीने प्रस्ताव मंजुर करणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :** या महिन्याच्या ३० तारखेला मागील तहकुब झालेली सभा घेण्यात येईल. याबाबत सभागृह नेता हे आपले मत मांडतील.

**श्री. अलफखान :** यापुर्वी मी सन १९८६ व १९८८ च्या जी.आर. च्या संदर्भात हवाला दिला होता. त्यांच्या प्रति सदस्यांना देण्याचा विचार व्हावा तसेच शहरातील झोपडपट्टी व अनाधिकृत घराचे बांधकाम बाबत या जी.आर. मध्ये काय माहिती आहे. त्याची माहिती मिळणे आवश्यक आहे. मुंबई मनपा मध्ये स्लम भागासाठी कोणत्या प्रकारच्या सुविधा आणि कशा पध्दतीने कामे करतात याचीही माहिती मिळण्यासाठी मागणी केलेली आहे.

**मा.महापौर :** या संदर्भात येत्या ३० तारखेला बैठक बोलवुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**श्री. केशव सोनवणे :** मागील सभेत आपण सुचित केल्या प्रमाणे एक महिन्यात रुग्णवाहिका व शववाहीका मनपाकडे येईल या बाबत अद्यापही त्या दिसुन येत नाही. याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** मी दिलेल्या आश्वासना प्रमाणे मनपातर्फे सबंधित एजन्सीला कळविण्यात आलेले आहे. आणि पत्रव्यवहार व कार्यालयीन व्यवहारामध्ये थोडाफार उशिर होण्याची शक्यता असते. यामध्ये संबंधित अधिकारी योग्य ती पाहणी करुन कार्यवाही करतील.

**श्री. प्रकाश जावळे**

**श्री. केशव सोनवणे :.** आपण सभागृहात आश्वासन असे दिले की, येत्या दोन ते तीन दिवसात शववाहिका येईल त्याप्रमाणे कार्यवाही का होत नाही ?

**मा. महापौर :** मी दिलेल्या आश्वासना नुसार कार्यवाही होत असुन याबाबत स. सदस्य श्री. जयवंत ओक यांना पुर्ण कल्पना आहे.

**श्री. मुजिब आलमशा खान :.** पान क्र.२७ मध्ये (यावेळी सभागृहात शिपाया करावी पेढे वाटप करीत असतांना अनेक सदस्यांचे प्रश्न की, पेढे कशा बदल वाटप केल्या जात आहेत ? यावेळी सभागृहात जोर जोराने बोलने चालु असते.)

**मा. महापौर :** स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, सभागृहात शांतता राखावी. कुणीही गडबड करु नये. (यावेळी पुन्हा काही स. सदस्य श्री. केशव सोनवणे,प्रदिप जैस्वाल,जयवंत ओक,गंगाधर गाडे,प्रकाश जावळे, मधुकर शिंदे, प्रभाकर विधाते, यांचे पेढे वाटपा बाबत मा. महापौरांना प्रश्न विचारणे चालु असते)

**मा. महापौर :** ००.१५ मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते.
(वेळ अंदाजे १२.०० वाजता) (सभेला सुरुवात अंदाजे वेळ १२.२५ वाजता)

**मा. महापौर :** विषय क्र.१ यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :.** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे दिनांक १७.३.९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व दिनांक ३१.३.९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण (अंदाजपत्रकिय) सभेचे इतिवृत्तांताच्या दुरुस्त्यासह कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. /२ :** औरंगाबाद मंजुर विकास योजने नुसार सं.न. ५५ सुत गिरणी गारखेडा ते पुर्वेस सं.नं. ५७५३ मधुन सिडको हद्दीपर्यन्त ८० फुट रुंद रस्त्याची आखणी केली आहे. स.नं. ५५ व ५७ च्या काही भागात या ८० फुट रुंद रस्त्याची जागा महापलिकेच्या ताब्यात आलेली आहे. स.नं. ५७ मधील श्री. मुळे व विटेकर यांचे रेखांकना पासुन देवळाईकडे जाणाऱ्या विद्यमान ८० फुट रुंद रस्त्यापर्यन्त सुमारे १२५ मी. लांबीचा रस्ता महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. व सुमारे १२५ मी. लांबीसाठी ८० फुट रुंद रस्ता भुसंपादन केल्यास जालना रोड ते गारखेडा व पुढे बीड वळण रस्त्या पर्यंत विद्यमान रस्ता उपलब्ध होईल. तरी स.नं. ५७ गारखेडा व स.नं. ५२ चा आपला भाग भुसंपादन करुन ताब्यात घेण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरी साठी सादर

**संवाद**

**मा.महापौर :** मंजुर

**श्री. अजिज जागिरदार :.** या विषया संदर्भात एक टिप्पणी पाठविण्यात आली होती. ती वेळेवर का देण्यात आली ?

**मा.महापौर :** सहाय्यक संचालक यांनी खुलासा करावा.

**सहाय्यक संचालक नगर रचना :.** मागील सभेमध्ये काही स. सदस्यांनी या प्रस्तावा बाबत सविस्तर माहिती देण्याचे सुचित केले होते. त्यामुळे थोडक्यात माहिती म्हणुन सर्व स. सदस्यांना देण्यात आलेली आहे.

**श्री. अविनाश कुमावत :.** या विषया संदर्भात दिलेल्या माहितीत थोडासा बदल दिसुन येतो. तो असा की, प्रस्तावात मंजुर विकास योजने नुसार स.नं. ५५ सुतगिरणी गारखेडा ते पुर्वेस स.नं. ५७,५३ सिडको हद्दीपर्यन्त ८० फुट रुंद रस्त्याची आखणी केली आहे. म्हणजे सं.नं. ५५ व ५३ ची माहिती मध्ये काहीही उल्लेख नाही तो कसा.

**मा.महापौर :** या प्रस्तावातील स.नं. ५७ गारखेडा या जमिनीपैकी सुमारे १२५ मी. लांबीसाठी रस्त्याचे भुसंपादन झाल्यास जालना रस्त्यापासुन सुतगिरणी पर्यन्त जो १०० फुट रुंद रस्ता आहे त्यालगत पुर्वेस स.नं. ५७ मधुन विद्यमान ८० देवळाई कडे जाणारा सदरील रस्ता जोडला जाईल असे आहे. यासाठी सदरील प्रस्ताव मंजुर करण्यास काहीच हरकत नाही.

**श्री. बंडु प्रधान :** माझ्या वार्डातील रस्ता रुंदीकरणाच्या विकास कामामध्ये १७१ लोकांचे घरे पाडण्यात आलेले होते. परंतु चंपा मस्जीद ते जालना रोडला सदरील रस्ता १०० फुटी करुन जोडण्यात आलेला नाही. याबाबत कार्यवाही व्हावी.

**टराव :.** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद मजुर विकास योजने नुसार स.नं. ५७ व ५३ मधुन सिडको हद्दीपर्यन्त ८० फुट रुंद रस्त्याची आखणी केली आहे. यामध्ये स.नं. ५५ व ५७ चा काही भाग मनपाच्या ताब्यात आलेला असुन स.नं. ५७ मधील श्री. मुळे व विटेकर यांचे रेखांकनापासुन देवळाईकडे जाणाऱ्या विद्यमान ८० फुट रुंद रस्त्यापर्यन्त सुमारे १२५ मी. लांबीचा रस्ता मनपाच्या ताब्यात नसल्याने सबंधित रस्ता भुसंपादन करुन जालना रोड व गारखेडा तसेच बीड रोड वळणाचा रस्ता यामुळे उपलब्ध होईल. करिता स.नं. ५७ व गारखेडा व स.नं. ५२ चा काही भाग भुसंपादन करुन घेण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३ :** औरंगाबाद मंजुर विकास योजने नुसार शहराच्या विविध भागात विविध रुंद रस्त्यांची खालील प्रमाणे आखणी केले आहे.

१) १०० फुट रुंद बीबी का मकबरा ते रोजाबाग
२) ८० फुट रुंद हॉटेल पंचवटी त हॉटेल नंदनवन
३) ८० फुट रुंद टॉऊन हॉल ते मकई गेट
४) ५० फुट रुंद जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंज
५) ५० फुट रुंद जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंज
६) ४० फुट रुंद जागृती हनुमान ते वसंत भुवन

वरील विकास योजना रस्त्यांचे रुंदीकरण व बांधकाम शासकिय अनुदानतुन करण्यात येत असल्याचे अतिरिक्त शहर अभियंता यांनी कळविले आहे. हे रस्ते विकास योजने नुसार पुर्ण रुंदीचे होणे आवश्यक असलेले वरील सहाही रस्त्यांच्या रुंदीकरणाने बांधीत होणाऱ्या मिळकती महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यासाठी भुसंपादनाच्या प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे भुसंपादन अधिनियम १९९४ च्या तरतुदी नुसार कार्यवाही करणेस पाठविण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव.

**संवाद**

**श्री. शंकर मगर :.** मागील बैठकीमध्ये राजाबाजार ते इंदिरानगर असा जोड रस्ता ५० फुटी रस्ता विकास आराखडयात तयार करण्यात आलेला होता. परंतु या प्रस्तावात दिसुन येत नाही. तेव्हा याबाबतची कार्यवाही कधी करणार.

**श्री. गजानन बारवाल :.** पदमपुरा भागातील हॉटेल पंचवटी ते हॉटेल नंदनवन या ८० फुट रुंद रस्त्याचा विकासा बरोबर रेल्वेस्टेशन ते प्रिन्ट्रव्हल हा १०० फुटी रस्ता विकास आराखडया नुसार त्वरीत तयार करणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :.** सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, ज्या स. सदस्यांना विकास आराखडयाच्या बाबत आपआपल्या वार्डातील संदर्भात ज्या काही सुचना मांडवयाच्या असतील त्या मांडण्यास त्याबाबत विचार करुन योग्य त्या दुरुस्त्या करण्यात येतील.

**श्री. शंकर मगर :.** राजाबाजार ते इंदिरानगर रस्ता ५० फुटी तयार करण्याच्या संदर्भात विकास आराखडयात समाविष्ठ असुन तो या प्रस्तावात दिलेला नाही.

**श्री. मो. इस्माईल :.** नवाबपुरा ते राजाबाजार हा दाट वस्तीचा भाग जास्त असल्याने हा रस्ता ५० फुट रुंदीकरण करणेसाठी त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री. मिर्झा अन्वर बेग**

**श्री. चंद्रकांत खैरे**

**अजिजुल्ला बेग :.** जुनाबाजार नेहरु भवन , देना बॅक पासुन भाजी मंडई पर्यन्तच्या बाबत अद्यापही काहीही झालेले नाही. याचे कारण काय ?

**मा.महापौर :** सहाय्यक संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**सहाय्यक संचालक**

**नगर रचना :** या संदर्भात विशेष भुसंपादन कार्यालयाकडे प्रस्ताव पडलेला असुन तो निकाली लागल्यास कार्यवाही करण्यात येईल.

**मा. महापौर :** असे विकास आराखडया बाबत मनपाचे जे प्रस्ताव पडलेले असतील त्या बाबत माझ्या सकट काही स. सदस्या यांनी स्वतः जाऊन सबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन प्रश्न सोडविण्याचे पर्यत्न करु.

**श्री. नामदेवराव मानकापे :.** जालना रोड ते चंपा मस्जीद व पुढे जिल्हाधिकारी कार्यालया पर्यन्तचा रस्ता किती दिवसात लोकांच्या रहदारीसाठी चालु होईल याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**सहाय्यक संचालक नगररचना :.** या संदर्भात भुसंपादनाचे कामे अद्याप सुरु झालेले नाही.

**श्री. पांडुरंग पैठणकर :.** जालना रोड ते जिल्हाधिकारी कार्यलयापर्यन्तच्या ८० फुटी रुंदीकरण करण्यात कैलासनगर येथुन जाणाऱ्या रोडमध्ये काही ओपन स्पेश जागा येत असून त्याबाबत कार्यवाही व्हावी. आणि रस्त्याला जोडावा.

**मा.महापौर :.** स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे कैलासनगर येथील ओपन स्पेश जागे बाबत पाहणी करुन येत्या दोन चार दिवसात त्या रोडबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. अविनाश कुमावत :.** मा. महापौर आपण दोन चार दिवसात कार्यवाही होण्याचे आश्वासन देण्यापुर्वी अगोदरच जादा कालावधी सांगावा व आश्वासना प्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. पांडुरंग पैठणकर :.** आपण आश्वासन सभागृहात मुळीच देऊ नका सबंधित कामा बाबत कार्यवाही होणे आम्हाला महत्वाचे वाटते.

**मा.महापौर :.** ठिक आहे. या संदर्भात आश्वासन यासाठी देण्यात येते की, सभागृह नेता आणि विरोधी पक्षनेता या सर्वासह प्रत्यक्षात त्या स्थळी जाऊन पाहणी करुन रोडबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे सबंधित अधिकाऱ्यांना सुचना देण्यात येतील.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :.** मकबरा येथील रोड बाबत काय कार्यवाही होणार ?

**मा. महापौर :.** १०० फुट रुंद रस्ता बीबीका मकबरा ते रोजबाग अशा प्रकारचा होणार असुन त्याबाबत लवकरच कार्यवाही होणार आहे. त्याप्रमाणे प्रस्तावातील मंजुर विकास योजने नुसार विविध रस्त्याची जी आखणी केलेली आहे. त्याप्रमाणे शहराच्या दृष्टीने योग्य असुन त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन त्वरीत कार्यवाही होण्यासाठी इतिवृत्त कायम करण्याची वाटन पाहता आजच सदरील प्रस्तावाचे इतिवृत्त कायम झाले या आधारे सर्व सबंधित कामांना त्वरीत सुरुवात करावे.

**ठराव :.** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद मंजुर विकास योजने नुसार शहराचा विविध भागात रुंद रस्त्यांचा आखणी केल्यानुसार

१) १०० फुट रुंद रस्ता बिबीका मकबरा ते रोजाबाग
२) ८० फुट रुंद रस्ता हॉटेल पंचवटी ते हॉटेल नंदनवन
३) ८० फुट रुंद रस्ता टाऊन हॉल ते मकई गेट
४) ५० फुट रुंद रस्ता नवाबपुरा (शहागंज) ते राजाबाजार
५) ५० फुट रुंद रस्ता जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंज
६) ४० फुट रुंद रस्ता जागृती हनुमान ते वसंत भुवन

सदरील रस्ते विकास योजने नुसार पुर्णपणे रुंदीचे होणे आवश्यक असल्याने या सहाही रस्त्याच्या रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या मिळकती मनपाच्या ताब्यात घेण्यासाठी भुसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे भुसंपादन अधिनियम १९८४ च्या तरतुदी नुसार कार्यवाही करण्यासाठी पाठविण्यास सर्वनुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४ :.** कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहरात जी जलनिःसारण योजना सध्या आस्तित्वात आहे तिच्या दुरुस्ती व देखभाली साठी दर वर्षी आपण लाखो रुपये खर्च करीत असतो, कारण जलनिःसारण वाहिन्या मध्ये माती, छोटे दगड, रेती, विटांचे तुकडे शेण, कापड तसेचे प्लॉस्टीकचे तुकडे विविध प्रकारचा कचराझोन मधील मजुराकडुन काढता येत नाही त्यामुळे पाईप लाईन खोदुन पाईप बाहेर काढुन स्वच्छ करावे लागतात हा प्रकार खर्चिक तर आहेच शिवाय आतिश्य वेळखाऊ व नागरिकांची गैरसोय करणारा आहे.

त्यामुळे पाईपलाईन खोदता पाईप स्वच्छ करण्यासाठी नविन प्रकारची यंत्रणा आवश्यक वाटल्यामुळे आधुनिक माशिनरी खरेदी करणेचा हा प्रस्ताव आहे.शहरातील जलनिःसारण वाहिन्यांचे चोकअप काढण्याचे काम झोनच्या मजुराकडे किंवा रेट लिस्टवर केल्या जाते. तरीही

पाहिजे त्या समाधानकारक प्रमाणात चौकअपच्या तक्रारीवर उपाय होऊ शकत नाही. त्यामुळे ड्रेनेज चौकअप न होण्यासाठी अगोदरच प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे आवश्यक आहे.

सबब मनपा साठी शासकिय अनुदान ९१.९२ मधुन सुमारे ३०.०० लाख रुपये किमंतीचे एक नगली एम्टलोअर व एक नग जेटींग रॉडर मशिन खरेदी करणेचा प्रस्ताव असुन सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

सदरील प्रकारच्या मशिन सध्या मुंबई बंगलोर कलकत्ता आदी शहरात कार्यरत असुन त्यांचे कार्य समाधानकारक आहे. तशा प्रकारचा पत्र व्यवहार संबधित महापालिकांशी केल्यावर वरील बाब स्पष्ट झाली आहे. तसेच कार्यकारी अभियंता उप अभियंता व एक शाखा अभियंता यांनी नुकतीच मुंबई महापालिका येथे भेट देऊन सदरील प्रस्तावीत मशिनीची कार्य प्रणाली ही समक्ष पाहिली आहे. त्या ठिकाणी ही मशिनरी समाधानकारकरित्या वापरात येते असल्याचे आढळुन आले. औरंगाबाद मनपा साठी सुध्दा सदरील प्रकारची मशिनरी उपयोगी सिध्द होईल, असा विश्वास वाटतो.

सदरील मशिनरीची थोडक्यात माहिती खालील प्रमाणे

१) रॉडीग मशिन/ जेटींग युनिट :

सदरील मशिनरी एक चार चाकी ट्रक चोसिसवर बसविलेला असते तसेच सोबत सुमारे नऊ हजार (९,०००/.) लिटर्स क्षमतेची मोठी पाण्याची टाकी देखील सोबत बसवलेली असते, या टाकीतील पाण्याच्या सहाय्याने अतिश्य दाबाने म्हणजेच ८०० पॉडस प्रति चौरस इंच ते २००० पॉडस प्रति चौरस या दाबाने पाईप जेटच्या सहाय्याने जलनिःसारण वाहिनीतील माती, रेती, इत्यादी अडकलेल्या व गच्च बसलेल्या वस्तु ढकलुन मोकळया केल्या जातात व त्यामुळे पाण्याचा प्रवाह मोकळा होतो.

२) गली एम्टटोअर :.

सदरील मशिनरी एका चार चाकी ट्रक चौसिसरवर बसलेली असते तसेच सोबत सुमारे १०,०००/. (दहा हजार) लिटर्स क्षमतेचा स्लडा टॅक बसवलेला असतो. यात जेटींग रोडरने ढकलुन मोकळा केलेला गाळ, रेती, किंवा छोटे दगड सुध्दा शोषुन घेण्यासह व्यवस्था असते. जलनिःसारण वाहिनीच्या तोंडाशी पाईप लावुन कॉम्प्रेसरच्या सहाय्याने रेती,शेण, माती, विटाचे व दगडाचे छोटे तुकडे खेचुन ते स्लडा टॅक मध्ये जमा केल्या जातात.

तरी सदरील प्रस्तावास मंजुरी मिळाल्यास अशा प्रकारची मशिनरी तयार करणाऱ्या कंपन्याकडुन दरपत्रके मागविण्यात येतील. तरी एक नग जेटींग रॉड मशिन व एक नग एम्पटीअर मशिन खरेदी करण्याच्या प्रस्तावास कृपया मंजुरी मिळावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद :.

**श्री. अलफखान :.** सदरील प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे ड्रेनेजची योग्य ती व्यवस्था होण्यासाठी आधुनिक मशिनरी खरेदी करण्यासाठीचा विचार योग्य आहे. परंतु या शहरातील छोटे.छोटे भाग आणि लहान लहान वस्त्या मध्ये या आधुनिक मशिनरीचा उपयोग कितपत शक्य होईल. याचा ही विचार होणे आवश्यक आहे. निवळ मशिनरी खरेदी करणे व पैसा खर्च करणे योग्य नाही.

**श्री. शांताराम काळे :.** या सदर्भात सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा . म्हणजे थोडक्यात सर्वांना माहिती कळु शकेल.

**मा. महापौर :.** सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता पा. पु. :.** १) रॉडींग मशिन/ जेटींग युनिट सदरील मशिनरी चार चाकी ट्रक चौसिसवर बसविलेली असते व सोबत सुमारे नऊ हजार लिटर्स क्षमतेची मोठी पाण्याची टाकी असल्याने टाकीतील पाण्याचा प्रेशर प्रति चौरस इंच २००० पौडस या दाबाने पाईप जेटच्या सहाय्याने जलनिःसारण वाहिनीतील माती, रेती,इत्यादी अडकलेल्या व गच्च बसलेल्या वस्तु ढकलुन मोकळया केल्या जातात. त्यामुळे प्रवाह मोकळा होतो.

३) गली एम्प्टीअर :.

सदरील मशिन जेटींग रोडरने ढकलुन मोकळा केलेला गाळ,रेती,किंवा छोट.छोटे दगड सुध्दा शोषुन घेण्यासह व्यवस्था असते .काही पाईपमध्ये बोळे वगैरे असल्यास त्या प्रशरने साफ केल्या जाते या बाबत प्रत्यक्षात आम्ही जाऊन पाहणी केलेली आहे. त्यामुळे याची कल्पना मशिनरीचे कार्याचे महत्व आम्हाला पटलेले आहे. करिता अशा आधुनिक मशिनरीचा उपयोग शहराच्या ठिकाणी करणे रास्त आहे.

**श्री. अलफखान :.** ठिक आहे. आधुनिक मशिनरी घेण्यास आमचा विरोध नाही. परंतु या मशिनरीचा दुरुपयोग होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :.** अशा प्रकारचे मशिनरी विकत घेण्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे. आणि ही मशिनरी शहरातील लहान लहान भागातील ड्रेनेजची कामे सुरळीत करु शकणार नाही.

**श्री. म.इस्माईल :.** जिन्सी भागातील बऱ्याचशा ठिकाणी नाल्या व ड्रेनेज लाईनला जोडलेल्या नाहीत त्यामुळे इतरत्र ठिकाणी घाण साचलेली असते. व दुर्गधी पसरते तेंव्हा तेथील नाल्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असुन ड्रेनेज लाईन मधुन योग्य ती सफाई करण्यासाठी या प्रस्तावातील मशिनरीसाठी रुपये.३०.०० लाख अपेक्षित खर्च आहे. व ती मशिनरी विकत घेतल्यास त्याचा सर्वत्र फायदा होईल.

**श्री. रशिद मामु :.** सदरील मशिनरी विकत घेण्यापुर्वी व मशीन व्यवस्तीत रीत्या आपरेट करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी आसणे आवश्यक आहे.

**सौ. लता दलाल :.** यापुर्वी आमच्या माहिती प्रमाणे अशाच प्रकारची मशीनी मनपाने खरेदी केलेली होती परंतु कर्मचारी पुरेसे प्रशक्षित नसल्याचे त्याना व्यवस्थीत चालवीता येत नव्हती व ती मशीन पुढे बंद पडली तेंव्हा स. सदस्य श्री. रशीद मामु यांनी सुचित केल्या प्रमाणे सदरील मशीनरी चालवण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारांणे असेच आवश्यक आहे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु) :.** सदरील सदस्यांना सुचीत केल्या प्रमाणे मुंबई मनपाकडे अश्या मशीनवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण देण्यास पाठविण्यात येईल.

**श्री. शंकर मगर :.** या मशीनचा झोपडपट्टी भागातील छोटया वस्त्याना फायदा होणार नसुनही सदरचा प्रस्ताव मंजुर करावा तसेच माझ्या वार्डात सहा इंची ड्रेनेज पाईप लाईन टाकण्याची त्वरीत कार्यवाही व्हावी.

**श्री. बंडु प्रधान :.** शासनाने नुकतेच भंगी मुकी साठी योजना आखलेली असुन त्या योजनेची आमलबजावनी होण्याच्या दृष्टीने सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा. महापौर :.** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :.** प्रस्तावत दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद शहरातील जलनि:सारण योजने वर दरवर्षी लाखो रुपये खर्च करुन ड्रेनेज लाईन वेळोवेळी बदलली जाते.

त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत वेळ वाया जातो त्यामुळे पाईप न खोदता पाईप स्वच्छ करण्यासाठी नविन मशीनरी ही आधुनिक असुन जलनि:सारण वाहिन्याचे चेकअपचे तक्रारीवर उपया योजना म्हणुन १) रॉडींग मशीन एक २) नविन अेस्टीअर एकआशा प्रकारच्या मशीनरी तयार करण्याचा कंपन्या कडुन (उदा मुंबई , बैगलोर कलकत्ता इत्यादी) शहरात कार्यरत असुन आशा प्रकारच्या मशिनरीची किंमत रुपये ३०.०० लाख दोन्हीही मिळुन मनपा साठी शासकिय आनुदान सन १९९१.९२ खरेदी करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

# पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. १३७/५ :.** वॉर्ड क्र. ३५ न्यु कॉलनी मियाभाई १) ले आऊट सि. नंबर ३९२ श्री. शेख बॉयालार्जस्ट मनपा यांच्या घरा समोररुन जाणारे २० फुट रुंद रस्ता रोशन गेट रोडला मिळणे बाबत.

**सुचक** : श्री. मोहसिन अहमद
**अनुमोदक** : श्री. प्रकाश जावळे
: श्री. विठ्ठल पेरकर
**दिनांक** **:** १४.२.९२.

२) आयुक्ताचे.. सहायक याचे पगारात वाढ करण्यापुर्वी सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात आलेली नाही. त्या संबंधी विचार व्हावा.

**सुचक** : श्री. मोहसिन अहमद, श्री. विठ्ठल पेरकर
**दिनांक** : १४.२.९३.

**संवाद**
**श्री. प्रदिप जैस्वाल :** सदरील अनुमोदक नाहीत प्रस्ताव रद्द करावा.
**मा. महापौर :** सदरील प्रस्ताव स्तगित ठेवण्यात येतो.
**श्री. मोहसिन अहमद :** सबंधित प्रस्तावाचे अनुमोदक असुन प्रस्तावावर चर्चा व्हावी.
**मा.महापौर :** सभागृहात अनुमोदक नाहीत त्यामुळे प्रस्ताव रद्द.

**ठराव :.** प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १३८/६ :.** प्रभाग क्र. ५३ आंतर्गत सेवार्थ विविध मोहिल्यात समाज मंदिर सार्वजनीक वाचनालयच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, मंगल कार्यालय नाही. या इमारती बांधण्यासाठी सन १९९१ मध्ये माजी आयुक्त यांचे सोबत पूर्ण वसाहती प्रत्यक्ष स्थळी पाहणी केली असता असे निदर्शनास आले की, या मोहल्ल्यात महापालिके मार्फत वरील कोढल्याही सुविधा पुरविलेल्या नाहीत त्या माजी आयुक्तानी सुध्या बजेट नाही. सदरील कामे पुढील वर्षाच्या बजेट मधुन करण्यात येतील असा अभिप्राय दिलेला आहे.

तसेच सदर कामाबाबत मी गेल्या दोन वर्षा पासुन प्रशासना पुढे पाठपुरावा करत आहे. परंतु प्रत्येक वेळा सध्या बजेट नाही त्यामुळे ही सर्व कामे पुर्ण होऊ शकली नाही. करीता वरील सर्व कामासाठी सन १९९२/९३ चे अर्थसंकल्पात रुपये १० लाखाची तरतुद करणे स्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**सुचक :.** श्री. अजिज जहागिरदार
**अनुमोदक :.** श्री. नारायण फत्तेलष्कर
श्री. चेनकरण संचेती
**दिनांक :.** १५.२.९३.

श्री. अजिज जहागिरदार : वॉर्ड क्र. ५३ अंतर्गत येणाऱ्या विविध मोहल्ल्यात समाज मंदिर सार्वजनिक वाचनालय प्राथमिक आरोग्य केंद्र व मंगल कार्यालय नाही या संदर्भात माजी आयुक्त पाहणी करुन चर्चा झालेली आहे. त्या नुसार या प्रस्तावास मंजुरी द्यावी.

**मा. महापौर :.** सदरचा प्रस्ताव नसुन तो आपण प्रशासनाकडे पाठपुरावा करुन कार्यवाही करण्यास सांगावे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :.** प्रस्ताव परत घेण्याची सुचना द्यावी.

**मा. महापौर :.** सदरील प्रस्ताव रद्द करुन या प्रस्तावा बाबतची प्रशासनाने कार्यवाही करावी. व तसे स. सदस्यांना कळवावे.

**ठराव :.** सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १३९/७ :.** सुप्रसिध्द पहेलवान व सामाजिक कार्यकर्ते लखन पहेलवान यांच्या नावाने जाधवमंडी येथे व्यायाम शाळा काढण्यात यावी या करिता जाधवमंडी येथे जागा उपलब्ध आहे.

सुचक . श्री. बंडु प्रधान
अनुमोदक . श्री. पी. बी. पैठणकर
दिनांक . ०७/०३/९२

**मा. महापौर :** प्रस्तावास विरोध नसुन जागा नेमक्या कोणत्या ठिकाणी आहे. ते दाखवावे.

**श्री. बंडु प्रधान :.** जाधवमंडी येथे जागा उपलब्ध असुन त्यांची पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री. धनंजय गंगाखेडकर :.** या प्रस्तावा संदर्भात असा निर्णय द्यावा की त्या संबंधित ठिकाणी जागा उपलब्ध नसल्यास नगर रचना विभागाने पर्यायी व्यवस्था करावी परंतु सदरचा प्रस्ताव मंजुर करावा.

**मा. महापौर :.** ठिक आहे प्रस्तावातील स्थळ दर्शनानुसार ती जागा मनपा कडे उपलब्ध कै. लखन पहेलवान यांच्या नावाने व्यायाम शाळा काढण्यास परवानगी देण्यात येते.

**ठराव :.** प्रस्तावात दर्शवील्या प्रमाणे सुप्रसिध्द पहेलवान व सामाजिक कार्यकर्ते यांच्या नावाने मनपाची जागा उपलब्ध असल्यास व त्या ठिकाणी कोणताही वाद नसल्यास त्या ठिकाणी व्यायाम शाळा काढण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४०/८ :.** मागील सर्व साधारण सभेने औरंगाबाद महानगरपालिकेत २०० सफाई मंजुराची भरती करण्यास सर्वानुमते मंजुरी दिलेली आहे. सफाई मंजुरांची भरती करताना जेष्ठता यादी नुसार मंजुरांची भरती करण्यात यावी. जेष्ठता यादीची पडताळणी तपासणी करण्यात यावी. ज्या मंजुरानी खरोखरच या पुर्वी दैनिक वेतनावर काम केलेले आहे अशा मजुरांची नावे जेष्ठता यादीत ठेवुन बोगस नावे रद्द करण्यात यावी. जेष्ठता यादी दुरुस्त करण्यात यावी नौकरीची नितांत गरज आहे अशा गरीब व कष्टाळु व्यक्तींना सफाई मंजुर अथवा मंजुरीन म्हणुन नौकरी देण्यात यावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**सुचक** . श्री. नारायण फत्तेलष्कर
**अनुमोदक** . श्री. प्रदिप दत्त, श्री. प्रदिप जैस्वाल
**दिनांक** . ९.३.९२.

**श्री. अजिजुल्ला बेग :.** प्रत्येक वॉर्डातील स. नगरसेवकाचे काही सुचना असल्यास त्याच्या प्रमाणे रोजदारी वरील कर्मचाऱ्यांचे नावे यादीत समाविष्ट करावे.

**मा. महापौर :** ठिक आहे. जसजश्या जागा उपलब्ध होतील तसतसे रोजदारी वरील कर्मचाऱ्यांना सेवेत जेष्ठते नुसार समाविष्ठ करण्यात येतील त्या नुसार प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**श्री. नामदेवराव मानकापे :.** गेल्या तीन वर्षापासून जे मजुर काम करीत आहे त्याना नौकरीत समाविष्ठ करण्यात यावे.

**मा. महापौर :.** ठिक आहे. जसजशा जागा उपलब्ध होतील तसतसे रोजदारी वरील कर्मचाऱ्यांना सेवेत जेष्ठते नुसार समाविष्ठ करण्यात येईल. त्या नुसार प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :.** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे २०० सफाई मजुराची भरती करणेस या पुर्वीच मंजुरी दिलेली आहे. त्या प्रमाणे पुर्वीच्या जेष्ठता यादी नुसार यादीची पडताळणी करावी. व बोगस नावे रद्द करावे. आणि जेष्ठता यादी दुरुस्त करुन घरातील कुणीही व्यक्ती शासकिय सेवेत नाही व

नौकरीची ज्यांना नितांत गरज आहे. अशा गरीब व्यक्तीना सफाई मजुर अथवा मजुरीन म्हणुन नौकरी देण्यात यावी. सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४१/९ :.** औरंगाबाद सारख्या ऐतिहासीक प्रसिध्द शहरी क्रिडा प्रेमी साठी स्टेडियम साठी जागा उपलब्ध करुन देणे महापालिके तर्फे तसेच चालु वर्षात १९९२.९३ च्या अर्थ संकल्पात बांधकामासाठी तरतुद करण्यात यावी.

सुचक . श्री. मोहसिन अहमद
अनुमोदक . श्री. मिर्झा आलिम बेग
दिनांक . १०.३.९२.

**मा. महापौर :.** क्रिडाप्रेमीसाठी स्टेडियमसाठी जागा उपलब्ध करुन देवुन बांधकाम करण्याच्या तरतुदी साठी अंदाज पत्रकात सन १९९२.९३. साठी तरतुद केलेली आहे विचार करणे ठिक नाही.

**ठराव :.** या प्रस्तावाचे संदर्भात सन १९९२.९३. चे अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे त्या प्रमाणे कार्यवाही होईल.

**विषय क्र.१४२/१० :.** औरंगाबाद महापालिकेचे क्षेत्र विचारात घेता महापालिका कार्यालयीन कामकांजात दिवसेंदिवस कामाचा बोजा वाढत आहे. आशा पंरस्तीतीत महापलिका अस्थापनावर वरिष्ठ लिपिक पर्यन्त कार्यालयान अधीक्षक व सहाय्यक करण्याची विभागीय अधिकारी यांच्या काही जागा निर्माण करण्याची महापलिकेच्या विचाराधीन आहेच त्या अनुषंगाने गत स्थायी समिती सभेमध्ये याबाबद विषय आलेला आहे.

औरंगाबाद महापालिका वरिष्ठ लिपीक कार्यालयीन अधीक्षक विभागीय अधिकाऱ्यांची नविन पदे निर्माण करताना महापालिकेचे सेवा भरती नियम अद्याप मंजुर झालेले नसल्यामुळे ही पदे बाहेरील उमेदवाराकडुन न भरता या पदावर महापलिका कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादी नुसार पदोंन्नती देवुन ही पदे भरण्यात यावी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक . श्री. प्रदिपकुमार जैस्वाल
अनुमोदक . श्री. केशव सोनवणे
दिनांक . १०.३.९३.

**श्री. प्रकाश जावळे :.** या प्रस्तावाच्या संदर्भात ज्या कर्मचाऱ्यांना आपण जेष्ठता यादी नुसार जर पदोन्नती देणार आहोत तर त्यांच्या रीक्त झालेल्या पदावर आपण काय करणार आहोत याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** सहाय्यक आयुक्त यानी खुलासा करावा.

**सहाय्यक आयुक्त :.** एकुण १७ वरिष्ठ लिपीकांची जेष्ठता यादी नुसार त्याना सहाय्यक अधीक्षक या पदावर त्याचे संदर्भातुन पदे भरण्यात येतील.

**मा. महापौर :** मंजुर.

**ठराव क्र. १४२/१० :.** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे महानगरपालिका कार्यालयीन कामकाजात दिवसेंदिवस कामाचा बोजा वाढत आहे त्यादृष्टीने गत स्थायी समिती मध्ये या बाबत विषय चर्चात आला. या अनुषंगाने मनपात वरिष्ठ लिपीक. कर्मचाऱ्यांना अधिक्षक व /विभागीय अधिकाऱ्यांची नविन पदे निर्माण करतांना महापालिकेचे सेवा भरती नियम मंजुर झालेले नसल्याने ही पदे बाहेरील उमेदवाराकडुन न भरता या पदावर मनपा कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादीनुसार पदोन्नोती देऊन त्यांचे संर्वगातुन पदे भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी....

**विषय क्र.१४३/११ :.** औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील ओखार्ड कंपनी समोर सिडको येथे असलेली २६ एकर जागा महानगरपालिकेने क्रिकेटचे मैदानासाठी राखुन ठेवलेली आहे. ही क्रिडा सकुलाची जागा अद्याप तशीच पडुन असल्यामुळे या जागेवर क्रिकेटचे अद्यावत व सुसज्ज असे मैदान तयार करणे आवश्यक आहे. औरंगाबाद शहरात क्रिकेट खेळासाठी कुठलेही मैदान उपलब्ध नाही. त्यासाठी खेळाडुची मागणी लक्षात घेता या मैदानाचा क्रिकेट खेळाडुसाठी उपयोग होण्यासाठी या जागी अद्यापत सुसज्ज व प्रशस्त असे क्रिकेटचे मैदान तयार करण्यात यावे. जेणे करुन त्याचा उपयोग स्थानिक क्रिकेट पटूसाठी होईल. तसेच या शहरात क्रिकेट खेळाडू तयार होतील. जागी क्रिकेटचे मैदान त्वरीत विकशीत करणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक . श्री. प्रदिपकुमार जैस्वाल
श्री. महादेव सुर्यवंशी
अनुमोदक . श्री. केशव सोनवणे
दिनांक . १०.३.९३

**संवाद**

**मा.महापौर :** मंजूर

**ठराव :.** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील कंपनी समोर सिडको येथे असलेली २६ एकर जागा जी मनपाने क्रिकेट मैदानासाठी राखुन ठेवलेली आहे. या जागेवर क्रिकेटचे अद्यापत सुसज्ज असे मैदान तयार करुन क्रिकेट खेळाडुसाठी मैदान उपलब्ध करुन विकशीत करण्या बाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४४/१२ :** मो. नारेगांव प्रभाग क्र.(९) येथे गेल्या २०.२५ वर्षापासुन नारेगांवच्या पुर्वेस असलेली स्मशान भूमी अधिकृत रित्या स्मशान भुमी म्हणुन घोषित करण्यात यावी. सदर स्मशान भुमीत संरक्षित भिंत ऊभारण्यात यावी. स्मशान भुमीत रोड बाधण्यात यावे. जेणे करुन या भागातील नागरिकांना स्मशान भुमीचा अत्यंविधीसाठी लाभ घेता येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर

सुचक - श्री. महादेव सुर्यवंशी
सौ. लता दलाल
अनुमादक : - श्री. प्रदिप जैस्वाल
श्री. केशव सोनवणे

**संवाद :**

**सौ. लता दलाल :.** स्मशान भुमीचा प्रस्ताव संदर्भात मला असे सुचित करावयाचे आहे की, अशा काही मनपाच्या स्मशानभुम्या आहेत की, त्यावर अतिक्रमणे होत असुन काही मंडळीने स्वतःच्या नावांवर असल्या सारखी चक्क स्मशान भुमीतील जागेच विक्रीला काढुन पैसे इकळत आहेत याबाबत काही अधिकाऱ्यांना याचा जाण असून ही काही केलेले नाही यावर प्रशासनाने दखल घेणे आवश्यक आहे.

**श्री. शांताराम काळे :.** स. सदस्या सौ. लता दलाल यांनी उपस्थित केलेल्या चर्चेनुसार माझ्या माहिती प्रमाणे प्रशासनाला सर्व बाबतीत माहिती असते नगररचना विभागाकडे शहरातील प्रत्येक जागे बाबत आणि अतिक्रमणाबाबत नोंदणी असणे आवश्यक आहे. त्या नोंदणीवरुन पडताळणी.करुन सिटी सर्व्हेला माहिती द्यावी. परंतु तसे या विभागाकडुन कामे होतांना दिसत नाही. शहरातील बरेचसे नाले सुध्दा बऱ्याचशा मंडळीनी बळकावुन गिळकृत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अतिक्रमण

करणाऱ्यावर तात्काळ कार्यवाही होत नाही. तर प्रशासनातील काही अधिकारी सुध्दा सबंधितांना मदत करुन प्रोत्साहीत करतात. शहरातील काही भाग विकशीत करित असतांना ज्या जागा विकासासाठी राखीव असतात त्या बाबत काही मंडळीच्या मर्जिनुसार अनेक अडचणी येतात व त्यामुळे विकास कामे पुर्ण होऊ शकत नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे अतिक्रमणे आणि विकास कामा मध्ये बाधा येणाऱ्या कामा संदर्भात नगर रचना विभागात माहिती असुनही ते कोणतीही कार्यवाही करीत नाही.

**सौ.लता दलाल :** स्मशान भुमी मध्ये ज्या ठिकाणी लोकांच्या अत्यंविधी साठी जागा आहे त्या ठिकाणी अतिक्रमणे होत आहेत याबाबत खुलासा व्हावा.

**मा.महापौर :** स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता सहा.संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** क्रांतीचौक येथील स्मशान भुमीत बुरुड समाजाची स्मशान भुमी आहे. या ठिकाणी दोन घरे बाधण्यात आलेली आहेत काय याचा खुलासा करावा.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** स. सदस्य जे बोलत आहेत ते सभागृहाची दिशाभुल करित आहेत.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** माझ्या माहिती प्रमाणे क्रांतीचौक स्मशानभुमीत तीन समाजाच्या स्मशानभुमी आहे. पैकी बुरूड समाजाची स्मशानभूमी आहे. त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे झालेले आहेत.तर त्या जमिनीचे काही मंडळी सौदेबाजी करीत आहे. एकीकडे समाजाची स्मशान भुमी म्हणावयाचे व दुसरीकडे बाजारात स्वतःच्या स्वार्थासाठी विक्री करायची या प्रकारात मनपाने काय कार्यवाही केली. त्या स्मशान भुमित वॉलकंपाऊंट बांधण्यास मनपाने परवानगी दिलेली आहे काय? आणि त्याठिकाणी बाधकाम करु कोर्टात प्रकरण गेलेले आहे.

**मा. महापौर :.** सहा, संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

**सहा.संचालक नगर रचना :.** स. सदस्यांनी सुचित केल्या प्रमाणे या विभागकडुन कोणत्याही प्रकारची बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही. तर दर्पण भवनचे ज्या ठिकाणी बांधकाम झालेले आहे ती जागा मनपाचाी आरक्षित आहे आणि काही अशा जागाबाबतची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

**श्री. म. इस्माईल :.** गारखेडा परिसरातील बराचसा भाग हा ओपन स्पेश आहे. तेथील जागेवर काही घरे ही झालेले आहेत तेंव्हा ले आऊट करित असतांना नगररचना विभागाने पाहणी करणे आवश्यक आहे.

**श्री. शांताराम काळे :** गारखेडा परिसरातील सुत गिरणी जवळील सर्व्हे नं. ५३ मध्ये जवळपास साडेतील ते सात एकर जागेवरील स.न. ६० मध्ये जागा मिळविलेली आहे. याबाबत मागील सभेतही प्रकरण चर्चिले गेले होते. तेंव्हा याबाबत नगररचना विभागाने पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** मोहल्ला ज्योतीनगर येथील जागेवर अतिक्रमण झालेले आहे त्याचे काय?

**मा. महापौर :** याबाबत सबंधित अधिकारी पाहणी करतील.

**श्री. पांडुरंग पैठणकर :** कैलासनगर येथील स्मशान मारुती स्मशान भुमीत एक अतिक्रमण होत आहे. या बाबत सबंधित अधिकाऱ्यांना माहिती देऊनही काहीही कार्यवाही झालेली नाही त्याचे काय ?

**मा. महापौर :** स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे सदरची जागा ही विकासित करुन त्या ठिकाणी जमिनीचे सपाटीकरण झालेले आहे. तेंव्हा याबाबत सबंधित अधिकारी योग्य तो बंदोबस्त करण्याबाबत कार्यवाही करतील.

**श्री. शांताराम काळे :** यापुर्वी ही बऱ्याचशा जागावर अतिक्रमणे झालीत त्यावर कार्यवाही व्हावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** रेल्वेस्टेशन हमालवाडा येथील स्मशान भुमीच्या जागेवर अतिक्रमण होत असुन ती खाजगी जागा असली तरीही सबंधित जागा मनपाने ताब्यात घ्यावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** माझ्या माहिति प्रमाणे क्रांतीचौक येथील बुरुड समाजातील स्मशान भुमीची जागा रुपये २२.०० लाखात देण्याचा सौदा झालेला आहे. याबाबत संबंधित आधिकाऱ्यांनी आताच माझ्या समक्ष चालुन पाहणी करावी. व त्या ठिकाणी चौकशी करुन ती जागा कुणास विकली व का विकत घेतली याची माहिती द्यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल :.** क्रांतीचौक स्मशान भुमीच्या ठिकाणी एकुण तीन स्मशानभुम्या आहेत (१) बौध्द (२) लिंगायत (३) बुरुड समाजाची आणि या जागा मनपाच्या नसुन गेली काही पुर्वी पासुनचे या जातीची सबंधित समाज याचा वापर करित आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :.** या ठिकाणी सभागृहाची दिशाभुल करण्यात येऊ नये. याबाबत जर मी सुचित केल्याप्रमाणे चुक असेल तर प्रत्यक्षात जाऊन पाहणी करावी आणि जास्तीचा माहिती पाहिजे असल्यास बांधकाम उप अभियंता श्री. सिकदंर आली यांनी सभागृहात सागावी.

**मा. महापौर :.** उप अभियंता बांधकाम यांनी खुलासा करावा.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :.** बुरुड समाजाची जागा मनपाची आहे काय ? त्या जागेवर वॉल कंपाऊड मनपाने केली आहे का ? दोन रुमचे बांधकाम त्या ठिकाणी करण्यात आले का ? आणि तेथील वॉचमन मनपाचे आहेत काय याची माहिती द्यावी.

**उप अभियंता बांधकाम :.** वॉल कंपाऊड मनपाने बांधलेला आहेत. वॉचमन रुमचे बांधकाम तिथे करण्यात आले ते काम मनपाने केलेले नाही आणि मनपाचे वॉचमन तिथे नाहीत.

**मा. महापौर :.** शहरातील ज्या जुन्या स्मशान भुम्या आहेत त्या जागेचा विकास करण्याच्या दृष्टीने सध्या कामे हाती घेतलेली आहेत. परंतु त्या ठिकाणी अतिक्रमणे झालेली असल्यास याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :.** क्रांतीचौक तील स्मशान भुमी ही एका समाजाची जागा असुन गेली काही वर्षा पासुन या जागेवर बुरुड समाज स्मशान भुमीत ओळखली जाते व या स्मशान भुमीत मनपाचा कसलाही हक्क नाही. कारण या ठिकाणी साफसफाई व कार्यक्रम आखला जातो. आणि या समाजाची स्वतःच्या पुर्वीची जागा असल्याने शासनाचा अशा जागा जी.आर. आहे. की, त्याबाबत पुढील बैठकीत त्याची माहिती सभागृहात सादर करण्यात येईल.

**सौ.लता दलाल :** संबंधित क्रांतीचौक येथील स्मशान भुमीच्या जागेवर मार्क आऊट व काही गडबड झालेली आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** काही स. सदस्यांचे त्या जागेवरुन जाण्यासाठी हा एक प्रकारचा डावपेच असुन त्यांनीच ही जाणुन बुजुन चाल केलेली आहे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** क्रांतीचौक स्थीत असलेली रमानगर येथील बौध्द समाजाची स्मशान भुमीचा विकास करणे आवश्यक आहे.

**श्री. पांडुरंग पैठणकर :** विविध स्मशान भुमीची विकासात्मक कृती करणे आवश्यक आहे.

**सौ. लता दलाल :** क्रांतीचौकतील स्मशान भुमीत वॉल कंपाऊड बाधण्यात असलेली किंवा नाही याची मालमत्ता अधिकाऱ्यांनी माहिति द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** होय त्याठिकाणी वॉल कंपाऊड बांधण्यात आलेली आहे.

**श्री. प्रकाश जावळे :** रमानगर येथील स्मशान भुमीच्या ठिकाणी काही व्यक्ति अतिक्रमणे केलेले आहे. त्याबाबत कार्यवाही करणार नाही.

**श्री. चंद्रकांत खैरे :.** क्रांतीचौक येथील स्मशाभुमीत जी बुरुड समाजाची आहे ती जवळ पास १५० ते २०० वर्षा पासुची आहे. या ठिकाणी आमच्या समाजा तर्फे काही कार्यक्रम व साफसफाई नेहमीच केल्या जाते. आणि सदरची जागा समाजाची असल्याने या

ठिकाणी कुणीही एकाचा हक्क नाही मी स्वतः आमदार असुनही त्या जागेबाबत हस्तक्षेप करु इच्छित नाही त्या ठिकाणी काही व्यक्तीनी जाणुन बुजुन डाव रचलेला असुन त्या बाबत मागे काही स. सदस्यांसह हॉटेलमध्ये चर्चाही झालेली आहेत हे मी नमुद करु इच्छितो तरीही मी गप्प बसलो कारण मी हिंदुत्व वादावर निवडुन आलेलो आहे. व हिंदुचा आमदार म्हणुन.

**श्री. रशिद मामु**

**श्री. मिर्झा अन्वर बेग :** स. सदस्य आपण आता केलेले शब्द परत घ्यावे आपण हिंदुचे आमदार नसुन सर्व समाजाचे आहात असे कबुल करावे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** "अहो हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व" समाजावे.

**श्री. शंकर मगर :** स. सदस्य आपण आमदार म्हणुन हिंदुच्या नावावर निवडुन आला नाही तर शिवसेना पक्षाच्या नावावर आलात.

**मा. महापौर :** स. सदस्य श्री. चंद्रकांत खैरे आपण बोललेले वाक्य हिंदुत्वाच्या नांवावर निवडुन आलयाचे वाक्य इतिवृत्तात घ्यावे काय ?

**श्री. मिर्झा अन्वर बेग**

**श्री. रशिद मामु :** स. सदस्यांनी आपले शब्द परत घ्यावे.

**श्री. चंद्रकांत खैरे :** होय. मी हिंन्दुत्वाच्या नांवावर निवडुन आलो परंतु आता आमदार झाल्याने मला सर्व जाती धर्माचा पाठींबा होता. व त्यात हिंन्दु मुस्लिम.ख्रिश्चन वगैरे जातीनी निवडुन देवुन आमदार केलेले असे मी म्हणेन.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सदरची सभा ००.२० मिनिटासाठी तहकूब करून सबंधित जागेची पाहणी करण्यास मा. आयुक्त व मा. महापौर सगट स. सदस्य यांनी करू नये.

**श्री. शांताराम काळे :.** अशा प्रकारचा प्रस्ताव सभेत करावा की, ज्या खाजगी जागेवरील स्मशान भुमी आहेत त्या जागा मनपाने खाजगी संस्थेस देऊ नयेत.

**मा. महापौर :.** कैलासनगर येथील स्मशान मारुतीचे २०.०० (वीस) लाखाचे काम हाती घेतलेले असुन शहरातील काही स्मशान भुमी आहेत त्या सर्व जागा लोकहिताच्या दृष्टीने विकास करण्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. करिता सदरील प्रस्ताव मंजुर करावा.

**ठराव क्र. १४४/१२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नारेगांव प्रभाग क्र. ९ येथे गेल्या २०.२५ वर्षापासुन नारेगांवच्या पुर्वेस असलेली स्मशानभुमी अधिकृतरित्या घोषित करुन त्यास संरक्षित भिंत उभारुन शेड बांधण्यात यावे जेणे करुन स्मशान भुमीचा अंत्यविधीसाठी लाभ होता येईल त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४५/१३ :** १) शिवाजी मैदान जवळ टी.बी. क्लिनिक पासुन सर्व्हे नं. ३६ मॅजि हिमायत नगर पर्यन्त ६० फुट डी.पी रोडसाठी बाधीत होणाऱ्या सर्व खाजगी आणि सरकारी जमीनी भुसंपादन करणे.

२) शिवाजी मैदानावर स्टेडियम साठी जागा रुंद करण्याच्या उद्देशाने सिटी क्लबची पुर्ण इमारत तेथुन हटविणे जरुरी वाटते व आज औरंगाबाद शहरामध्ये अशी इतकी मोठी कोणतीही खुली जागा उपलब्ध नसल्यामुळे वरील जागेमध्ये बांधीत होणारी सिटी क्लबची इमारत व जमीन भुसंपादन करुन क्रिडा प्रेमींना सहकार्य करावे व सिटी क्लब साठी पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे.

सुचक - श्री. अजिजुल्ला बेग
अनुमादक - श्री. नरेंद्र पाटील
दिनांक - १३-३-९२

**संवाद**

**श्री. प्रदिप जैस्वाल :** प्रस्तावाचे अनुमोदक नाहीत प्रस्ताव रद्द करावा.

**श्री. अशोक सायन्ना :** विधी सल्लागारांनी याबाबतचे नियम दाखवावे.

**श्री. केशव सोनवणे**
**श्री. अविनाश कुमावत**
**श्री.प्रदिप जैस्वाल**
**श्री. मोहसिन अहमद** या पूर्वीचे प्रस्ताव आपण एक तर रद्द किंवा स्थगित ठेवलेले होते. परंतु त्यानंतरही जर अनुमोदक अभावे विषय चर्चेला घ्यावयाचा असल्यास तशी प्रथा पडेल व ते चांगले नाही. ज्याला कुणीही उठेल व विषय चर्चेला घेता राहील. याचा विचार होणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :.** विधी सल्लागारांनी खुलासा करावा. (नियम वाचुन दाखविला)

**विधी सल्लागार :.** ज्या प्रस्तावाची पुर्व सुचना दिली आहे तो प्रस्ताव पुर्व सुचना देण्याचा सभासदाने अथवा त्याच्या अनुमोदकाने अथवा सदर प्रस्ताव मांडण्या बाबतचे ज्याला लेखी अधिकार पत्र दिले आहे हे अधिकार पत्र सभापती जवळ त्यावेळी दिले पाहिजे अशा सभासदांने मांडला नाही तर सदरचा प्रस्ताव वगळण्यांत आला असे समजण्यात येईल.

**श्री. अजिजुल्ला बेग :.** (नियम वाचुन दाखविला.)

**मा.महापौर :.** विधी सल्लागारांनी केलेली खुलासा योग्य असुन सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्यात येईल.

**ठराव क्र. १४५/१३ :** प्रस्ताव पुढील सभेपर्यन्त सथगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. १४६/१४ :** पोर्णिमेच्या चंद्राइतकी संपुर्ण आणि धृव ताऱ्या इतकी अचुक पंचाग निर्मीतीची ८५ वर्षाची परमपंरा असलेल्या अंथाग आकाशाच्या आलेख उलगडण्यासाठी आधारभुत ठरलेल्या सृष्टीचक्राच्या अनाकलनीय रुपाचे आकालन करणाऱ्या अनंत अज्ञात अमर्याद अंतराळाचा अचूक वेध घेणारा महाराष्ट्रीय संस्कृतीचे एक अविभाज्य अंग बनेल असे खगोलीय गणित धर्मशास्त्र व मुहुर्तशास्त्र जोतीशशास्त्र धर्म निर्णय वृतंवैकल्य सोळा संस्कार इत्यादी संदर्भात प्रदीर्घ वाटचालीचा इतिहास लाभलेल्या महाराष्ट्राचे व भारतसंस्कारच्या राष्ट्रीय पंचागकर्ते "जणकरत्न" "पं. धुडीराज शास्त्री दाते" सोलापुर यांचा औरंगाबाद महानगरपालिके मार्फत "मानपत्र" देवुन जाहिर सत्कार करण्यात यावा. प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. अजिज जहागिरदार |
| अनुमोदक | : | श्री. विठ्ठल पेरकर |
| | | श्री. अलफखान |
| दिनांक | : | ८-४-९२ |

**संवाद**

**श्री. तकीहसन खान :.** मांडण्यात आलेल्या प्रस्तावाची माहिती द्यावी हा प्रस्ताव आम्हाला मुळीच समजलेला नाही.

**श्री. अलफखान :.** पं धुंडीराज शास्त्रज्ञ हा एक खगोल व ज्योतीष शास्त्रज्ञ असल्याने ते जवळपास ८५ वर्षा पासुन सतत याचे कार्य करीत असुन या कामी गौरव प्राप्त केलेला आहे. तेंव्हा त्यांचा औरंगाबाद मनपातर्फे मानपत्र देवुन गौरव करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री. बंडु प्रधान :** सदरील प्रस्ताव मंजुर करावा. त्याचबरोबर तिबेटी नेते दलाई लामा यांनाही पाचारण करुन त्यांना मानपत्र देवुन सत्कार करावा.

**श्री. अविनाश कुमावत**

**श्री. प्रदिप जैस्वाल :** सदरील प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री. चंद्रकांत खैर :** दि. १८ मे १९९२ पर्यन्त तरी या प्रस्तावा संदर्भात मंजुरी देवुन सत्कार घडवुन आणण्याचे करावे.

**श्री. रशिद मामु :** नागपुर महानगरपालिकेने औरंगाबाद येथील सुप्रसिध्द अब्दुल चाऊस यांचा सन्मान केला होता तेव्हा औरंगाबाद मनपातर्फे त्यांना मानपत्र देवुन सत्कार व्हावा.

**मा. महापौर :** मागील वेळी सभागृहात असेच ठरलेले होते.त्यानुसार दि. १ मे १९९२. पर्यन्त या प्रस्तावातील पं. धुंडीराज शास्त्री यांचे नांवा बरोबरच औरंगाबादेतील सुप्रसिध्द अब्दुल चाऊस व इतर नामवंत साहित्यीक सामाजिक कार्यकते शास्त्रज्ञ आणि एखाद्या क्षेत्रात गुणगोर विलेले नऊ (९) व्यक्तिंचा म्हणजे सर्व मिळुन ११ (अकरा) जनाचा "मानपत्र" देवुन मनपातर्फे सन्मान करावयाचा आहे, त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**ठराव क्र. १४६/१४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ८५ वर्षाची पंरपंरा असलेल्या व सृष्टीचक्राच्या अनाकलनीय रुपाचे आकलन करणाऱ्या अनंत अज्ञात अमर्याद अंतराळाचा अचुक वेध घेणाचा ज्योतीशास्त्रज्ञ महाराष्ट्राचे व भारत सरकारच्या राष्ट्रीय पंचागकर्ते "गणकरत्न" पं. धुंडीराज शास्त्री दाते. सोलापुर यांचा व औरंगाबाद येथील सुप्रसिध्द अब्दुल चाऊस याचा तसेच नामपंत साहित्यीक सामजिक कार्यकर्ते शास्त्रज्ञ आणि एखाद्या क्षेत्रात विशेष गुण गोरविलेले असे (९) व्यक्ति म्हणजे सर्व मिळुन (११) अकरा नामवंत व्यक्तिंचा मनपातर्फे मानपत्र देऊन दिनांक १ मे १९९२. पर्यन्त सन्मान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७/१५ :** जियोओद्दीन ले.आऊट रोशनगेट सिट नं. ४८ गेली २० वर्षा पासुन वस्ती झालेली आहे. सदरील ले आऊट जागेस कोणतेही नाव नसल्याने नागरिकांना पत्ता मिळण्यासाठी खुप त्रास होत आहे. तसेच टपाल इत्यादी महत्वाचे पत्रे वगैरे वेळेवर मिळत नाहीत सदरील ले.आऊट येथील रहिवाशांचे जीवन विस्कळीत झाले आहे. तरी सदरील ले आऊट या भागाचे नाव व आदरणीय श्री. हाजी बशीर अहमद यांच्या नावावर "बशीर कॉलनी" असे नामांतर करण्यात यावे ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. मोहसिन अहमद |
| | | श्री. रतनकुमार पंडागळे |
| अनुमोदक | - | श्री. प्रदिप जैस्वाल |
| दिनांक | - | ९-४-९२ |

**संवाद**

**मा.महापौर :** मंजुर.

**ठराव क्र. १४७/१५ :** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे जियोओद्दीन ले आऊट रोशनगेट सीट नं. ४८ या ठिकाणी २० वर्षापासुन वस्ती अस्तित्वात असुन या ले आऊट वरील भागाचे नाव स्व. व आदरणी श्री. हाजी बशीर अहमद यांच्या नांवावर "बशीर कॉलनी" असे नामांतर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४८/१६ :** १) विभाग क्र.३ मध्ये १७ वार्ड आहेत. या विभागाची अंदाजे लोकसंख्या ८५ हजार ते एक लाख एवढी आहे. तेंव्हा विभाग क्र. ३ चे प्रशासकिय दृष्टीकोणतुन विभाग क्र. ३ "अ" व विभाग क्र. ३ "ब" असे विभाजन करण्यात यावे.
२) औरंगाबाद शहराचा विस्तार व लोक संख्येचा विचार करता सध्या अस्तित्वात असलेले माजमत्ता अधिकारी हे पद धारण करणाऱ्यावर कामाचा प्रचंड ताण पडतो. तेव्हा तक्रारी वेळीच दुर करण्यासाठी व कार्यक्षमरित्या काम व्हावे या दृष्टीकोणातुन मालमत्ता अधिकारी यांच्या अधिपत्याखाली दोन युनिट स्थापन करण्यात यावेत.

सुचक : श्री. मोहसिंन अहमद
अनुमादक : श्री. मो. हफिजोद्दीन
श्री. रतनकुमार पंडागळे
दिनांक : ९-४-९२

**संवाद**
**मा.महापौर :.** मंजुर

**ठराव क्र. १४८/१६ :.** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे विभाग क्र. ३ मध्ये १७ वार्ड आहेत. या विभागाची लोकसंख्या ८५ हजार ते १ (एक) लाख एवढी असल्याने कामाचा व्याप एका झोनकडे जादा होतो. करीता विभाग क्र. ३ चे विभाग क्र. ३ अ व विभाग क्र. ३ ब असे प्रशासना तर्फे विभागणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्याच प्रमाणे शहराचा विस्तार व लोक संख्येचा विचार करता सध्या अस्तित्वात असलेले मालमत्ता अधिकारी हे पद धारण करणाचा अधिकाऱ्यांवर प्रचंड ताण पडतो. तेव्हा वेळीच तक्रारी दुर होण्यासाठी व कार्यक्षमरित्या कामे सुरळीत होण्याच्या दृष्टीने मालमत्ता अधिकारी यांच्या अधिपत्या खाली दोन युनिट स्थापन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९/१७ :** यापुर्वीच्या सर्वसाधारण सभेत उप आयुक्तांच्या दोन जागा असणे बाबतचा ठराव मंजुर झालेला आहे. महानगरपालिका दिवसेंदिवस काम वाढत असल्यामुळे सर्वसाधारण सभेने हा प्रस्ताव मंजुर केलेला आहे. शासनांची मंजुरी येईपर्यन्त जर या दोन्ही पदांवर या अटीवर भरण्यात यावी की, या पदासाठी जे अधिकारी जेष्ठता यादीनुसार पात्र असतील वर्ग.२ चे जे वेतन आज त्याना मिळते व त्यांना दिला जाईल किंवा जे वेतन आज घेतात याच वेतनावर हे अधिकारी राहतील व शासनाची मंजुरी आली तर उप आयुक्तांच्या जागेचे वेतनाची थकबाकी देण्यात येईल. जर शासनाची मंजुरी न आल्यास हे अधिकारी त्यांचे पुर्वीच्याच मुळ पदावर काम करतील प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक - श्री. अलफखान हुसैनखॉन
अनुमोदक - श्री. धनंजय गंगाखेडकर
श्री. अजिज जहागिरदार
दिनांक - १०-४-९२

**संवाद**
**मा. महापौर :.** मंजुर.

**ठराव क्र. १४९/१७ :** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे या पुर्वीच्या सर्वसाधारण सभेत उप आयुक्ताच्या दोन जागा भरणे बाबत ठराव क्र. ११७ दिनांक १९.२.८२ नुसार मंजुरी मिळालेली आहे मनपातील

दिवसेंदिवस वाढत असलेलया कामाच्या व्यापामुळे सदरील पदाची निर्मिती करणे आवश्यक आहे व ही पदे भरीत असतांना मनपा प्रशासनातील जे अधिकारी वर्ग.२ च्या पदावर सध्या कार्यरत आहेत. व जे या पदाचे वेतन घेतात त्यांची जेष्ठता सुचीनुसार उप आयुक्त पदासाठी नियुक्ती करण्यात यावी व शासनाच्या मंजुरीस्तव पाठवावे. शासनाची मंजुरी येईपर्यन्त त्यांनी आहे त्याच मुळ वेतनावर काम करावे आणि जर या प्रस्तावास शासनाकडुन मंजुरी न असल्यास त्यांना परत त्यांचे मुळ पदावर काम करावे. लागेल. या अटीवर पदोन्नती देण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## शहरातील मच्छरांविषयीची चर्चा

**श्री. पांडुरंग पैठणकर :.** शहरामध्ये सध्या मच्छरांचा इतका त्रास झालेला आहे की "मच्छर हटाव व जनता बचाव" अशी मागणी करण्यात येत आहे याबाबत आरोग्य विभागाने त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री. अजिज जहागिरदार :.** माझ्या वार्डामध्ये तर गेले कित्येक दिवसापासुन डासांचा त्रास आहे. जवळपास सिलकमील कॉलनी राहुलनगर रेल्वेस्टेशन व हमालवाडा पर्यन्त सर्वत्र या मच्छरामुळे नागरिकांना फार त्रास सहन करावा लागत आहे. आपल्या आरोग्य विभागाकडुन फवारनी वगैरे कधी होते याची काही एक कल्पना नाही आणि चौकशी केली असात औषधे नाहीत असे उत्तर मिळते. यामुळे मच्छरव डासांचा प्रादुर्भाव जास्तीचा वाढलेला असुन ते इतके मोठे आहेत की. विमानाच्या आकारासारखे मोठमोठी त्यांची सोंडे आहेत व ते रात्रभर त्रास देतात. याबाबत खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :.** सबंधित अधिकारी नसतील तर मा. आयुक्त खुलासा करतील.

**श्री. अजिज जहागिरदार :.** माझ्या वार्डात पैठण रोडवर शेतकी शाळा आहे त्या शाळेतील शेतामध्ये पाझर तलाव (पर्क्युलेशन टॅक) असुन त्या ड्रेनेजचे कनेक्शन दिलेले आहे. त्यामुळे तेथील सांडपाणी सारखे वहात असल्याने व एकत्रीत घाण पाणी असल्याने सारखा वास येतो व त्यामुळे मच्छरांची व्याप्ती जादा वाढलेली आहे. याबाबत पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांनी जाऊन पाहणी करावी. त्या भागाकडे आरोग्य विभागाकडुन कोणत्याही प्रकारची औषधाची फवारनी केल्या जात नाही. तर केवळ पाण्याची फवारणी केली जाते याची चौकशी करुन कार्यवाही व्हावी.

**श्री. बंडु प्रधान :.** स. सदस्य जे प्रश्न उपस्थित करीत आहेत त्या सर्व कामाचे एकटे आरोग्य वैद्यकिय अधिकारी जबाबदार असुन शहरातील व्यवस्थित साफसफाई व गटारे. नाले, आदीची साफ.सफाई करुन सर्वत्र औषधांची व नोव्हनची फवारणी करणे आवश्यक असते. आरोग्य वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या अधिपत्या खाली काम करणारे कर्मचारी त्यांचे ऐकत नाही. आरोग्य विभागाचे कार्यक्रमही नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने सबवित नसल्याने अनेक लोक त्रस्त झालेले आहेत. कधी कोणता रोग होईल यांची शाश्वती नसुन आरोग्य वैद्यकिय अधिकाऱ्यांना सध्या तरी काम झेपत नाही. त्यामुळे त्यांचेकडुन तो विभाग काढुन घ्यावा.

**श्री. प्रदिप जैस्वाल :.** गेल्या महिन्यापासुन मनपाकडील झोन वाइज काम करणारे सॅनेटरी इन्स्पेक्टर ड्रेनेज कनिष्ठ अभियंता पाणी पुरवठा कनिष्ठ अभियंता या सर्व कर्मचाऱ्यांची कामे निकृष्ठ दर्जाची असुन त्यांचे हजगर्जी पणामुळे शहरातील साफ.सफाई सुरळीत होत नाही. सदरील कर्मचारी साइटवर जाण्याचे ठोंग करतात व दुसऱ्याच ठिकाणी बसुन राहतात. हे आम्हाला पाहणीत आढळले आहे. साफ.सफाई करणाऱ्या कर्मचाच्यावर कोणाचाही वचक नसतो. याचा फायदा

घेऊन ते खालाचे कर्मचारी गप्प बसतात व पर्यायाने साफ.सफाई होत नाही. सर्वत्र घाण पसरते आणि आरोग्य विभागाकडे सर्व लक्ष केंद्रीत असते.

**श्री. धनंजय गंगाखेडकर :.** माझ्या माहिती प्रमाणे गेल्या सहा महिन्यांपासुन नोव्हॉन नाही तर मलेरिया विभागाकडे कार्यरत असलेली जीप सुध्दा सध्या नाही याची माहिती द्यावी.

**मा.महापौर :.** सबंधित अधिकाऱ्यांनी याचा खुलासा करावा.

**मलेरिया निरिक्षक :.** गेल्या दोन महिन्यापासुन नोव्हॉन अस्तित्वात नाही.

**श्री. धनंजय गंगाखेडकर :.** गेल्या सहा महिन्या पासुन नोव्हॉन नसल्याची त्यांच्याच विभागातील रेकार्ड वरुन मी माहिती सांगतो.

**श्री. शांताराम काळे :.** सध्या डासांचा नायनाट करण्या बाबत चर्चा होत आहे. तेव्हा त्यावर काय उपाय योजना करणार याबाबत सर्वानुमते ठरविणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :.** सबंधित अधिकाऱ्यांना याबाबत काहीच कल्पना नसेल तर २.०० तासासाठी सभा तहकुब करुन माहिती संपुर्ण गोळा करुन सभागृहात सांगण्याचा आदेश देता येईल. विनाकारण या ठिकाणी चर्चा करण्यात अर्थच नाही.

**श्री. प्रकाश जावळे :.** नोव्हॉन कधी पासुन उपलब्ध नाही आणि याची चौकशी करुन कार्यवाही व्हावी.

**श्री. अजिजुल्ला बेग :.** आरोग्य विभागाचे अधिपत्या खाली काम करणारे मलेरिया विभागाचे अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात न पाठविता त्यांच्या मुळ पदावर कार्यरत असण्यास सांगावे व त्यांचेकडुन मलेरिया बाबतची सर्व कामे करवुन घ्यावी.

**श्री. म. इस्माईल :** मलेरिया अधिकारी म्हणुन शासनाने डेप्युटेशनवर या कार्यालयात एक अधिकारी नेमलेले आहे. आणि त्यांचेवर सर्वस्वी जबाबदारी असते. परंतु आरोग्य विभागाकडुन त्यांना दुटप्पी वागणुक देवुन त्यांच्या मुळ विभागात पाठविण्याचे प्रस्ताव आहेत. तेव्हा सबंधित अधिकाऱ्यांना मुळ विभागाकडे न पाठविता याच कार्यालयात मलेरिया बाबतचे कामे सोपवावी.

**श्री. मुजिब आलमशा खान :** माझ्या वार्डात मकसुद कॉलनी येथे म्हशींच्या गोठयामुळे तेथील घाणीने फार त्रास होतो. याबाबत कार्यवाही व्हावी आणि अशा गोठयांना औषध फवारणी वेळोवेळी करण्यास सुचना द्याव्यात.

**श्री. शंकर मगर :** शहरातील साफ स्वच्छते बाबत विभागाने तत्परता बाळगणे आवश्यक आहे.

**श्री. रशिद मामु :** गेल्या एक महिन्यापासुन माझ्या असे निदर्शनास आले आहे की, येथील नाले गटारी व रस्त्यांची साफ.सफाई केल्यानंतर औषध फवारणी नियमित पणे झाली. असे दिसत नाही.

**श्री. मिर्झा अन्वर बेग :.** मनपा कार्यालयातील मलेरिया अधिकारी जे डेप्युटेशन वरील आहेत त्यांना पूर्वीच्याच विभागात पाठविले की, ते सुट्टीवर गेलेत याची माहिती सभागृहात द्यावी.

**श्री. चंद्रकांत खैरे :.** शहरातील साफ.सफाई बाबत सबंधित आरोग्य विभाग आणि त्याचे अधिपत्या खालील काम करणारे कर्मचारी तसेच सॅनेटरी इन्स्पेक्टर या सर्वांनी आपआपली जबाबदारी समजुन कामे करणे महत्वाचे आहे आणि एकाच ठिकाणी तेच कर्मचारी जादा कालावधीसाठी ठेवण्यांत येऊ नयेत.तर त्यांचे इतरत्र ठिकाणी बदल्या कराव्यात. ज्यामुळे त्या कर्मचाऱ्यांच्या मनात अहंपना येणार नाही. शहरातील ड्रेनेज लाईन पाण्याची लाईन वेळोवेळी चौकअप होणे व त्या दुरुस्तीसाठी खोदकामे करणे यामुळेही घाण पाणी दुर्घधी सर्वत्र पसरते. त्यामुळे साफ.सफाईचे प्रश्न या ठिकाणी उपस्थितीत होतात. मनपामध्ये सफाई कामगार अपुरे आहेत.झोपडपट्टी सारखा स्लम भागापर्यन्त वेळेच्या वेळी अल्पसा सफाई कामगार पोहचु शकत नाही. याबाबत चौकशी करुन कार्यवाही व्हावी.

**श्री. पांडुरंग पैठणकर :** आमच्या असे निदर्शनास आले आहे की, येथील काही वर्ग.१ व वर्ग.२ अधिकारी यांच्या घरोघरी जाऊन आरोग्य विभागातील कर्मचारी औषंधाची फवारणी करतात याबाबत आपण काय करणार ? व शहरातील इतर किरकोळ भागात ठणठणाट असतो.

**श्री. महादेव सुयंवशी :** झोन क्र.५ चिकलठाणा विभागा अंतर्गत काम करणारे सफाई कामगार केवळ १० (दहा) असुन ही संख्या अपुरी आहे. तेव्हा चिकलठाणा प्रभाग हा फार मोठ असुन या अंतर्गत औद्योगिक व काही स्लम विभाग येतात व ते अंतर ही दुरचे असल्याने या अल्पशा कर्मचाऱ्यांकडुन कामे सुरळीत होत नाही.

**श्री. गजाजन बारवाल :** पदमपुरा भागातील जो नाला सतत वाहत असतो तो वारंवार स्वच्छते साठी औषधांची फवारणी करणे आवश्यक आहे.

**श्री. बंडु प्रधान :** मी यापुर्वीही सुचित केलेले आहे की, ज्या आरोग्य विभागाकडुन शहराच्या स्वच्छते बाबत आपण सर्व चांगल्या नजरेने पहावे परंतु या विभागाकडुन स्वच्छतेचा प्रश्न चोख हाताळल्या जात नसल्याने संबधित आरोग्य अधिकाऱ्यांना त्या ठिकाणा वरुन काढुन घ्यावे.

**श्री. अशोक सायन्ना :** आता विषयावर जास्तीची चर्चा न करता निर्णय घेण्यात यावा.

**मा.महापौर :** स. सदस्यांनी आतापर्यन्त केलेल्या चर्चेवरुन शहरातील साफ.सफाई व दुंर्गधी याबाबत उपाय योजना करणे महत्वाचे असल्याचे नमुद केलेले आहे. व ज्यामुळे डास व मच्छरांचा प्रादुर्भाव निर्माण होणार नाही. डासांची उत्पत्ती ही सांडपाणी व दुंर्गधीयुक्त पदार्थाने होते व शहरात त्यामुळे अनेक रोग होण्याचा संभव असतो. परंतु यासाठी मी आरोग्य विभागाकडील मलेरिया विभागा संदर्भात एक बैठक आयोजित केलेली होती. त्यावेळी मनपातील झोनवाईज आरोग्य अधिकाऱ्यांना बोलावुन त्यांचेकडुन पुर्ण माहिती घेतली व सध्या शहरात गोवर व कांजण्या सारखे साथी प्रामुख्याने दुंर्गधी भागात होत आहेत. त्यावर तात्काळ इलाज करण्याच्या दृष्ठीने सांगोपाण चर्चा झाली व या वाढत्या रोगांच्या संदर्भात आळा बसण्यासाठी मनपातील झोनवाईज आरोग्य शिबीरे घेण्याबाबत मी सुचना केल्या व ती शिबीर घेण्यात आली आणि शहरातील अपु ऱ्या सफाई कामगारांची संख्या लक्षात घेता स्वच्छतेच्या दृष्टीने पुन्हा झोनवाईज दैनिक वेतनावर मजुर लावण्यात आले.

**झोन क्र.१ :** (३०) झोनक्र.२ (२०) झोन क्र. ३ (२०) झोन क्र. ४ (३०) झोन क्र. ५ (४०) झोन क्र.६ (४०) झोन क्र. ७ (०५) (एकुण दोनशे (२००)कर्मचारी)

**श्री. पांडुरंग पैठणकर, श्री.मिर्झा अन्वर बेग, महादेव सुर्यवंशी**

: झोनवाईज दैनिक वेतनावर कर्मचारी वाढविले असल्याचे सुचित केले ते चुकीचे असुन अद्यापही एकही कर्मचारी वाढविण्यात आलेला नाही.

**श्री. रशिद मामु :** झोन नं. २ मध्ये केवळ सहा मजुरांची मागणी होती त्या ठिकाणी ३० (तीस) मजुर कसे दिले ?

**मा. महापौर :** आता जादा चर्चा न करता असा निर्णय घेण्यात येतो की, आरोग्य विभागातील मलेरिया अधिकारी श्री. शेख यांची बदली करुन त्यांना त्यांचे मुळ विभागात पाठविण्यात यावे.

**श्री. शांताराम काळे :** आपण दिलेल्या निर्णया संदर्भात प्रत्येक वार्डवाईज स. सदस्यांचे विचार होणे महत्वाचे आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** सॅनेटरी इन्स्पेक्टर व कनिष्ठ अभियंता (ड्रेनेज/पाणी पुरवठा) यांचे कामात निष्काळजी असल्याचे त्यांचे एक एक वार्षिक इन्क्रीमेन्ट कपात करण्यात यावे.

**मा. महापौर :** जे कर्मचारी किंवा अधिकारी कामात निष्काळजी पणा दाखवतील त्यांचेकडुन कामे सुरळीत होणार नाहीत त्यांचेबाबत प्रशासनाने शोकॉज नोटीस द्यावी. आणि वार्षिक एक इन्क्रीमेन्ट कपात करावे.

याबरोबरच "जन गण मन" राष्ट्र गिताने" सभा समाप्त झाली.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.महापौर
महानगरपालिका,औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

**दिनांक ३० एप्रिल १९९२ रोजी संपन्न झालेल्या तहकुब विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक ३० एप्रिल ९२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता सभेस सुरुवात झाली सभेस मा. आयुक्त,उप आयुक्त तथा कार्यालयीन अधिकारी व खालील स.सभासद उपस्थित होते.**

१) मा.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
२) मा.श्री. थोरात किशोर गोविंदराव
३) मा.श्री. यादव अशोक सायन्ना
४) मा.श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
५) मा.श्री. पाटील नरेंद्र यादवराव
६) मा.श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
७) मा.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
८) मा.श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
९) मा.श्री. मुजिब आलमशा खान
१०) मा.श्री. प्रधान बंडु गोविंदराव
११) मा.श्री. जावेद हसनखान कासिम हसन खान
१२) मा.श्री. तकी हसनखॉन कासिमहसन खॉन
१३) मा.श्री. स. अहमद एकबालुद्दीन स.मो. कुतुबुद्दीन
१४) मा.श्री. ओक जयवंत केशवराव
१५) मा.श्री. गिल इगवालसिंग प्रितमसिंग
१६) मा.श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
१७) मा.श्री. अ. रशिदखान (मामु) अ. हमीदखॉन
१८) मा.श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
१९) मा.श्री. छापरवाल रमेश नारायण
२०) मा.श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२१) मा.श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२२) मा.श्री. अलिम बेग मिर्झा कलीम बेग
२३) मा.श्री. स. हुसैन स. अहमद
२४) मा.श्री. मगर शंकर जिजाराम
२५) मा.श्री. मानकापे नामदेवराव शामराव
२६) मा.श्री. अलफखॉ हुसैनखॉ
२७) मा.श्री. अजिजखॉ दादामियॉ अ. रहेमान
२८) मा.श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
२९) मा.श्री. डॉ. काळे शांताराम यशवंत
३०) मा.श्री. बारवाल गजानन रामकिसन
३१) मा.श्री. जावळे प्रकाश शिवराम
३२) मा.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
३३) मा.श्री. नवपुते कचरु चंद्रभान

सभेची सुरुवात वंदे मातरम् गिताणे अंदाजे ठिक ११.०० वाजता झाली.

**संवाद**

**मा.महापौर :** शहरातील एक नामवंत व्यक्ति व नांदेड गुरुव्दारा बोर्डाचे अध्यक्ष, श्री. जबिंदा याचे वडीलांचे निधन झाल्याने आजची सभा सायकाळी ०५.०० वाजेपर्यन्त तहकुब करण्यात येते. (वेळ अंदाजे ११.३०)(सभेस सुरुवात अंदाजे ०५.२५ वाजता)

**विषय क्र. १ :** दिनांक २८.१२.९१ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**मा. महापौर :** आजची सभा सजी दि. २६.१२.९१ ला विद्युत पुरवठा व शहरातील पाणी पुरवठा बाबत विशेष सर्वसाधारण सभा तसेच दि. ३०.१२.९१ रोजी शहरातील बांधकाम बाबत विशेष सर्वसाधारण सभा झाली परंतु ती कोरम अभावी नंतर तहकुब झाली त्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत या सभेत म. सदस्यांच्या सुचने नुसार चर्चा होणार आहे.

**श्री. शांताराम काळे :** सुरुवातीला मागील इतिवृत्तला कायम करणे बाबत चर्चा व्हावी आणि नंतर शहरातील पाणी पुरवठयाबाबत सर्वांनी चर्चा करावी.

**श्री. अलफखॉ :** दि. ३०.१२.९१ च्या सभेतील पान क्र. २६ मध्ये माझ्या वक्तव्यात आणि आज जे आमखास (शिवाजी मैदान) म्हणतात ते ( on be Laif of local find) १२५रु. वर्षाने गव्हर्नमेंट कॉलेजला लिजवर दिलेले आहे अशी दुरुस्ती व्हावी .

**मा.महापौर :** ठिक आहे. स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे तशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**श्री. बंडु प्रधान :.** मागील बैठकीत मच्छराबाबत सभागृहात चर्चा झालेली होती आणि त्या सभेत सबंधित मलेरिया निर्मुलन अधिकारी तथा आरोग्य वैद्यकिय अधिकारी यापैकी कुणीही सभेत उपस्थित नव्हते तरीही त्यांचे काय म्हणने आहे तसे सभागृहात विचार न घेता मलेरिया अधिकारी यांना त्यांचे मुळ खात्यात परत पाठविण्याचा सर्वानुमते ठरविण्यात आले ते योग्य नसुन त्यांचेवर आलेला आहे. त्यांचे बाबत घेण्यात आलेल्या निर्णयांचा फेर विचार व्हावा.

**मा. महापौर :** सदरची सभा ही विशेष सर्वसाधारण सभा असुन आपण सुचवित असलेल्या चर्चेचा या सभेत काही एक सबंध नसल्याने या बाबत विचार करता येणे शक्य नाही. तेंव्हा आता इतिवृत्त कायम करणे बाबत चर्चा व्हावी.

**श्री. रशिद मामु :** आजच्या बैठकीचा अजेंडा आम्हाला उर्दुतुन मिळाला नाही त्यामुळे आम्हाला वाचता आले नाही. याबाबत खुलासा व्हावा.

**मा. महापौर :** संबंधित कर्मचारी यांची प्रकृती ठिक नसल्याने तो सुट्टीवर होता त्यामुळे उर्दुतुन लिहिल्या गेले नाही

**श्री.नामदेवराव मानकापे :** दिनांक २६.१२.९१ च्या सभेतील पानग्र. २३ मध्ये जी पाणीपुरवठयाच्या संदर्भात भरपुर चर्चा केलेली आहे. माझ्या वार्डात गेल्या २० वर्षापासुनची लाईन जुनी असुन ती बदलण्यात आलेली नाही. तसेच लाईन ही ३ इंची आहे. ती काढुन टाकावी याबाबत अद्यापही कार्यवाही झालेली दिसत नाही याचे कारण काय ?

**मा. महापौर :** आता शहरातील पाणी पुरवठया बाबत बराच फरक पडलेला असुन स. सदस्यांनी सुचित केलेला प्रश्न हा जुना आहे सध्या पाण्याचा प्रश्न पुर्वी पेक्षा बराच सुधारण आहे.

**श्री.नामदेवराव मानकापे :.** नाही, नाही माझ्या वार्डात अद्याप ही पाण्याचा प्रश्न सुटलेला नसुन केवळ १/२ तास ही पाणी येत नाही याबाबत खुलासा व्हावा.

**मा. माहापौर :** आता पर्यन्त पाण्याचा प्रश्न शहरासाठी बिकट वाटत होता परंतु आत पुर्णतः सुटण्याच्या मार्गावर आहे. क्रांतीचौक पाण्याची टाकी येथे आता दोन टाक्या झालेल्या आहेत त्या मुळे परिसर अभियांत्रिकी कार्यालयाकडुन या बाबत कार्यवाही झालेली असुन शहरातील पाण्याच्या वाटपा बाबत या टाकी मधुन कसा उपयोग केला जातो याबाबत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा खुलासा करतील.

**श्री. शांताराम काळे :** स. सदस्य श्री. मानकापे यांनी विचारलेला प्रश्न योग्य असुन त्यांच्याशी मी सहमत आहे. कारण पाण्याचा प्रश्न अजुनही सुटलेला नसुन माझ्या वार्डात

पन्नालालनगर, सुदर्शनगर येथे गेल्या ३/४ दिवसापासुन पाणी मुळीच येत नाही. याबाबत सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**श्री. कचरु नवपुते :.** पाणी पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने नविन टाक्या बांधण्यात येत आहेत. त्यासाठी नविन पाईप लाईन टाकण्यात येत आहेत. तेंव्हा त्या लवकरच चालु करण्यात याव्या म्हणजे दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असल्याने पाण्याचा प्रश्न ही बिकट होत जाईल. तेंव्हा याबाबत नोंद घेऊन त्वरीत कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** स. सदस्य श्री. नवपुते यांनी सुचित केल्या प्रमाणे ज्या नविन पाण्याच्या टाक्या बांधण्यात आलेल्या आहेत त्या चालु करणे बाबत परिसर अभियांत्रिकी कार्यालया तर्फे नक्षत्रवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यंत च्या लाईनमध्ये दोन गॅप असल्याने या पाईप लाईनची पाण्याच्या टाकीस कनेक्शन जोडण्यात आलेले नाही व तसे परिसर अभियांत्रिकी कार्यालयाने सुचविले आहे. तेव्हा येत्या जुलै महिण्यापर्यंत कार्यवाही पुर्ण होईल.

**श्री. कचरु नवपुते :** सबंधित अधिकाऱ्यांचा काही तरी गैर समज होत आहे. माझ्या वार्डातील पाईप लाईन संदर्भात एका इसमाने विरोध केला असुन ती लाईन ..मध्ये पडली आहे.

**कार्यकारी अभियंता(पा.पु) :** सबंधिताना काळविण्यात आलेले आहे.

**श्री. कचरु नवपुते :** परिसर अभियांत्रिकी कार्यालयाने सबंधितांचे पैसे न दिल्याने त्या ठिकाणी अडथळा होत आहे. तेंव्हा त्या इसमाचे पैसे देण्याबाबत सुचना करावी आणि कनेक्शन जोडण्यात यावे जेणे करुन पाण्याच्या टाकीचा उपयोग सुरळीत होईल.

**श्री. एकबालसिंग गिल :.** माझ्या वार्डातील घाटी दवाखाना येथे एक पाण्याची नविन टाकी बांधलेली आहे परंतु ती चालु करण्यात आलेली नाही त्या बाबत लवकर कार्यवाही व्हावी जेणे करुन रोग्यांना त्रास होणार नाही.

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** शहरातील सर्व नविन टाक्याबाबत कार्यवाही होईल परंतु या घाटीतील टाकी बाबत बी.१ चे टेन्डर असल्याने आणि एकच गुत्तेदार असल्याने त्यांनी थांबविलेल्या कामा बाबत त्यांना फाईन करण्यात येईल.

**मा. महापौर :.** याबाबत सबंधित गुत्तेदाराला योग्य ती समज देण्यात येईल.

**श्री. अशोक सायन्ना :.** पडेगाव येथील कत्तलखाना आहे त्या ठिकाणी गेल्या ३/४ दिवसापासुनची पाण्याचा पुरवठा करणे बाबात कार्यवाही होत नाही. याचे कारण काय ?

**श्री. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** येथील कामाच्या बाबतीत लवकरच कामे पुर्ण होणार आहेत. तेथील डिस्ट्रीब्युशनचे बाबतीत टेंन्डर निघालेले असुन विहिरीचे काम होत आहे. त्याच प्रमाणे टाकीचे काम पुर्ण करण्यास येणार आहे.

**श्री. अशोक सायन्ना :.** सबंधित अधिकारी हे गेल्या तीन वर्षा पासुनचे आश्वासने देतात परंतु प्रत्यक्षात कामे होत नाहीत मला कोणत्याही प्रकारचे आश्वासने नकोत. कामे लवकर कसे होतील त्याचे प्रयत्न काम होणे महत्वाचे आहे. आणि यासाठी मी सतत प्रयत्नशील असतो. या बाबत वर्तमान पत्रात सुध्दा बऱ्याच वेळा बातम्या आलेल्या आहेत परंतु अधिकाऱ्यांना काही एक फरक पउलेला दिसुन येत नाही. मिटमिटा येथे काही ठिकाणी स्टॅन्डपोस्टची व्यवस्था करण्याबाबत सुचना केलेल्या होत्या परंतु त्याबाबतही सबंधित अधिकाऱ्यांनी काहीही केलेले नाही. माझ्या मते या विभागाकडे पाणीपुरवठा व ड्रेनेज ही दोन कामे असल्याने यापैकी एकच काम म्हणजे पाणी पुरवठयाचे काम ठेवण्यात यावे. ड्रेनेज काम इतर अधिकाऱ्यांना देण्याबाबत विचार व्हावा.गेल्या तीन वर्षा पासुन कत्तलखाना बाबत कार्यवाही होणेसाठी झगडत असुन सबंधित अधिकारी काहीही करीत नाही. याबाबत जनतेत असंतोष पसरत असुन पाणी पुरवठयाच्या प्रश्ना बाबत आपण सभा घेत आहोत परंतु त्यावर पुर्णपणे कार्यवाही होत नाही ही खेदाची बाब होय. मला या

ठिकाणी पडेगाव कत्तलखाना संदर्भात खुलासा मिळावा अन्यथा ही सभा येथेच संपवावी.

**श्री. अजिजुल्ला बेग :** शहरात विविध ठिकाणी ज्या सात टाक्या बांधण्यात येत आहेत त्यापैकी किती टाक्याचे कामे पुर्ण झालेल्या आहे. हर्सुल तलावचे पाणी शहागंज आणि जिन्सी भागात तसेच घाटी बेगमपुरा जुना बाजार भागासाठी पुरविल्या जाते. यापेक्षा जिन्सी आणि शहागंज भागात पैठणच्या जायकवाडीचा पाणी पुरवठा करणे बाबत कार्यवाही का होत नाही जेणे करुन शहरातील जुल्या भागांना पाण्याचा त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी. जेणे करुन नागरिकांना पाण्याचा प्रश्न गंभीर होणार नाही.

**श्री. बंडु प्रधान :** हत्तेसिंगपुरा भागामध्ये वैशालीनगर यशोधरानगर आणि इतर भाग येतात या ठिकाणचे नागरिकांनी बेटरमेंट चार्जेस वगैरे सर्व भरलेले असुन नागरी सुविधा मात्र मिळत नाहीत त्या ठिकाणी पाण्याच्या लाईनबरोबर टाकलेल्या नसल्याने पाण्यासाठी इतरत्र कार्यवाही व्हावी आणि पाण्याची लाईन टाकण्यात यावी.

**श्री. नामदेवराव मानकापे :** मी विचारलेल्या दादा कॉलनी,दत्तनगर,आणि भवानीनगर बाबत खुलासा झालेला नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** परिसर अभियांत्रिकी कार्यालयाचे नविन पाईपलाईन टाकण्याचे काम चालु असुन त्यानंतर इतर काही भागा मध्ये नविन पाईप लाईन टाकण्याचे काम हाती घेतले जाणार आहे.

**श्री. नामदेवराव मानकापे :** किती दिवसांत काम हाती घेतल्या जाईल याची माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** परिसर अभियांत्रिकी कार्यालयाकडे आम्ही तसे कळवु परंतु साधारणतः जुलै नंतर कामास प्रारंभ होईल.

**श्री. शंकर मगर :** विशेष सर्वसाधारण सभा ही पाणी पुरवठा अनाधिकृत बांधकांमा बाबत झालेली होती परंतु या इतिवृत्तात तशी विषयात नमुद केलेले नाही. त्यामुळे चर्चा केवळ पाणी पुरवठयावर होणार काय ?

**मा. महापौर :** अगोदर पाणीपुरवठा प्रश्नावर चर्चा करावी आणि नंतर अनाधिकृत बांधकाम ज्यामध्ये स्लम भागातील झोपडपट्टी धारकांना कशा प्रकारचा टॅक्स लावयचा आणि अनाधिकृत बांधकाम आहेत त्याचे बाबतीत काय निर्णय घ्यावयाचे यासाठी एक पॉलिसी तयार करणे आवश्यक आहे. तेव्हा दोन्ही वर ही चर्चा होणार आहे.

**ठराव क्र. १ :** वरील सर्व दुरुस्त्यासह दि. २८/१२/९१ व दि. ३०/१२/९१ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १/२ :** शहरातील पाणी पुरवठा बाबत चर्चा करणे.

**संवाद**

**श्री. रशिदखॉन (मामु) :.** अनधिकृत बांधकाम बाबतचा निर्णय घेतल्या नंतर मा. आयुक्त यांनी शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे.

**श्री. शंकर मगर :.** प्रशासनाने प्रस्ताव मांडलेला होता की, झोपडपट्टी भागातील नागरिकांनी टॅक्स लावुन घेतल्या नंतर त्यांनी दुसऱ्यांना घर विकले त्यावेळी नामांतर करणे बाबत नेमकी किती फिस आकारयची याबाबतचा प्रस्ताव होता त्यावर निर्णय झालेला नाही. तेंव्हा अनधिकृत बांधकाम असलेल्या ठिकाणचे बांधकाम पाडावे किंवा नाही याबाबतची काहीही चर्चा नाही. तेंव्हा नेमका विषय बाजुला पडतो आणि दुसऱ्याच विषयाला सुरुवात होते असे होता कामा नये.

**मा. महापौर :.** याबाबत आपण निर्णय घेणे योग्य राहील.

**श्री. अजिजुल्ला :.** प्रशासना तर्फे प्रस्ताव असा आलेला होता की, नामांतर फिस आपण किती आकारायची याबाबत निर्णय झालेला नाही.

**मा.महापौर :.** अनधिकृत बांधकाम आणि झोपडपट्टी येथील टॅक्स बाबत आपण दोन्हीही बाबत सर्वानुमते पॉलिसी ठरवुन निर्णय घेऊ.

**श्री. अजिजुल्ला :.** अनधिकृत बांधकाम व स्लम भागातील नामांतर प्रकरण हे दोन्हीही प्रश्न भिन्न स्वरुपाचे असुन दोघांवरचे निर्णय वेगवेगळे घ्यावे लागणार आणि प्रशासनाने सबंधित नामांतराचे दराचे नेमके आकडे सभागृहात समोर ठेवलेले नाहीत तेंव्हा सचिवाकडुन मागवावे.आणि सन १९८६ च्या जी.आर. च्या प्रति सभागृहात सदस्यांना देण्याबाबत मागणी केलेली होती ती पुरविणे आवश्यक आहे.

**श्री. शंकर मगर :.** आम्हाला शासनाचे जी.आर. वगैरेशी काहीही सबंध नाही केवळ प्रस्तावास चर्चेव्दारे मंजुरी मिळणे आवश्यक आहे. गेल्या काही महिन्या पासुन पेपरमध्ये बातमी वाचली होती की, डिसेंबर पर्यन्त पाणी पुरवठा सुरळीत होणार परंतु अद्यापही काहीही झालेले नाही. याबाबत योग्य तो खुलासा व्हावा.

**मा. महापौर :.** परिसर अभियांत्रिकी कार्यालयचे सबंधित गुत्तेदार हा मनमानी करीत होता व पळुन गेला होता त्यामुळे कामास दिरंगाई झालेली होती त्या गुत्तेदारावर चौकशी चालु आहे. परंतु तरीही टाकीचे काम पुर्ण होऊन क्रॉस कनेक्शन जोडण्याचे काम झाले असुन सिल्लेखाना पर्यन्त पाण्याचा प्रवाह सुरळीत होतो आणि शहरातील इतर भागात या टाकीतुन पाणी पुरवठा सुरळीत पणे होण्याचा प्रयत्न याव्दारे होणार आहे. थोडा फार उशीर कोणात्याही कामास लागतो त्यामुळे सर्वानी आशा बाळगावी, संतप्त होण्याचा प्रयत्न करु नये.

**श्री. शंकर मगर :** आपण आश्वासन दिलेले होते त्यामुळे मी विचारणा करीत आहे आपण असे खोटे आश्वासन का देता?

**मा. महापौर :** मी आश्वासन देतो त्याप्रमाणे काटेकोरपणे त्याची कार्यवाही होते. थोडाफार उशीर झ ाालाच असे`ल तर हरकत नाही परंतु मी किंवा तुम्ही जे काही बोलतो ती म्हणजे काळया दगडावरची रेघ नव्हे उगीचच आडकाठी येऊन विरोध करण्यात काहीच अर्थ नाही असे मला वाटते.

**श्री. शंकर मगर :.** सभागृहात जे बोलल्या जाते त्याप्रमाणे कार्यवाही होते का ? आपल्या विषयी स. सदस्य सुध्दा नाराज आहेत आणि आपण फक्त आश्वासन देवुन मोकळे होता. कामाची पुर्तता मात्र होतांना दिसत नाही याचे कारण काय ?

**मा. महापौर :.** मागील वर्षा पेक्षा या वर्षी पाण्याचा प्रश्न थोडा फार सुटलेला आहे. मी वारंवार सिडको आणि सिडकोतील डॉ. आंबेडकर नगर येथे प्रत्यक्षात जाऊन पाहणी करतो व मिटींगा घेत असतो त्यामुळे पाण्याचा प्रश्न नागरिकांना फारसा भेडसावत नाही. मागील वर्षी जसे मोर्चे वेळोवेळी निघत होते तसे या वर्षी आपल्या पाहणीत दिसुन येत नाही हे आपण विरोधी पक्ष नेता म्हणुन लक्ष द्यावे.

**श्री. शंकर मगर :.** मी सर्वत्र लक्ष देत असतो परंतु आपण पोकळ आश्वासने देऊन नागरिकांना भुलथापा देण्याचा प्रयत्न करु नका व अजुनही पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही याकडे आपण विशेष लक्ष देण्याबाबत सबंधित अधिकाऱ्यांना सुचना द्याव्यात.

**मा. महापौर :.** शहरातील पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी रु. १८/. (आठरा) कोटीची योजना आखुन सर्वत्र या बाबत कार्यवाही होत आहे आणि पाण्याचा प्रश्न काही दिवसात सुटण्याच्या मार्गावर आहे.

**श्री. बंडु प्रधान :.** यशोधरा कॉलनी व वैशालीनगर मो. हत्तेसिंगपुरा भागातील नागरिकांनी संपुर्ण बटेरमेंट चार्जेस भरलेले असून त्या ठिकाणी टेंपरवारी रिलीफ म्हणुन तिन स्टॅन्ड पोंस्ट त्वरीत देण्याची व्यवस्था व्हावी. सध्या उन्हाळा सुरु झाला असुन पाण्याचा

प्रश्न त्या नागरिकांना अत्यंत बिकट झालेला आहे. याबाबत मा. आयुक्तांनी त्वरीत मंजुरी द्यावी व या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा विकास झालेला नाही याकडे विशेष लक्ष द्यावे.

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** वैशालीनगरचे टेंडर कॉल करण्यात आलेले आहे व यशोधरा कॉलनीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन स्टॅन्ड पोस्ट साठी मा. आयुक्तांकडे प्रस्ताव मंजुरीस्तव पाठविण्यात येईल. आणि मरीमाता येथील जुन्या लाईन काढुन नविन लाईन टाकण्यात येणार आहे. पंधरा दिवसापासुन याबाबत पाहणीसाठी भेट देण्यात येत आहे. आणि मध्यवर्ती जकात नाक्या जवळील पाईप लाईनला जुन्या लाईन जोडण्यात येणार आहे.

**श्री. कचरु नवपुते :.** स.सदस्य श्री. शांताराम काळे यांनी सुचित केल्याप्रमाणे पाण्याच्या प्रश्नावर त्वरीत कार्यवाही व्हावी. त्याच प्रमाणे मागे गेले तीन वर्षा पुर्वी पाण्याचा टॅक्स वार्षिक रु. ४००/. ऐवजी रु.३००/. करण्यात आल्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर झालेला आहे त्या बाबत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी. सबंधित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे, परंतु अद्यापही काहीही निर्णय आलेला नाही. मागील महिन्यात मी मुंबईला बैठकीस गेलो असता त्या ठिकाणी मला मंत्रालयात असे सागण्यात आले की. औरंगाबाद शहराच्या पाणी पट्टी दर फार कमी असुन तो वाढविण्यात यावा. परंतु मी त्यांना या वेळी सुचित केले की, शहरात पाण्याचा प्रश्न अजुनही पाहिजे तितका सुरळीत झालेला नाही. त्यामुळे दर वाढविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मग त्यांनी पुणे महानगरपालिकेने २% दर वाढविण्याचे माझ्या निदर्शनास आणून दिले परंतु मी त्यावरही सांगितले की, शहरातील पाण्याचा प्रश्न कायमचा सुटलेला नाही. आणि त्यावरही आपण काही बजेट कमी देत असतील तरीही आम्ही दर वाढविणार नाही असे स्पष्टपणे सांगितले व पुन्हा १०% दर वाढवा आम्ही १०% अनुदान देऊत असे सांगितले परंतु त्यावरही मी नकार दिला.

**श्री. रशिदखॉन (मामू) :** औरंगाबाद महानगरपालिकेकडे रु. ४००/- वार्षिक पाणीपट्टी दर आकारला जातो त्यानुसार कार्यवाही होत नाही. आपण आमदार यांचेकडे निवेदन द्यावे तेंव्हा मंत्रालयात आमदार महोदाय ठणकावून सांगू शकतील की हा भाग मागासलेला असून त्यावर आपण विचार करावा व दर कमी करणे बाबत विचार व्हावा.

**श्री. अशोक सायन्ना :** मी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा होणार काय?

**मा. महापौर :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** येत्या ६ तारखेला सकाळी ९.०० वाजता संबंधित पडेगाव येथील टाकीचे उद्‌घाटन होणार आहे.

**श्री.** अशोक सायन्ना : मी उद्‌घाटनाची तारीख विचारीत नाही तर गेल्या तीन वर्षा पासूनचे काम का झाले नाही याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** गेल्या तीन वर्षा पासूनचे काम का झाले नाही याचे उत्तर मी देवू शकत नाही, परंतु मी सतत पाठपुरावा करून शहरातील चार टाक्याचे बांधकामासाठी भूमीपूजन होणार असून सुरुवातीला ज्या गुत्तेदारांनी टेंडर भरलेले होते त्या बाबत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी नाराजी व्यक्त केली व या गुत्तेदारांना काम दिल्यास व एखादी टाकी फुटल्यास मी जबाबदार राहणार नाही असे सुचित केले. तेंव्हा मीच सांगितले की, आपल्याला हे काम करावयाचे असून हलगतर्जीपणा करावाचा नाही. करिता समजावून सांगितले तेंव्हा टेंडर रिकॉल करून हर्सूल येथील पाण्याच्या टाकीचे भूमीपूजनाचा कार्यक्रम पार पडलेला आहे. आता तीन टाक्या बांधकामाचे येत्या ६ मे ला भूमीपूजन होणार आहे.

**श्री. अशोक सायन्ना :** तीन टाक्या कोणत्या त्याचे उद्‌घाटन झालेले आहे. याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** पडेगाव कत्तलखाणा येथील एक टाकी तर मिटमिटा येथील पार्वतीनगर येथे बांधावयाची नवीन टाकी तर सिध्दार्थ गार्डन मध्ये बांधावयाची एक टाकी अशा तीन टाक्याचे भूमीपूजन येत्या सहा तारखेला होणार आहे.

**श्री. अशोक सायन्ना :** आणि मी गेल्या दोन वर्षा पुर्वी पडेगाव कत्तलखाना येथे पाण्याची टाकी बांधण्याबाबत मंजुरी मिळवीली त्याचे काय झाले ?

**मा.महापौर :** त्याचे काहीही झालेले नाही. मी स्वतः पुढाकार घेऊन या कामास चालना दिलेली आहे. व त्यावेळी टेंन्डर कॉल करण्यास काही अडचणी आलेल्या आहेत.

**श्री. अशोक सायन्ना :** टेन्डर कॉल करण्यात अडचणी येण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सदरची बैठक ही पाणी पुरवठयाची असुन इतिवृत्त कायम करण्यासाठी होत आहे. परंतु शहरातील विकासाचे कामे यामध्ये होत नाही हे दिसून येते तेंव्हा मा. महापौर आपण प्रत्येक प्रश्नाचे उत्तर न देता सबंधित अधिकाऱ्यांनी उत्तर देण्यास सागावे असे मला वाटते.

**मा. महापौर :.** ठिक आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (पाणी पुरवठा) :.** काही तांत्रिक अडचणी पडेगाव येथील टाकी बांधकामसाठी आलेल्या आहेत.

**श्री. अशोक सायन्ना :.** सबंधित फाईल मला किंवा सभागृहात दाखवावी म्हणजे कया अडचणी आहेत त्या दिसुन येतील अन्यथा ही होणारी बैठक केवळ फॉरमॅलिटी पुर्ण करण्यासाठी होत आहे असे मला वाटते. मी शहरातील पाणी प्रश्ना बाबत या ठिकाणी बोलत आहे. तेंव्हा मिटमिटा येथे हापसे बसवुन देण्या बाबत सुचित केले त्या बाबत आपण काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** ठिक आहे. सबंधित फाईल मधील माहिती स. सदस्यांना देण्यात यावी तो पर्यन्त दुसऱ्या स. सदस्यांना चर्चा करण्याची संधी देण्यात यावी.

**श्री. अशोक सायन्ना :** मागील २/३ वर्षा पासुन मी सतत या बाबत सबंधित अधिकारी आणि सभागृहात बोलत आहे परंतु या बाबत काहीही कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. तर सबंधित अधिकारी लापरवाही करतात त्यामुळे या समस्या सतत वाढतात असे माझ्या निदर्शनास आलेले आहे.

**मा. महापौर :** स. सदस्यांना फाईल दाखविण्यासाठी १/२ घंटा वेळ देण्यात येतो.

**श्री. अशोक सायन्ना :** सबंधित अधिकाऱ्यांनी माहिती पडताळुन आम्हाला दाखववी.

**श्री. स.अहमद स. हसैन :** जिन्सी टाकीतुन माझ्या वार्डातील नागरिकांना पाण्याचा पुरवठा होतो. सदरील टाकी लहान असुन या भागात पुरेसा पुरवठा होत नाही. जिन्सी टाकीतील जी विद्युत पंपीग मोटर आहे ती वारंवार बिघडत असल्याने यांत्रिकी विभागाने विशेष लक्ष द्यावे परंतु या ठिकाणी यांत्रिकी काम करणारे कर्मचारी वेळेवर काम करीत नाही त्यामुळे पाण्याचा तुटवडा होतो तर यासाठी एका कर्मचाऱ्याची नेहमीसाठी निरीक्षण करण्यासाठी नेमणुक व्हावी. टाकी वरील पंप आहे तो फुटल्याने पाणी गळत असते याकडे ही लक्ष द्यावे तर तिसरे म्हणजे या ठिकाणी विद्युत लाईनवर काम करते वेळी शॉट लागत असल्याने विद्युत कर्मचारी लाईनचे व विद्युत पंपीग मोटरचे काम करण्यास घाबरतात यासाठी यावर तात्काळ इलाज करावा आणि या भागात जवळपास झोन .३ च्या अखत्यारीतील सर्वच भागांना पाणी पुरवठा होत असल्याने पाणी अपुरे पडते यासाठी नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केलेल्या आहेत. याबाबत कार्यवाही केल्यास बराच पाण्यांचा त्रास वाचेल.

**श्री. मुजिबखॉन :** माझ्या वार्डातील मो. रशिदपुरा येथील पाण्याची समस्या असुन गेल्या वर्षाभरा पासुन त्या ठिकाणी मोटर दुरुस्तीसाठी तक्रारी करीत आहे. परंतु यांत्रिकी विभागाकडुन कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या पाणी पुरवठा विभागाकडे या संदर्भात वेगळे कर्मचारी असवयास पाहिजे यांत्रिकी विभागाकडे मोटर दुरुस्तीचे कामे व्यवस्थीतरीत्या होतांना दिसुन येत नाही. तर सबंधित अधिकारी हलगर्जीपणा करतांना दिसून येतात या बाबत संबंधितांना योग्य त्या सुचना देवुन त्वरीत कार्यवाही साठी सांगावे. तर दुसरे आझम कॉलनी या ठिकाणी ६ विहिरी आहेत या विहीरी स्वच्छ करुन घेतल्यास संपुर्ण शहरास पाणीपुरवठा सुरळीत होऊ शकतो. परंतु या ठिकाणी पंर्पीग बसविण्यात आलेली नाही. मो. मकसुद व करिम कॉलनी येथील नागरिकांना पिण्याचे पाणी सुरळीत होण्यासाठी रोडवरुन पाईप लाईन प्लॉस्टिकचे टाकण्यात येत. असल्याने एका गुत्तेदाराने सांगितले या बाबत जर प्लॉस्टीकचे पाईप लाईन टाकण्यास वाहनाने फुटण्याची शक्यता आहे. तेंव्हा या बाबत सबंधित अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी. आझम कॉलनीतील एका विहिरीवर विद्युत पंप बसविण्याची सुचना गेल्या एका वर्षा पासुन होती व अंदाजपत्रक तयार करण्यात आले परंतु ती फाईलच गायब झाल्याचे समजते. अशा प्रकारचा गलथान कारभार यांत्रिकी विभागाकडे आहे. याकडे विशेष लक्ष देणे महत्वाचे आहे.

**मा.महापौर :** सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**यांत्रिकी अधिकारी :** अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

**श्री. मुजिब खॉन :** यावरुन हेच दिसुन येते की, त्या ठिकाणचा कारभार किती चोख आहे.

**मा.महापौर :** उद्याला याबाबतीत कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री. मुजिब खॉन :** माझ्या वार्डात ज्या ज्या ठिकाणी पाणी सोडण्यात येते त्या वेळा योग्य नसुन वेळेत सुरळीत पणा असणे आवश्यक आहे. पाणी सोडणारा कर्मचारी हा उध्दटपणे वागतो व त्याच्या हिशोबा प्रमाणे पाणी सोडतो हा मनमाणी कारभार करण्याबाबत मी मा. आयुक्तांकडे तक्रार केली. तेव्हा मा. आयुक्तयांनी त्यांची बदली करण्याची शिफारस केली परंतु पाणी पुरवठा विभागातील एक कर्मचारी यांनी ती बदलीची फाईल दाबुन ठेवण्याचा प्रयत्न केला असता मी विचारणा केली तेंव्हा त्यांनी ती फाईल माझ्या समोर फेकुन दिली असे ते कर्मचारी वागत असतील तर आम्हालाही तशीच पध्दत अवलंबवावी. लागेल याबाबत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांचे समक्ष हे कृत्य सबंधित कर्मचाऱ्यांनी केलेले असुन त्यांना ते नेमके नांव माहित आहे ते विचारावे.

**मा.महापौर :** अशा प्रकारे गैरवर्तणुक करणारे कर्मचारी कोण आहेत ?

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** माझ्या कक्षेत काम करणारे वरिष्ठ लिपीक, श्री. पुंड आहेत.

**मा. महापौर :.** जर तुमच्या समक्ष अशी वागणुक करीत असतील तर तुम्ही सबंधित कर्मचाऱ्यांना नोटीस का दिली नाही ? आपणास सर्व अधिकार दिलेले आहेत ना ?

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** होय.

**मा. महापौर :.** सबंधित कर्मचाऱ्यांनी लोक प्रतिनिधी सोबत कसे वागावे या बाबत शिक्षा म्हणुन नोटीस बजावुन जाब विचारण्याची कार्यवाही करावी.

**श्री. प्रकाश जावळे :.** रेल्वेस्टेशन भागात बऱ्याचशा लहान मोठया हॉटेलस आहेत. त्या हॉटेलसना पाईपलाईन वरुन नळ कनेक्शन देण्यात आलेले आहेत ते कट सद्द करण्यांत यावे अशी मागे ही मी सुचना केलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. दुसरे,रल्वेस्टेशन भागात एक नविन पाण्याची टाकी सत्यम टॉकीजच्या बाजुला बांधण्याबाबत मंजुरी मिळाली होती तथापि बांधकामास अद्यापही सुरुवात नाही याचा खुलासा व्हावा. डॉ. आंबेडकर नगर सिडको येथे मागील वेळेस मोर्चास

असे आश्वासन दिलेले होते की, त्या ठिकाणी तीन स्टॅन्ड पोस्ट बसविण्याची व्यवस्था होईल व टँकरची व्यवस्था ही होईल. परंतु एकाच स्टॅन्ड पोस्टची व्यवस्था झालेली असुन त्यालाही पाणी पुरवठा होत नाही व टॅकरनेही पाणी पुरविल्याजात नाही. हा भाग स्लम असल्याने याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे गारखेडा परिसरात १०.१५ हजाराची वस्ती असुन त्या ठिकाणी नविन पाण्याची लाईन टाकण्यात आलेली नाही त्या ठिकाणी हापसे व विहिरी आहेत ते नादुरुस्त आहेत ते चालु करण्यात आलेले नाही. या बाबत त्वरीत कार्यवाही व्हावी. माझ्या सादतनगर म्हणुन वसाहत आहे. त्या नागरिकांना नळाव्दारे पिण्याचे पाण्यासाठी पाईपलाईन टाकण्यात आलेली नाही या बाबत सबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे. आपण महापौर बनण्यापुर्वी सर्वात प्रथम शहरातील पाणी पुरवठा सुधारणे साठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिलेले होते तथापि पुर्णतः कार्यवाही झालेली नाही, याचा आम्हाला खेद वाटतो. परिसर अभियांत्रिकी कार्यालयास रु. आठरा (१८) कोटी देवुन पाणी पुरवठा शहरात सुरळीत करण्यासाठी दिलेले आहे. परंतु पाहिजे तशी प्रगती झालेली नाही.

**श्री. अजित शेळके :** मागीलसर्वसाधारण सभा दि.२६.१२.९१ च्या बैठकीत असा निर्णय सभागृहातने दिलेला होता की, स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती व झालेल्या कार्यवहीची माहिती स. सदस्यांना ५ (पाच) दिवसात देण्यात येईल. या बाबत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी तर दुसरे स्मशान भुमी,बेगमपुरा येथील निपट निरंजन टर्न जवळ पाण्याची लाईन लिकेज झालेली होती त्याबाबत गेल्या एका वर्षा पासुन सुचना करीत आहे परंतु लिकेज काढण्यात आलेले नाही या बाबत सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. तर तिसरे बेगमपुरा भागात अनधिकृत नळ कनेक्शन बरेच आहेत त्यामुळे इतर सोसायटीवाल्यांना त्रास होतो याबाबत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी तर निपट निरंजन भागात एक पाण्याची टाकी बांधलेली आहे त्याची काय परिस्थिती आहे. याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** स. सदस्यांनी सुचित केल्या प्रमाणे स. सदस्यांना (५) पाच दिवसात माहिती देण्याबाबत सुचित केले परंतु सबंधित बैठकच कोरम आभावी तहकुब झाल्याने व इतिवृत्त कायम न झाल्याने कार्यवाही होणे शक्य नाही तर बेगमपुरा भागातील नव्हे तर शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन बाबत कार्यवाही करण्यात येईल परंतु सध्या पाण्याचा प्रश्न बिकट असल्याने नागरिकांची ओरड होऊ नये. यासाठी सध्या स्थगित ठेवुन येत्या जुन महिन्या पर्यन्त अनधिकृत नळ कनेक्शन बाबत कार्यवाही करण्यात येईल. तरी ही स. सदस्यांनी आपआपल्या वार्डातील अशा प्रकारची माहिती दिल्यास दोन दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** स. सदस्यांनी विचारलेल्या स्मशान भुमीजवळील लाईन लिकेज बाबत प्रत्यक्ष स्थळी जाऊन त्यावर योग्य ती कार्यवाही त्वरीत करण्यात येईल तर निपट निरंजन येथील टाकीसाठी टाकण्यात येणारी पाईप लाईन यामध्ये बराच गॅप असुन तो गॅप कमी करुन त्वरीत बसविणे बाबत परिसर अभियांत्रिकी कार्यालयाला पत्राने कळविण्यात येईल.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** पिण्याच्या पाण्या संदर्भात आज विषय चर्चिला जात आहे आणि शहरातील अत्यावश्यक सेवा म्हणुन पाणी पुरवठयाची गणल्या जाते परंतु ही सेवा महापालिके तर्फे राबवित असतांना या विभागात काम करण्याऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे याची माहिती द्यावी. आणि दुसरे माझ्या वार्डामध्ये पाण्याचा प्रश्न सुरळीत असुन मी पाणी पुरवठा विभागाचे अभिनंदन करतो.

**श्री. अविनाश कुमावत :.** माझ्या वार्डामध्ये पाण्याचा प्रश्न चांगला आहे फक्त दोन तीन प्रश्न आहेत. इंदिरानगर गारखेडा झोपडपट्टी येथील विहिरीवर पंप बसवावा आणि जवाहर कॉलनी भागामध्ये रात्री १२.०० ला जो पाणी पुरवठा होतो तीच वेळ असावी वेळेमध्ये बदल करण्यात येऊ नये. तसेच भानुदास नगर येथील बोरींगच्या बाजुला पाण्याची टाकी तयार करण्यात यावी.

**श्री. रशिद खॉन :.** ज्युबलिपार्क येथील पाण्याच्या टाकीचे नविन बांधकाम होणार आहे. तेंव्हा ते काम कधी पर्यन्त होणार आहे. दुसरे म्हणजे या टाकीवर रजिस्टर ठेवावे व कनिष्ठ अभियंता याची दैनंदिन नेमणुक करावी, जेणे करुन कोणत्याही वेळी त्यांच्याशी संपर्क साधता येऊ शकेल. कारण हा प्रश्न गेल्या २ (दोन) वर्षा पासुन मी सतत लावुन धरत आहे की, त्या ठिकाणी दुरुध्वनी किंवा वायरलेस फिट करुन ठेवावे. शहरातील ज्या ठिकाणी स्टॅन्ड पोस्ट आहेत त्या नळाला तोटया दिसत नाही. तेंव्हा त्या ठिकाणी तोटया वेलडींग करुन बसवण्यात आणि पाण्याची सवलत देण्या बाबत विचार व्हावा. पाण्याचे बील टॅक्स सोबत देण्याबाबत पण विचार व्हावा. मा. आयुक्त यांना रु.२५/. हजाराच्या ए.१ ची कामे करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या ऐवजी रुपये एक लाख कोणत्याही कामासाठी खर्च करण्याबाबतचे अधिकार द्यावे असा तोंडी ठराव मी मांडीत आहे त्यास सर्वानुमते मंजुरी द्यावी जेणे करुन कामे लवकर होण्यास मदत होईल.

**श्री. तकीहसन खान :.** ज्या स. सदस्यांनी पाण्या विषयी सुचना मांडल्या त्या आपल्या वार्डा व्यतिरिक्त मांडलेल्या आहेत या वरुन असे दिसुन येते. की, एक दोन ठिकाणची अपवाद वगळल्यास सर्वत्र पाणीपुरवठा सुरळीत असुन किराडपुरा भागास पाण्याचा त्रास आहे. तेथील लोकांना टॅकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात यावा आणि शहागंज येथील गांधी पुतळयाजवळील छोटासा पाईप लाईन लिकेज आहे ते माझे करुन द्यावे ही विनंती.

**श्री. पिटर वंजारे, श्री. शंकर मगर :** जर शहरातील सर्वच भागात पाणी सुरळीत आहे तर ही बैठक बोलविण्याचा उद्देश काय आहे. ?

**श्री. रशिद खॉन (मामु) :.** मी मांडलेल्या ठरावा नुसार मा. आयुक्तांना ६७(३)८ अन्वये इमरजन्सी मध्ये रुपये १५ (पंधरा) लाख खर्च करण्याचे अधिकार आहेत याबाबत सर्वानुमते चर्चा करुन निर्णय घेणे योग्य राहील.

**श्री. पिटर वंजारे :.** लक्ष्मी कॉलनी भागामध्ये गेल्या दोन वर्षा पासुन सुरळीत पाणी पुरवठा होत नाही याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर :.** सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** लक्ष्मी कॉलनी भागामध्ये पाईप लाईन मधुन धोडे वैगेर वारंवार निघाल्याचे आढळुन आले आणि वॉश व्यवस्थित होत नाही. करिता तेथील पाईप लाईन पुर्णतः बदलुन नविन अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे.

**श्री. गजानन बारवाल :.** पदमपुरा भागातील आदर्शनगर गोविंदनगर आदी भागामध्ये परिसर अभियांत्रिकी कार्यालयाचा पाईपलाईन अद्यापही आलेली नाही ज्यामुळे तेथील नागरिकांना पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. तर महाराष्ट्र राज्य फायनान्स कार्पोरेशनच्या समोर एका व्यक्तीस अनधिकृत नळ दिलेला आहे त्या बाबतीत आमचे काहीही म्हणने नाही. परंतु मुख्य लाईन मधुन कनेक्शन दिल्याने इतरांना त्रास होतो याची खबरदारी घ्यावी.

**श्री. बंडु प्रधान :.** माझ्या वार्डात भिम संदेश कॉलनी ही गृहनिर्माण संस्था असुन त्याठिकाणी १/२ इंची नळ दोन घरांना जोडलेला आहे. तेंव्हा रु. ४००/- (चारशे) पाणीपट्टी आहे ती रु.२००/. (दोनशे) करुन त्यांचे रु. २००/. परत करण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर :.** ती योजना औरंगाबाद गृहनिर्माण संस्थेची असुन तसे करता येणे शक्य नाही तुम्ही सेपरेट कनेक्शन साठी मागणी करा व पैसे भरुन तुम्हाला दिल्या जाईल.

**श्री. बंडु प्रधान :.** स. सदस्य श्री. रशिद मामु यांनी मांडलेल्या ठरावा बाबत मा. आयुक्त यांना रु.एक लाख खर्च करण्याचे अधिकार प्रदान करण्यासाठी एकमताने प्रस्ताव मंजुर करावा ज्यामुळे नागरीकांचे कामे सुलभ व तातडीने होण्यास मदत होईल. अडचणी निर्माण होणार नाही. माल लगाओ माल मिलेगा देखगे वालोको क्या मिलेगा असे म्हणणारे निर्माण होणार नाही.

(यावेळी स.सदस्य श्री. रशिद मामु, चंद्रकांत खैरे, श्री. प्रकाश जावळे, रतनकुमार पंडागळे आदिनी रुपये एक लाख मा. आयुक्त यांना खर्च करण्याचे अधिकार प्रदान करण्यास मंजुरी द्यावी असे सुचित केले.)

**श्री. शांताराम काळे :.** सभागृहातील ३/४ स. सदस्यांनी कोणत्याही विषयावर निर्णय एकमताने मंजुर करण्यास सुचविल्यास तो घेणे भाग पडतो. कारण स्थायी समितीच्या प्रोसिजर मुळे बऱ्याचशा कामांना विलंब होतो. पर्यायाने जनतेची कामे तात्काळ होत नाहीत यासाठी स. सदस्यांनी सुचविलेल्या प्रस्तावास एकमताने मंजुरी मिळण्यास हरकत नाही.

**मा. महापौर :** स.सदस्याच्या भावना लक्षात घेता मा.आयुक्त यांनी रु. एक लाखाच्या कामासाठी खर्च करण्याचे अधिकार देण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन याच सभेमध्ये हा ठराव कायम करण्यात आला असे समजुन प्रस्ताव मंजुरीस्तव शासनाकडे त्वरेने पाठविण्याची कार्यवाही करावी. मा. आयुक्त यांनी त्यांचे अधिपत्याखाली काम करणारे सबंधित अधिकारी वर्गावर खर्च करण्याबाबत योग्य ते निर्बध ठेवणे आवश्यक असुन या खर्चाच्या कामी कोणत्याही प्रकारचा दुरुपयोग होणार नाही याची शाश्वती मा. आयुक्त याची स्वतः घ्यावी असे सभागृहात सुचित करण्यात येते.

**श्री. शांताराम काळे, तकीहसन खान :** प्रशासकीय कामांना गती मिळावी म्हणुन ही निर्णय घेणे महत्वाचे ठरते कारण स्थायी समितीचा आमचा विश्वास उरलेला नाही.

**श्री. चंद्रकांत खैरे :.** मागील सभेमध्ये असा प्रस्ताव मंजुर झालेला होता की, वार्षिक पाणीपट्टी रु.४००/. सरासरी आकरणी केल्या जाते त्या ऐवजी रु.३००/. करण्यात यावी. सदरचा प्रस्ताव मंजुर होऊन शासनाकडे कधी पाठविण्यात आला याची माहिती द्यावी. कारण मी मंत्रालयात वेळोवेळी महापालिकेचे विविध प्रस्तावा बाबत वारंवार विचारणा करित असतो परंतु सदरील प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे कळले नाही, दुसरे असे की, इंदिरानगर बायजीपुरा या भागातील पाईपलाईन बाबत काय कार्यवाही केली याची माहिती घावी आणि तिसरे म्हणजे पदमपुरा भागातील कर्णपुरा येथील रु. सव्वा लाखाचे नळाची लाईन टाकण्याबाबत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी. शहरातील पाण्याची समस्या अधिक चांगली करण्यासाठी रु.१८ कोटीची जी योजना आहे त्यामुळे परिसर अभियांत्रिकी कार्यालयाने ही सदरची आखणी का करावयाची याबाबत एका कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकीच्या अधिकाऱ्यां बाबत नाराजी पत्कारली व त्यांचे कडुन कामे होत नाही असा शेरा दिला तरी ही माझ्या माहिती प्रमाणे महापालिके कडील जे पाणी पुरवठा विभागात अधिकारी वर्ग आहेत त्यांनी वारंवार परिसार अभियांत्रिकी कार्यालयाचे वरिष्ठ अधिकारी श्री. दरकोंडवार व इतर अधिकारी श्री. यु.वी. देशमुख यांचेशी समक्ष संपर्क साधुन कामे करवुन घेण्याचे प्रयत्न

करावे. मी सुध्दामंत्रालयातुन अधुन मधुन विचारणा करण्यासाठी प्रयत्न करतो. यापुर्वी सुध्दा याच शहरातील पाण्याच्या प्रश्नांसाठी एका वेळेस हक्कभंग आणि दोन वेळेस लक्षवेधी सुचना मांडली होती तसेच एकदा चर्चाही केली होती परंतु ते आले नाही. यासंदर्भात सबंधित मंत्री महोदयांनी मला पत्राने उत्तर पाठविलेले आहे. यासाठी सतत पाठपुराव करण्यासाठी महापालिकेतील अधिकाऱ्यांनी वारंवार विचारणा करीत रहावे.

**मा.महापौर :.** स. सदस्य श्री. चंद्रकांत खैरे यांनी सुचित केल्याप्रमाणेयोग्य आहे. येथील अधिकाऱ्यांनी परिसर अभियांत्रिकी कार्यालयाशी सतत संपर्क ठेवण्यासाठी येत्या एक/दोन दिवसात माझ्यासकट मा.आयुक्त उपआयुक्त, विरोधी पक्ष नेता सभागृह नेता आणि आमदार व जे काही याबाबत इच्छुक असतील त्यांना बोलावुन या कामी चर्चा घडवुन आणता येईल. त्याच प्रमाणे पाईपलाईनच्या संदर्भात बऱ्याच भागात उदा. इंदिरानगर कर्णपुरा,जवाहर कॉलनी,पर्यन्त उस्मानपुरा ते ज्योतीनगर इ. बाबत १२ ठिकाणी ज्या लाईन खराब आहेत त्या ठिकाणी टाकण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. यासाठी रक्कम रु.२.७५ लाखाचे काम असुन रु.४५/. लाखाचे कामास सुरुवात झालेली आहे.

**श्री. नामदेवराव मानकापे :.** माझ्या वार्डातील ठाकुरदास व गिरणी भागामध्ये पाण्याची लाईन नाही ही वस्ती अतिशय गरीब असुन त्या ठिकाणी चार हापसे त्वरीत बसविण्याची व्यवस्था व्हावी.

**मा. महापौर :** ठिक आहे तात्पुरती व्यवस्था होणे साठी याची नोंद घ्यावी.

**श्री. चंद्रकांत खैरे :** मा.आयुक्त यांना रु एक लाख खर्च करण्याचे अधिकार प्रदान केलेल्या ठरावाची रितसर नोंद घ्यावी.

**श्री. बंडु प्रधानः** त्या प्रस्तावास अनुमोदन म्हणुन माझे नाव टाकण्यात यावे.

**श्री. रशिद मामु, श्री. प्रकाश जावळे :** या प्रस्तावास सर्वानी मिळुन एकमताने मंजुरी दिलेली आहे. केवळ प्रस्ताव मांडलेला आहे त्यास अनुमोदण सर्वाचे लाभलेले आहे असे समजावे.

**मा महापौर :** सदरील प्रस्ताव एकमताने समंत करण्यात आलेला आहे.

**श्री. रशिद मामु :** मा. आयुक्तांच्या रु.एक लाख खर्चाच्या अधिकारा बाबत सुचक मी आहे यांची नोंद घ्यावी.

**मा.महापौर :** ठिक आहे. सुचक म्हणुन स.सदस्य श्री. रशिद मामु आहेत तर अनुमोदक इतर सर्व आहेत त्यास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.

**श्री. प्रकाश जावळे :** झोपडपट्टीच्या (स्लम) संदर्भात मागील बैठकीत चर्चा झालेली होती त्याबाबत काय झाले ?

**मा. महापौर :** अगोदर पाणी पुरवठयाची चर्चा संपल्यानंतर झोपडपट्टीच्या संदर्भात चर्चा करण्यात येईल.

**श्री. अशोक सायन्ना :.** सबंधित फाईल आलेली आहे. तेंव्हा माहिती देण्यात यावी.

**मा. महापौर :** आपण स्वतःत्या फाईलची पाहणी करावी.

**श्री. बंडु प्रधान :** पाणीपुरवठा विभागात ८० कर्मचारी कामे करीत आहेत पैकी ५० कर्मचाऱ्यांना लाईनमन म्हणुन पदोन्नती मिळालेली आहे. उरलेल्या ३० कर्मचाऱ्यांना लवकरच पदोन्नती देण्या बाबत या ठिकाणी प्रस्ताव मंजुर करुन घ्यावी.

**मा. महापौर :** सदरील प्रस्ताव शासनातर्फे मांडावा जेणे करुन आर्थिक बाबतीचा प्रश्न असल्याने आपण मंजुर करुन घेतल्यास मा. आयुक्तांकडे प्रस्ताव पडुन राहतो. यापुर्वीचा प्रस्ताव असाच पडुन आहे. यासाठी तसे करणे योग्य नाही. येत्या १० तारखेला पुन्हा एक सभा आयोजित करण्यात आलेली आहे. त्या सभेमध्ये विषय मांडावा.

**श्री. मोतीराम घडामोडे :.** एन.६ सिडको मध्ये रु.१० (दहा) लाखाची काशा व्यासाची पाईपलाईन टाकणे बाबत स्थायी समितीच्या मंजुरीने कामास सुरुवात झालेली आहे. परंतु सिडको कार्यालयाने त्यांचे नविन योजने नुसार किर्लोस्कर कन्स्लटन्सी कंपनी कडुन नविन पाईप लाईन टाकण्याचे काम करणार आहे आणि ते काम रु. पंचवीस (२५) लाखाचे असुन सिडकोने महापालिकेला असे पत्र ही पाठविले आहे. की, सदरील काम सिडकोने हाती घेतले असुन आपण सुरु केलेले काम बंद पाडावे याबाबत अधिक माहिती सबंधित अधिकारी देतील.

**मा. महापौर :.** याचा खुलासा मा. आयुक्त करतील.

**मा. आयुक्त :.** सिडकोची पाणी पुरवठा योजना महापालिकेने जेंव्हा स्विकारली त्या मुलभुत अग्रीमेंट मध्ये अशी तरतुद आहे. की, सिडको मध्ये कुठल्याही प्रकारची पाण्याची नविन योजना तयार करावयाची असेल तर ती सिडकोने करावयाची आहे. त्यानंतर त्यात आणि नविन योजना करण्याचे काम सिडकोचे आहे. ते काम महापालिकेचे नाही. महापालिका फक्त पाण्याचे मेंन्टेन्स करील आणि पुरवठा करणे हा मुळ करार आहे. त्या करारनामा अन्वये ती कार्यवाही केलेली नाही. मध्यंतरीच्या काळामध्ये रु.३२/. लाखाच्या वेगवेगळया योजना सिडको मध्ये विविध ठिकाणी घेतलेल्या होत्या त्याचे एकुण पेमेंट देखील सिडकोने आपल्याला केलेले आहे. त्याच प्रमाणे रु.दहा लाखाची कामे सिडको मध्ये आपण हाती घेतलेले आहे. त्याचे पेमेंट सिडकोला मागितले असता त्याबाबत सिडकोने पत्र देवुन कळविले की, आपण योजना राबविण्याचे कारण नाही.आम्ही किर्लोस्कर कन्सलटन्सी एका नामांकित कंपनी कडुन योजना करीत असुन ती सायंटिकीक अशी योजना आहे. यामध्ये जनतेच्या अशी उपयुक्त योजना आहे किंवा यासाठी लागणारा सर्वच खर्च आम्ही देणार आहेत. या ठिकाणी विनाकारण आपण योजना राबवू नका त्याचे पेमेंट आम्ही करणार नाही त्यामुळे तात्पुरते काम थांबवावे लागलेले आहे.

**श्री. मोतीराम घडामोडे :.** त्यामुळे आपण ही योजना करणार आहोत किंवा नाही ?

**श्री. नरेंद्र पाटील :.** मा.आयुक्तांनी केलेल्या खुलाशा नुसार मला असे म्हणवयाचे आहे की,सिडको मध्ये नविन काम करावयाचे नसुन तेथील जुनी प्लॉसटीकची पाईप लाईन काढुन त्या ठिकाणी नविन टाकावयाची आहे. म्हणजे त्या ठिकाणी रिप्लेसमेंट करीत आहेत. नविन काम नाही.

**मा.आयुक्त :.** स. सदस्यांच्या सुचने नुसार रिप्लेसमेंट सुध्दा महापालिकेकडे नाही.... नाही फक्त मेंन्टेन्स आहे. सभागृहानी काय निर्णय घ्यावयाचा, तो सभागृहाचा प्रश्न आहे. परंतु फक्त मेन्टेन्सलाच महापालिका जबाबदार आहे त्यात लाईन बदलावयाची जबाबदारी महापालिकेकडे नाही.

**श्री. मोतीराम घडामोडे :.** एन.६ सिडको भागातील पाण्याचा प्रश्न गेल्या ६ वर्षा पासुनचा आहे. स. सदस्य,श्री. सावे महापौर असतांना या बाबत कार्यवाही झालेली होती. व आता रु.दहा लाखाच्या कामास प्रशसकीय मंजुरी मिळाली परंतु सिडकोच्या पत्राचा आधार घेऊन चाललेले अर्धवट पाईप लाईनचे काम प्रशासनाने थांबविलेले आहे. त्याचे पेमेंट ही करावे लागणार आहे. तेंव्हा ते अर्धवट झालेले काम थांबवु नये आणि येथील जनतेच्या जिवनाशी खेळ खेळण्याचा प्रयत्न करु नये. जर तसे काम चालु झाले नाही तर आम्हालाही २५.३० लोकांना हाताशी धरुन पुढील काय दिशा ती ठरविता येईल. पुन्हा सिडको हडको येथील नविन पाईप बदलायचा प्रशासकिय मंजुरी मिळालेली आहे.

**श्री. नरेंद्र पाटील :.** गेल्या चार वर्षा पासुन सिडको व महापालिकेचे पत्रव्यवहाराने कामे होत होते. परंतु त्यावेळी अनेक वेळा मान्यही केले की ती कामे तुम्ही करा आम्ही तुम्हाला

पैसे देतो. पुन्हा त्यांनी म्हणायचे की तुम्ही पैसे द्या आम्ही काम करतो नंतर पुन्हा म्हणाचे की तुम्ही कपडे काढा आम्ही तुम्हाला कपडे घालुन देतो हा जो महापालिकेचा मुर्खपणा आहे की, आपण तालावर नाचतो आणि स्वतःची अवकल गहाण ठेवतो या प्रकरणामध्ये असे मला स्पष्ट म्हणावयाचे आहे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** एक तर सिडकोचे नागरिक टॅक्स भरीत नाहीत आणि वरुन महानगर पालिकेला मुर्ख हा शब्द वापरायची स. सदस्य आपण आपले शब्द मागे घ्यावेत. (यावेळी इतर स. सदस्य. श्री. अविनाश कुमावत,अजिजुल्ला बेग,यांनी स. सदस्यांनी आपले शब्द मागे घेण्याबाबत सुचना केला.)

**श्री. नरेंद्र पाटील :** मी आपले शब्द मागे घेणार नाही.

**श्री. शांताराम काळे :** या संदर्भात प्रशासनाचे असे म्हणने आहे की, कामाचे पैसे यापुर्वी वेळोवेळी सिडकोने दिले परंतु आता स्पष्टपणे म्हणतो. की, आम्ही पैसे देवु शकणार नाही. म्हणुन प्रशासनाने काम बंद केलेले आहे. आम्हाला सर्व सारखेच परंतु सभागृहात पॉलिसी डिसाईड करणे महत्वाचे आहे. तसेच स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी उद्‌गारलेले शब्द अगोदर मागे घ्यावे आणि नंतरच बोलण्याची त्यांना संधी द्यावी.

**श्री. बंडु प्रधान :** सिडकोच्या नागरिकांनी अगोदर टॅक्सेस भरावे व स. सदस्यांनी माफी मागावी.

**श्री. मोतीराम घडामोडे :** माझ्या वार्डातील पाण्याचा प्रश्न चांगला आहे. परंतु हडको येथील प्रश्न सोडविण्यासाठी मी पुरवठा करित आहे.

**श्री. नरेंद्र पाटील :** मी शब्द मागे घेण्याचा प्रश्नच येत नाही.

**मा. महापौर :** स. सदस्यांनी केलेले वाक्य इतिवृत्तातुन वगळण्यात यावा.

**श्री. नरेंद्र पाटील :** जी कृती केली त्या कृतीतुनच शब्दाने बोललेलो आहे आणि ते समजणे आवश्यक आहे. पाण्याच्या प्रश्ना संदर्भात एन.६ च्या बाबतीत पुरवठा व्यवस्थित आहे.

**श्री. मोतीराम घडामोडे :** एन.७ मध्ये जशा दोन पाण्याच्या टाक्या आहेत तशाच हडकोच्या स्टेडियम जवळ पाण्याच्या नविन टाक्या बांधण्याचे पेप्रोजल तयार करावे. एन.७ ला नाही ज्यामुळे दिल्लीगेट येथील पाणी या टाकीत भरुन हडको वासियाना पुरवठा करणे सोयीचे होईल. सिडको व हडको भाग मोठा असल्याने या सिडको मध्ये एन.५,६,७,८, व ९ असे प्रभाग येतात. या ठिकाणी ५ (पाच) हापसे बसविण्याची व्यवस्था व्हावी. आणि एन.७ ला जी विहीर आहे त्यावर झाकणे बसविण्यासाठी अंदाजपत्रक तयार करावे. स. सदस्य श्री. बंडु प्रधान यांनी सुचित केल्याप्रमाणे अर्धा इंच व्यासाच्या लाईन मधुन दोन घरांना नळाचे कनेक्शन दिलेले आहे त्यांना रु.४००/. पाणीपट्टी आकारावी या ऐवजी रु.२००/. (दोनशे) आकारावी अन्यया सदरील प्रकरण कोर्टात आहे. जर या संदर्भात जर तडजोडीची भुमिका प्रशासनाची असल्यास आम्हीही तयार आहोत. तसेच ज्या प्रमाणे माझे सदस्यत्व तीन महिन्याच्या कालावधीचे संपलेले आहे.तसेच तिन सिक्युरिटी गार्डचे वार्षिक वेतनावाढ रोखण्यात येऊ नये अशी मी विनंती करतो.

**श्री. शंकर मगर :** काचा तुम्ही फोडायचे आणि शिक्षा सेक्युरिट गार्डला. त्यामुळे आपण सहानुभूती दाखवायचा प्रश्नच येत नाही.

**मा. महापौर :** ठिक आहे. या बाबत प्रशासनाने दखल घेतलेली आहे.

**श्री. चंद्रकांत खैरे :** गणेश कॉलनी येथे एक मोठी विहिर आहे त्या ठिकाणी एका आकणाची व्यवस्था व्हावी व विहिरीची साफ.सफाई करण्यात यावी जेणे करुन पाण्याचा उपयोग सर्वाना करता येईल.

**मा. महापौर :** या बाबत त्वरीत कार्यवाही होणार आहे.

**श्री. शांताराम काळे :** आपण असे आश्वासन दिलेले होते की, स्विमिंग पुल जानेवारी महिन्यात सुरु होईल परंतु अद्यापही काहीही कार्यवाही झालेली नाही.

**मा.महापौर :.** सबंधित कामाचे बाबतीत मी सबंधित अधिकाऱ्यांना दररोज सुचना देत आहे. या बाबत लवकरच कार्यवाही होणार आहे.

**श्री. अशोक सायन्ना :.** मा. आयुक्तांना खर्च करण्याचे अधिकार रुपये एक लाखाचे दिल्या बद्दल प्रथमतः अभिनंदन. पडेगाव कत्तलखाना संदर्भात मागविण्यात आलेली फाईल या ठिकाणी आली असुन सबंधित अधिकाऱ्यांना सुचना कराव्या की, कोणती तांत्रिक अडचण आल्याने काम झाले नाही याचा खुलासा व्हावा. दि.३१ मार्च ९२ पर्यन्त सबंधित गुत्तेदाराने काम करुन कार्यालयास कळविणे आवश्यक होते. तरी मुदत संपुन ही व कोणतीही परवानगी न घेता काम चालु आहे. त्यामुळे सबंधित गुत्तेदाराचा गुन्हा म्हणुन त्याला ब्लॅक लिस्ट मध्ये ठेवावे.त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करावी हे सर्व अधिकाऱ्यांच्या लापरवाहीने असे प्रकार घडतांना आपल्याला दिसुन येतात.

**मा.महापौर :.** सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** सबंधित टाकीचे बांधकामाचे गुत्तेदार सजनानी म्हणुन आहेत. त्यांनी अर्धवट काम सोडुन गेल्याने दुसरे कुणीही ते काम करावयास तयार नाहीत त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**श्री. अशोक सायन्ना :.** सबंधित अधिकाऱ्यांनी केलेला खुलासा चुकीचा असुन ते गुत्तेदाराची बाजु घेत आहेत हे यावरुन दिसुन येते आणि अधिकाऱ्यांच्या सावळा गोंधळाने कामे अधुरी पडतात. असा माझा आरोप आहे. दि. ३१ मार्च पुर्वी सबंधिताने काम करावयास पाहिजे होते तर अजुनही त्या ठिकाणी काम चालु आहे याचे कारण काय ?

**मा.महापौर :.** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा आपणास विचारलेल्या प्रश्नाची आपण व्यवस्थीत उत्तरे देत नाही याचे कारण म्हणजे ज्यावेळी आपण तेथील कामाचे टेंन्डर रिकॉल केले त्यावेळी मी आपणास सुचित केलेले होते की, गुत्तेदार श्री. सजनानी यांनी कामे देवु नका दुसऱ्या गुत्तेदाराना द्यावे. त्यावेळी तुम्ही मला होकार दिला आणि आज म्हणता श्री. सजनांनी गुत्तेदारास काम दिले.म्हणजे तुम्ही माझाही दिशाभुल केलेली आहे. यावरुन तुमच्या कामाचे स्वरुप दिसुन येते. आपण त्या गुत्तेदाराला स्पष्टपणे का सांगितले नाही. त्यांना काम का दिले आणि अर्धवट सोडण्याचे कारण काय ?

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** त्या टाकीचे काम पुर्णतः झालेले असुन आता किरकोळ काम राहिलेले आहे.

**श्री. अशोक सायन्ना :** मा. महापौर पुन्हा सबंधित अधिकारी दिशाभुल करीत आहेत. मार्च ९२ संपल्या नंतर सबंधित गंत्तेदाराने आपणास अर्ज करुन कळविले का नाही? मुदत वाढ का केली नाही. आणि तरीही काम चालुच आहे म्हणजे याचा अर्थ काय? तेंव्हा त्यांच्यावर कार्यवाही करा किंवा सबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करा.

**मा.महापौर :** गुत्तेदारास नोटीस द्यावी.

**श्री. अशोक सायन्ना :** गुत्तेदारास नोटीस बजावण्यात काहीच अर्थ नसुन सभागृहाने ठरवावे की, सबंधिता बाबत काय निर्णय घ्यावा जे की, त्यांनी मुदतवाढ करवुन घेतले नाही. आणि सहानुभुती मिळविली नाही. यासाठी त्यांचेवर काहीतरी कार्यवाही व्हावी व सध्या तेथील काम बंद पाडावे.

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** एका महिन्याचे काम असेल असे सबंधिताने सांगितले.

**मा. महापौर :** आता एका महिन्याचे काम शिल्लक असून वेळेवर काम बंद पाडल्यास पुन्हा लिगली फारमॉलिटीज तपासणीत वेळ जाण्याची शक्यता आहे.

**श्री. अजिमखॉ दादामियॉ :** सिल्लेखाना येथील कत्तलखाना येथुन हटविणे बाबत एका वर्षाचा करार करण्यात आलेला होता. आता ५/६ वर्षाचा काळ लोटलेला आहे आणि अजुनही

पडेगाव येथील सुविधा पुर्णपणे उपलब्ध झालेलया नाहीत ज्यामध्ये स्लॉटर हाऊस पाणी पुरवठा, लाईटची व्यवस्था अशा विविध कामांचा अभाव दिसुन येतो . या ठिकाणी इतका वास येतो की. तेथुन जाणाऱ्यांना वास सहन होत नाही. तेंव्हा लवकरात लवकर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**श्री. अशोक सायन्ना :** गेल्या चार वर्षा पासुनची समस्या पडेगांव कत्तलखान्याची चालु आहे. विविध कामांचे टेंन्डर काढल्या जातात. परंतु सहा महिन्याची मुदत त्या गुत्तेदाराला दिल्यास तो दोन वर्ष एका कामाला लावतो असे अनेक उदा. येथील चार फाईली वरुन दिसुन येते. आता एका कामाचे टेंन्डर मागविले त्याची मुदत नऊ महिन्याची दिलेली आहे परंतु त्यालाही अजुन दोन वर्ष लागतील म्हणजे एक.एक काम कशा पध्दतीने या महापालिकेतील अधिकाऱ्यांकडुन होते याची पडताळणी करावी आणि जर अशा प्रकारची कामे झाल्यास पडेगांव कत्तलखान्यास अजुन वेळ लागेल यासाठी येथील फाईली सर्व बंद करून सबंधित अधिकाऱ्यांच्या अनोगोंदी करभाराची चौकशी करुन त्यांना निलंबीत करावे म्हणजे सर्व कामे सुरळीत चालु शकेल व या कामी एक समिती नेमण्यात यावी.

**श्री. रशिद खॉन (मामु) :** पडेगांव कत्तलखाना संदर्भातील विविध कामांचे बाबतीत एखादा अधिकारी व त्यांचे अधिपत्याखाली एक कनिष्ठ लिपीकांची नेमणुक करण्यात यावी जेणे करुन त्या अधिकाऱ्यांना सर्व जबाबदारी सोपवुन मा. आयुक्तांशी सरळ संपर्क ठेवुन कामे होऊ शकतील.

**श्री. अशोक सायन्ना :.** अगोदर आपण असा निर्णय घ्यावा की, तेथील कामे सुरळीत का होत नाही याचे कारण काय? कोणत्याही कामास विलंब का लागतो याची तपासणी करुन निर्णय घेणे महत्वाचे आहे विनाकारण सभागृहात आश्वासन नको जसे मा. आयुक्तांना रु. एक लाखाचा खर्च करण्याचा अधिकार देण्यात एकदम निर्णय घेतला तसाच निर्णय या कामा बाबत घ्यावयास पाहिजे.

**श्री. स. अहमद स. हुसैन :** कमिटी स्थापून तिच्या कारणी चौकशी व्हावी.

**मा.महापौर :** त्यास माझी काही एक हरकत नाही परंतु सध्याचे जे काम चालु आहे ते चालुच ठेवावे व कमिटी चौकशी करेल त्यानुसार जे कुणी दोषी आढळतील त्यामध्ये गुत्तेदार असल्यास त्यांना ब्लॅक लिस्ट मध्ये ठेवावे लागेल. जर अधिकारी दोषी आढळल्यास त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. अशोक सायन्ना :** आश्वासन न देता निर्णय घ्यावा.

**मा.महापौर :** मी आपलयाला असे निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, स.सदस्य श्री. अशोक सायन्ना यांनी स्थायी समितीकडुन दबावाने ऐंशी लाखाचे अंदाजपत्रक त्यांचे वार्डाच्या कामासाठी अंदाजपत्रकात तरतुद नसतांनाही मंजुर करवुन घेतले ज्यामुळे आज त्या कामाची आजही काहीच कार्यवाही झालेली नाही. कोणत्याही दबावाने कामे होत नाही व अधिकाऱ्यांनीही ते दबावाने अंदाजपत्रक तयार केले हे सर्व वर्तमान पत्रामध्ये असलेल्या बातमी नुसार मी सांगत आहे.

**श्री. अशोक सायन्ना :** हे सर्व चुक आहेक. दिशाभुल करीत आहात महापौर साहेब आपण अधिकारी व गुत्तेदाराने कामास उशीर केल्याने आपण त्यांना पाठीशी घालीत आहात. ज्या गुत्तेदाराला ९ महिन्याचा कालवधी दिलेला आहे तो त्या कालवधी मध्ये काम पुर्ण करणार काय? की त्यांनी पुन्हा दोन वर्ष काम लांबवावे यासाठी माझे एकच मत आहे की, गेल्या चार वर्षा पासून या ठिकाणचे कामे पुर्णपणे होत नसुन कामे बंद करावे. आणि सबंधित कामाची मुदत संपुनही गुत्तेदाराने काम चालू ठेवल्याबद्दल त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. रशिद खॉन (मामु) :.** कत्तलखान्यासाठी टेंकरची व्यवस्था अपुरी पडते तेंव्हा त्या ठिकाणी ज्यादा पाण्याच्या टॅकरची व्यवस्था व्हावी. आणि एखादा कनिष्ठ अभियंत्याची

नेमणुक करण्यात यावी. ज्यामुळे कामावरील अडीअडचणी असल्यास त्या मा. आयुक्ताकडे सुचना करुन सोडविता येऊ शकेल तसेच त्याठिकाणी लाईटची व्यवस्था अपुरी असुन त्याचीही तात्काळ व्यवस्था व्हावी.

**श्री. अजिमखॉन दादामियॉ :.** कत्तलखाण्यासाठी गाडयांनी जादा व्यवस्था करण्यात यावी जेणे करुन जाण्या येण्यासाठी गाडी नसुन त्याची व्यवस्था लवकरात लवकर करण्यात यावी. तसेच स्लॉटर हाऊस येथील व्यवस्था एखादा कर्मचाऱ्याची नेमणुक करुन लक्ष ठेवण्यास सांगावे व वॉल कंपाउंट बांधण्यात यावे.

**मा.महापौर :.** स. सदस्य श्री. अशोक सायन्ना यांनी सुचित केल्या प्रमाणे मी सांगु इच्छितो की, कोणतेही काम हाती घेतल्यानंतर त्यामध्ये थोडया फार अडचणी येत असतात त्यामुळे एकदा पाणी पुरवठा विभागाने काम टाकीचे हाती घेतलेले बंद करणे शक्य नाही. जर काम बंद केले तर पुन्हा त्या कामाची सुरुवात होण्यास आणखी तीन वर्षे लागण्याची शक्यता आहे. तेंव्हा कामाची प्रोसिजर चालु रहावी आणि कमिटीची चौकशी चालु असावी. कमिटीने निर्णय दिल्यास जो कुणी दोषी आढळल्यास त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल. परंतु काम बंद पाडता कामा नये. सभागृहाने याबाबत निर्णय घेतला तर माझी काहीही हरकत नाही. स. सदस्य श्री. रशिद मामु आणि अजिमखॉन दादामियॉ यांनी सुचित केल्याप्रमाणे कत्तलखाण्यात पाण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्यामध्ये मागे पुढे होण्याची शक्यता आहे परंतु शक्यतो चार टॅकरची व्यवस्था करण्याचा आम्ही प्रयत्न करु त्याच बरोबर एका कनिष्ठ अभियंत्याची नेमणुक त्याठिकाणी करण्यात येईल. आणि तेथील कामाची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात येईल काही गाडया महापालिकेकडे अपुऱ्या पडतात त्यामुळे आताच महापालिकेने नविन गाडया खरेदी केलेल्या आहेत त्याच प्रमाणे मी मा. आयुक्तांशी आताच चर्चा केली की, कत्तलखाण्यातुन माल ने आण करण्यासाठी एका गाडीची आठ दिवसात खरेदी करण्याची कार्यवाही करावी त्यामुळे गाडीची दररोज रात्रीची त्वरीत व्यवस्था होत आहे. उरलेले काम म्हणजे तेथील लाईटची व्यवस्था अतिरिक्त शहर अभियंता यांनी जातीने लक्ष घालुन कामाची कार्यवाही करतील तर शहर अभियंता यांना आदेशीत या सभागृहात करण्यात येते की, त्यांनी त्याठिकाणी बांधकामाबाबत काय परिस्थिती आहे त्याची पाहणी करुन ताबडतोब टेंन्डर कॉल करुन कामास सुरुवात करावी. याव्दारे मला सभागृहात सांगावयाचे आहे की, शहराचे आणि इतर विकास कामा बाबत आपण प्रामाणिक पणे कामे करण्याची हिमंत ठेवावी. कोणत्याही प्रकारचे डावपेच रचुन वातावरण खराब करण्याचे कुणीही प्रयत्न करु नये. लोकाहिताची कामे आपण चांगल्या प्रकारे कसे करु याकडे सर्वानी लक्ष द्यावे.

**श्री. अशोक सायन्ना :.** मी चर्चा करीत असलेल्या मुद्दा उपस्थित व्हावा की, सबंधित गुत्तेदाराचे काम १५ दिवसासाठी बंद पाडावे आणि एक कमिटी नेमुण त्याव्दारे कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर :.** काम बंद पाडण्यास आपणांस काहीच अर्थ नसुन त्यामुळे दुसरे गुत्तेदार काम करायला तयार नसतात आणि प्रोसिजर करावयास गेले तर पुन्हा तेथील काम लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. परंतु सभागृहाने जर निर्णय घेतला तर माझी काही हरकत राहणार नाही. कोणता सजनांनी गुत्तेदार आहे. हे मला माहिती सुध्दा नाही.

**श्री. अविनाश कुमावत :.** आज पर्यन्त ज्या कमिटया स्थापन झाल्या त्या कमिटिचा निर्णय समोर कधी आला काय ? याची माहिती द्यावी.

**श्री. चंद्रकांत खैरे :.** आपण म्हणता दुसरे गुत्तेदार काम घेण्यास तयार नाहीत तर मुंबई,पुणे सारख्या वर्तमान पत्रातुन नोटीस काढावी जेणे करुन तेथील गुत्तेदार या ठिकाणी काम करण्यास तयार असतात. आपण म्हणता सजनांनी गुत्तेदार हा माहित नाही परंतु याच गुत्तेदाराने कर्णपुरा व इंदिरानगर बायजीपुरा येथील आमदार निधीची कामे घेतली व कामास विलंब करीत होता परंतु काही कार्यकर्ते यांनी त्याच्या घरी जाऊन धमकी दिल्याने फरक पडला.

**मा.महापौर :.** मार्च महिना संपुर्ण ही दोन महिन्याचा कालावधी लोटला तरीही सबंधित गुत्तेदाराने मुदतवाढ करण्यासाठी अर्ज दिलेला नाही तेंव्हा सबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना नोटीस द्यावयास पाहिजे होती.

**श्री. अशोक सायन्ना :.** दोन महिने होऊनही सबंधित गुत्तेदारास नोटीस का दिली नाही याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर :.** सबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :.** सबंधित कामाची फाईल पाहिल्या नंतर या बाबतचा खुलासा देण्यात येईल.

**श्री. चंद्रकांत खैरे, अशोक सायन्ना :** सबंधित विभाग प्रमुख्याने अशा प्रकारचा खुलासा देणे सभागृहात योग्य नसुन ते स्वतः त्या विभागाचे प्रमुख असुन त्यांना सर्व कामाची माहिती असणे आवश्यक आहे. आणि ते असे उत्तर देवुन टाळाटाळ करण्याचे प्रयत्न करीत असतील तर अशा अधिकाऱ्यांची त्वरीत बदली करण्यात यावी. मी याठिकाणी सर्व स. नगर सेवकांच्या स्वाक्षऱ्या घेवुन प्रस्ताव मांडतो व त्यास सर्वानुमते मंजुरी देवुन त्यांना त्यांच्या मुळ खात्यात पाठविण्यास शासनाकडे कळवावे. कारण सबंधित अधिकाऱ्यांची ही जबाबदारी आहे त्यांनी ती पार पाडावी.

**मा. महापौर :** सदरची फाईल उप अभियंता यांचेकडे असल्याने त्यांना त्या कामाची पुर्ण माहिती आहे आणि जर कार्यकारी अभियंता यांचे कडुन खुलासा पाहिजे असल्यास त्यांना ००.१५ मिनिटाचा अवधी फाईल पाहण्यासाठी देण्यात यावा म्हणजे खुलासा करणे सुलभ होईल.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** सभागृहात एकच प्रश्न चर्चेसाठी आहे काय ?

**श्री. अशोक सायन्ना :** आपण काही तरी निर्णय घ्यावा.

**श्री. चंद्रकांत खैरे :** स. सदस्य, अशोक सायन्ना यांनी आता पर्यन्त जीव तोडुनचर्चेत भाग घेतला व पोटतिडकोणे प्रश्न मांडीत आहेत तर त्यावर निर्णय देणे महत्वाचे आहे.

**मा. महापौर :** मी असा निर्णय देत आहे की, पडेगांव येथील पाण्याच्या टाकीचे बांधकाम संदर्भात एक कमिटी स्थापन करण्यात येत असुन त्यामध्ये सर्वश्री चंद्रकांत खैरे, अशोक सायन्ना,रशिद मामु, रतनकुमार पंडागळे, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, अतिमखॉन दादामियॉ आणि महापौर व प्रशासनातील उप आयुक्त यांचा समितीत समावेश रहणार असुन सदरील समिती शक्य तितक्या लवकर चौकशी करुन आपला अहवाल सादर करील.

**श्री. अशोक सायन्ना :.** जो पर्यन्त चौकशी पुर्ण होत नाही तो पर्यन्त बांधकामास सुरुवात होणार नाही असे सुचित करावे.

**मा. महापौर :** नाही चौकशीची प्रक्रिया चालु असावी आणि इकडे कामास बंधन घालु नये अशी माझी इच्छा आहे.

**श्री. बंडु प्रधान, श्री. प्रकाश जावळे :.** काम बंद करु नये.

**मा. महापौर :** चौकशी समितीने जर आठ दिवसात निर्णय दिला तर फारच चांगले होईल. परंतु काम बंद पाडु नये. आता ००.१० मिनिटा साठी सभा तहकुब करण्यात येते. (अंदाजे वेळ ७.५० वाजता) (सभेला सुरुवात अंदाजे ८=२० वाजता)

**श्री. चंद्रकांत खैरे :** समितीचे गठण केले त्यांनी चार दिवसात आपला निर्णय द्यावा असे ठरवावे.

**मा. महापौर :** नाही कालवधी कमी पडतो कमीत कमी १५ दिवसाचा अवधी चौकशी समितीला द्यावा.

**श्री. अशोक सायन्ना :** ठिक आहे. १५ दिवसा मध्ये समितीने अहवाल सादर करावा. परंतु ती कामाची फाईल कुणाच्या कस्टडीत राहील याची सुचना करावी.

**मा. महापौर :** चौकशी समितीने १५ दिवसात आपला निर्णय द्यावा आणि सबंधित कामाची फाईल मा.आयुक्तांकडे ठेवावी. ज्या-ज्या वेळी समितीला फाईलची गरज पडेल त्यावेळी ती मागवुन घेता येऊ शकेल व तो पर्यंत तेथील काम चालुच राहील. समितीचा निर्णय आल्यानंतर योग्य ती कार्यवाही करता येईल.

**श्री. शंकर मगर :** आता पाणी पुरवठा बाबत भरपुर चर्चा झाली आणि अनधिकृत बांधकामाबाबत आता चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**मा.महापौर :** ठिक आहे आता पाण्या बाबत भरपुर चर्चा झालेली आहे मी आता निर्णय सुचवित आहे.

१) ज्या ज्या ठिकाणी इलेक्ट्रीकल मोटार जळाल्याच्या तक्रारी स. सदस्यांनी सुचित केल्या त्याबाबत एखाद्या एजन्सीकडे दुरुस्ती साठी देण्याबाबत यांत्रिकी विभागाने कार्यवाही करावी अन्यथा सबंधित अधिकाऱ्यांनी दिरंगाई केल्यास त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

२) आजम कॉलनी येथील विहिरीवर इलेक्ट्रीक पंप बसविण्या बाबत यांत्रिकी विभाग व पाणी पुरवठा विभाग यांनी आपसात सहकार्य करुन योग्य ती कार्यवाही त्वरीत करावी.

३) गणेश कॉलनी येथील विहिरीवर लोखंडी जाळी बसविण्यात यावी.

४) इंदिरानगर बायजीपुरा येथील विहिरीवर एखाद्या एजन्सी मार्फत मोटार बसविण्याची व्यवस्था व्हावी.

५) लक्ष्मी कॉलनी येथील नविन पाण्याची पाईप लाईन त्वरीत टाकण्यात यावी.

६) इंदिरानगर बायजीपुरा व कर्णपुरा भागातील आमदार निधीतुन होत असलेल्या पाईपलाईन च्या कामाची व्यवस्था लवकर व्हावी आणि सबंधित सदस्यांना आठ दिवसात कामाची माहिती द्यावी.

७) ज्या ज्या स. सदस्यांनी आपआपल्या वार्डातील विविध तक्रारी नोंदविल्या त्या अडचणी लोकहिताच्या दृष्टीने असतील तर त्यावर सबंधित अधिकांऱ्यानी प्रत्यक्षात पाहणी करुनच कार्यवाही करावी. विनाकारण जनतेचा पैसा कुठेही खर्च करण्यात येऊ नये.

८) शहरातील पाण्याची व्यवस्था सुस्थितीत असणेसाठी स. सभासदांनी सुचित केल्याप्रमाणे त्यांनी मा. आयुक्तांकडे लेखी कळवावे त्यानुसार मा. आयुक्तांना कमीत कमी १० हापसे विविध ठिकाणी व्यवस्था करण्याची कार्यवाही करतील अशी मंजुरी देण्यात येते.

९) शहरातील विविध ठिकाणी बसविण्यात आलेले हापसे नादुरुस्त आहेत ते सर्व हापसे यांत्रिकी विभागाने नोंद करुन आठ दिवसात दुरुस्त करण्याची मोहिम हाती घ्यावी आणि या कामा मध्ये सबंधित विभागाचे हलगर्जीपणा दिसुन आल्यास त्यांचेवर मा.आयुक्त यांनी कार्यवाही करावी या मध्ये कुणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्नच येणार नाही याची कृपया नोंद द्यावी.

१०) २.४५ लाखाची पाईपलाईनची व्यवस्था शहरात विविध ठिकाणी करण्यात येणार आहे त्या बाबत त्वरीत कार्यवाही व्हावी.

११) सिडकोतील विविध ठिकाणी नविन पाईप लाईन टाकणे बाबत महापालिकेने काम हाती घेऊन बदलण्यात आलेली होती परंतु सिडकोने महापालिकेस पत्र दिल्याने ते काम महापालिकेने बंद पाडले. या पुर्वी या संदर्भात बैठक झालेली होती त्यामध्ये सिडको प्रशासक व महानगर पालिकेतील अधिकारी व काही सिडकोचे स. सदस्य उपस्थित होते त्या मध्ये असे ठरले हाते की, सिडकोतील पाईप लाईनचे काम असल्यास ते महापालिकेने करावे. त्याचा खर्च सिडको देईल परंतु आता सिडकोने पैसे न देण्याचे पत्र पाठविल्याने काम बंद पडले. परंतु याबाबत महापालिकेने कामास मंजुरी देऊन काम ४.५ लाखाचे पुर्ण केलेले आहे. तेंव्हा तेथील कामाचा

बाबतीत प्रशासनास कळविण्यात येते की, तेथील अर्धवट झालेले पाईप लाईनचे काम बंद न पाडता चालुच ठेवावे. या कामी काही अडचणी आल्यास सिडको प्रशासकाशी संपर्क साधुन तोडगा काढण्याचे प्रयत्न करण्यात येईल असे मी या बाबत आश्वासन देतो.

त्याच प्रमाणे शहरातील झोपडपट्टी व स्लम भागाचे तसेच अनधिकृत बांधकाबाबत यापुर्वी चर्चा झालेली आहे. तेंव्हा न करता खालील प्रमाणे निर्णय देण्यात येतात.

१) ज्या झोपडपट्टी भागामधील किंवा स्लम भागातील नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या घरासाठी लाईट घेण्यासाठी महापालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र प्रथमतः असणे आवश्यक असते यासाठी त्या भागासाठीच्या नागरिकांना "महापालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात यावे. याच प्रमाणे जे शहरातील स्लम भाग आहेत त्याची पाहणी करुन विविध विकासाच्या दृष्टीने स्लम घोषित करुन शासनास कळवावे.

२) शहरातील ज्या मोकळया ७५% राखीव जागेवर बांधकाम झालेले आहे. ते वगळण्यात यावे.

३) झोपडपट्टी भागातील काही नागरिक एक दुसऱ्यांना जागा/ घरे विक्री किंवा खरेदी करतात अशा बाबत सबंधित कागदपत्रे पाहुन नामांतर करुन द्यावे.

४) शहरातील काही भागातील विना परवानगी बांधकामे झालेली आहेत त्यांचे तपासणी करुन महापालिके तर्फे कर आकारणी करणेची त्वरीत कार्यवाही व्हावी.

५) तसेच सभागृहातील चर्चे अंती असे ठरले की, महापालिकेतील रक्कम रुपये एक लाखाचा खर्च करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येते आणि सदरचे इतिवृत्त याच बैठकीत कायम करण्यात यावे.

६) पडेगांव कत्तलखाना येथील पाण्याच्या टाकीचे संदर्भात एक समिती गठण करण्यात येते, त्यामध्ये सर्व श्री. स. सदस्य, चंद्रकांत खैरे ,रशिद मामु, अशोक सायन्ना, रतनकुमार पंडागळे, विरोधी पक्ष नेता, श्री. शंकर मगर, सभागृह नेता, श्री. अलफखॉन हुसैनखॉन, अजिमखान दादामियॉ आणि उप आयुक्त महानगरपालिका व महापौर इत्यादीचा समितीत समावेश असुन त्यांनी या बाबत १५ दिवसा पर्यन्त आपल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

ठराव :. प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे शहरातील पाणी पुरवठा संदर्भात पुढील प्रमाणे मंजुरी देण्यात येते.

१) ज्या काही वार्डातील इलेक्ट्रीक मोटार जळाल्याच्या तक्रारी असतील त्या एजन्सी मार्फत तात्काळ दुरुस्ती कराव्या.

२) आजम कॉलनी येथील विहिरीवर इलेक्ट्रीक पंप बसविण्याची यांत्रिकी विभाग व पाणी पुरवठा विभाग यांनी आपसात सहकार्य करणे.

३) गणेश कॉलनी येथील विहिरीवर लोखंडी जाळी बसविण्याची व्यवस्था व्हावी.

४) इंदिरानगर बायजीपुरा येथील विहिरीवर एखाद्या एजन्सी मार्फत मोटार बसविण्याची व्यवस्था व्हावी.

५) लक्ष्मी कॉलनी येथे नविन पाण्याची पाईप लाईन टाकण्याची व्यवस्था व्हावी.

६) इंदिरानगर बायजीपुरा व कर्णपुरा भागातील आमदार निधीतील होत असलेल्या पाईप लाईनच्या कामाची व्यवस्था लवकर व्हावी व सबंधितांना आठ दिवसात कामाची माहिती द्यावी.

७) विविध वार्डातील स. सदस्यांनी केलेल्या तक्रारींची नोंद होऊन प्रशासनाने त्वरीत कार्यवाही व्हावी.

८) शहरातील पाण्याची व्यवस्था सुस्थितीत असणे साठी स. सदस्यांनी सुचित केल्या प्रमाणे मा. आयुक्तांकडे लेखी कळवावे. त्यानुसार मा. आयुक्त नागरिकांचे तक्रारी व लोकहित लक्षात घेता शहरात कमीत कमी दहा नविन हापसे बसवुन देण्याची कार्यवाही करतील.

९) शहरात विविध ठिकाणी बसविण्यात आलेले हापसे नादुरुस्त आहेत त सर्व हापसे यांत्रिकी विभागाने नोंद करुन आठ दिवसात दुरुस्ती करण्याची कार्यवाही व्हावी.

१०) २.४५ लाखाची पाण्याच्या पाईप लाईनची व्यवस्था शहरात विविध ठिकाणी करण्यात येणार आह त्याची त्वरीत कार्यवाही व्हावी.

११) सिडकोतील विविध ठिकाणी नविन पाण्याची पाईप लाईन टाकणेची कामे महापालिकेने हाती घेतली होती परंतु सिडकोच्या पत्रानुसार ती सर्व कामे प्रशासनाने बंद पाडली. सदरील कामे बंद न पाडता पूर्ववत चालू करण्यात यावे.

१२) त्याप्रमाणे शहरातील झोपडपट्टी व स्लम भागातील घरांसाठी लाईट घेणेसाठी महापालिकेने "ना हरकत प्रमाणपत्र" विना अट द्यावे तसेच शहरातील प्रभागातील पाहणी करुन विविध विकास कामे करुन घेण्याच्या दृष्टीने स्लम विभागची यादी करुन शासनास कळवावे.

१३) शहरातील ज्या मोकळया असलेल्या ७५ % राखीव जागेवर बांधकामे झालेली आहेत ती अतिक्रमणातुन वगळण्यात यावे.

१४) झोपडपट्टी भागातील काही नागरिक जागा/घरे एक दुसऱ्यांना खरेदी/विक्री करतात अशा बाबतीत सबंधिताचे कागदपत्रे पाहुणच नामांतर करुन द्यावे.

१५) शहरात काही भागात विना परवानगी बांधकामे झालेली आहेत त्या सर्वांची तपासणी करुन महानगरपालिके तर्फे कर आकारणी करणे बाबत कार्यवाही व्हावी.

१६) सभागृहातील चर्चे नुसार असे ठरले की, मा. आयुक्त यांना प्रशासनाचे व लोककल्याणाचे कामासाठी रुपये एक लाख खर्च करण्याचा अधिकार देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. तसेच सदरचे इतिवृत्त याच बैठकीत कायम करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

१७) पडेगांव कत्तलखाना येथील पाण्याच्या टाकीचे संदर्भात एक समिती गठण करण्यात येते. त्यामध्ये सर्व श्री. चंद्रकांत खैरे, रशिद मामु, अशोक सायन्ना, रतनकुमार पंडागळे, शंकर मगर, आलमखॉ हुसैनखॉ, अजिमखान दादामियॉ आणि उप आयुक्त व मा.महापौर स्वतः असुन सदरील कमिटी व्दारा अहवालाची तपासणी करुन १५ (पंधरा) दिवसात आपला रिपोर्ट दाखल करावे.

या व इतिवृत्तातील इतर दुरुस्त्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी द्योषित केले.

| | |
|---|---|
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सोमवार दि.१८.५.१९९२ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**
**दिनांक १८.५.९२ रोजी सकाळी अंदाजे ११.२५ वाजता मा.महापौर,श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय याच्या अध्यक्षतेखाली मा. महापौर उपमहापौर निवडीसाठी विशेष सर्वसाधारण सभा "वदे मातरम" या गिताने सुरु झाली.**

हया सभेस मा. आयुक्त, उपआयुक्त तथा अधिकारी आणि खालील स. सदस्य उपस्थित होते.

१) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव
२) मा. श्री. यादव अशोक सायन्ना
३) मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
४) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
५) मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) मा. श्री. सोनवणे केशव काशीनाथ
८) मा. श्री. भुगरे तुळशीराम छगन
९) मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलीक
१०) मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव
११) मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
१२) मा. श्री. प्रधान बंडु गोंविदराव
१३) मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) मा. श्री. ओक जयवंत केशवराव
१५) मा. श्री. गिल इगबालसिंग प्रितमसिंग
१६) मा. श्री. वंजारे पीटर प्रभाकरराव
१७) मा. श्री. लता दलाल श्रीनिवास
१८) मा. श्री. जैस्वाल प्रदीप शिवनारायण
१९) मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२०) मा. श्री. छापरवाल रमेश नारायण
२१) मा. श्री. पालीवाल विजय गोंविदलाल
२२) मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२३) मा. श्री. डॉ. चेनकरण गणेशलाल संचेती
२४) मा. श्री. मगर शंकर जिजाराम
२५) मा. मानकापे नामदेवराव श्यामराव
२६) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
२७) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
२८) मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास
२९) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
३०) मा. श्री. अजिमखान दादामियॉ अ. रहेमान
३१) मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ
३२) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
३३) मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंत
३४) मा. श्री. प्रदिपकुमार दत्त
३५) मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन
३६) मा. श्री. गोडसे आनंद जगदीश
३७) मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम

३८) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम
३९) मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव
४०) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४१) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
४२) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल
४३) मा. श्री. नवपुते कचरु चंद्रभान

**विषय क्र. १/१ :.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) अन्वये मा. महापौर व मा. उपमहापौर यांची निवड करणे. संवाद

**संवाद**

**श्री. नामदेव मानकापे**

**श्री. अविनाश कुमावत**

**श्री. चंद्रकांत खैरे :** सभेची वेळ ११.०० ची होती परंतु अद्यापही सरु झालेली नाही वेळ जास्तीचा झालेला तेव्हा निवडणुक प्रक्रियेला सुरुवात व्हावी.

**मा. महापौर :** निवडणुकीच्या प्रक्रियेला सुरु करण्यापुर्वी सभेला कोरम पुर्ण आहे काय ?

**श्री. चंद्रकांत खैरे :** आता सभेला सुरुवात झालेला आहे आणि सभा तहकुब न करता पुढील प्रक्रिया चालु ठेवावी. आपण सभा वेळोवेळी तहकुब करु नये.

**मा.महापौर :** मी स्वतः सभा तहकूब करीत नाही परंतु सभागृहात कोरम नसल्यास नाईलाज होता म्हणून आपण काही वेळ वाट पाहू.

**चंद्रकांत खैरे :** केवळ १/२ तासासाठी सभा तहकुब करावी.

**श्री. अविनाश कुमावत :** आपण सर्वाचे महापौर आहात सर्वांना सोबत घेऊन चालावे एकदा सभेला सुरुवात झाल्यास मी कधीही सभा सोडुन पळुन जात नाही आतापर्यन्त केवळ कोरम अभावी सभा तहकुब करावी लागले हे आपल्याला ज्ञात असेलच.

**श्री. नामदेव मानकापे, श्री. शंकर मगर :**
मा. महापौर आपण पळुन जाण्याचे जे शब्द उच्चारले ते शब्द परत द्यावे आणि केवळ १/२ तासाचा अवधी देवुन पुन्हा सभेला सुरुवात करण्यात यावी.

**श्री. चंद्रकांत खैरे :** मा. महापौर आपण १/२ तासाच्या कालावधी करता सभा तहकुब करण्यात यावी परंतु सभागृहातुन आपण बाहेरजावु नये.

**मा. महापौर :** ठिक गणपुर्ती नसल्यामुळे स. सदस्य सभेसाठी येतील म्हणुन त्यांची वाट पाहण्यासाठी ही सभा सभागृहाच्या संमतीने १.०० वाजता घेण्यात येईल. (सभेला सुरुवात अंदाजे ०१.१० वाजता)

**मा. महापौर :** कोरम अभावी व गणपुर्ती दिसुन येत नाही म्हणुन ही सभा १.०० तासा करिता तहकुब करण्यात येते. सभागृहांच्या संमतीने १.०० तासानंतर सभा घेण्यात येईल. नंतरच्या सभेला सुरुवात होवुन निवडणुक प्रक्रियेला सुरुवात करण्यात येईल.(अंदाजे वेळ १.१५ वाजता) (सभेला सुरुवात अंदाजे २=१५ वाजता)

**मा. सचिव :** आता महापौर उपमहापौर पदाची निवडणुक होत आहे. तत्पुर्वी महापौर पदासाठी ज्या उमेदवांनी आपआपला नामनिर्देशन फॉर्म भरलेले आहेत त्यांची नांवे वाचुन दाखविली.

**मा.महापौर :** महापौर पदाच्या निवडणुकांसाठी ज्या-ज्या उमेदवारांनी नाव निर्देशणपत्र दाखल केलेले आहेत आणि ज्यांना फॉर्म परत (with Draw) करावयाचे आहेत त्यासाठी ठिक ३.३० पर्यंतचा वेळेचा अवधी देण्यात येतो.(अंदाजे वेळ २.२५ वाजता)(सभेला सुरुवात अंदाजे ३.४५ वाजता)

**श्री. गजाजन बारवाल :** महापौर पदाच्या निवडणुकीसाठीची फॉर्म परत (with Draw) घेण्याची वेळ संपलेली असुन आता कुणासही परवानगी देवु नये.

**मा. महापौर :** मी सभागृहाची परवानगीसाठी विनंती करित आहे की, सहा उमेदवारांना महापौर पदासाठीचे फॉर्म परत (with araw) करण्यासाठी आणलेले असुन ते स्विकरावे अन्यथा बॅलेट पेपर अधिक मोठा होईल यासाठी सर्वानुमते मंजुरी द्यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** ठिक आहे. ज्या सहा उमेदवारांचे महापौर पदाच्या निवडणुकीसाठीचे फॉर्म परत (with Draw) करण्यासाठी आणलेले आहेत ती स्विकारण्यात यावी.

**श्री. नरेंद्र पाटील :** बॅलेटपेपरवर किती उमेदवारांची नावे आहेत ती नांवे बॅलेटपेपरवर छापल्यानंतर जाहीर करावी.

**मा.महापौर :** बॅलेट पेपरवर अगोदर नांवे छापल्यास ती जास्तीची यादी हाईल करिता अगोदर फॉर्मपरत करुनच नंतर प्रोसिजरने नावे बॅलेट पेपरवरती छापल्या जातील नंतर मतदान होईल.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** महापौर पदासाठी किती उमेदवारांनी आपले फॉर्म परत केले याचाी माहिती द्यावी आणि निवडणुक प्रक्रियेला सुरुवात व्हावी.

**मा. महापौर :** सचीवांनी याबाबतची माहिती द्यावी.

**मा. सचिव :** महापौर पदासाठी एकुण २१ (एकवीस) उमेदवारांनी आपले नाम निर्देशन फॉर्म दाखल केलेले होते त्यापैकी (१०) दहा उमेदवारांनी फॉर्म परत केलेले असुन आता महापौर पदासाठी केवळ ११ (अकरा) उमेदवार आहेत त्या सर्व उमेदवारांची नांवे वाचुन दाखविली. १) सर्वश्री १) अजिम खाँ दादामियाँ २) जहागीरदार अजिज ३) जावेद हसन खान ४) जैस्वाल प्रदिप ५) नारायण मोहन ६) मिर्झा अन्वर बेग ७) मुजीब आलमशा खान ८) मोहसिन अहमद ९) यादव अशोक सायन्ना १०) स.हुसैन स. अहमद ११) संचेती चेनकरण

**मा. महापौर :** महापौर पदाच्या निवडीच्या प्रक्रिये बाबत विधी सल्लागार यांनी माहिती द्यावी.

**विधी सल्लागार :** मा. महापौर पदाच्या निवडणुकीसाठी प्रक्रिया सुरु झाली असुन नियम क्र. १९ व ४५ व ४७ अन्वये मतदान प्रक्रिया सुरु झालेली आहे. आणि आताच नामनिर्देशन फॉर्म परत घेतल्यामुळे एकुण ११ (अकरा) इच्छुक उमेदवार निवडणुकीसाठी उभे आहेत. याबाबत नियमाप्रमाणे जी तरतुद आहे ती मी सभागृहासमोर वाचुन दाखवितो. प्रत्येक स.स. एकमत देण्याचा अधिकार राहील. निवडणुकीत जर दोन्ही उमेदवार इच्छुक असतील तर त्याचेपैकी ज्या उमेदवारास जास्त मते पडतील तो निवडून आला असे घोषित करण्यात येईल निवडूकीत दोन पेक्षा अधिक उमेदवार इच्छुक असतील तर ज्या इच्छुकाला सर्वात कमी मते पडली असतील तर ते नांव वगळण्यात येईल आणि उरलेल्या इच्छुका मध्ये पुन्हा मतदान घेण्यात येईल. मा. महापौरांचे निर्णयक मत धरुन जर एखादया इच्छुकाला इतर सर्व इच्छुकांना मिळालेल्या संख्येच्या मतापेक्षा अधिक मते मिळाली असतील तर तो निवडुन आला असे घोषीत करण्यात येईल. अशा मतदानास दोन किंवा अधिक इच्छुकांनामिळालेल्या मताची संख्या त्यांच्या लगतच्या इच्छुकांपेक्षा कमी असेल तर त्याचे नाव वगळण्यात येवुन उरलेल्या इच्छुकामध्ये परत मतदान घेण्यात येईल. अशा मतदानास जर सर्व उमेदवारांना समान मते पडल्यास ही निवडणूक परत घेण्यात येईल.

**श्री. केशव सोनवणे :.** आपल्याकडे अकरा सदस्य महापौर निवडणुकीच्या रिंगणात आहेत त्यापैकी क्रमवारीने १) ला २० मते मिळाली असतील आणि २) ला १८ मते मिळाली असतील आणि किंवा (३)१६ अशा उतरत्या क्रमाराने मते मिळाल्यास तर १) आणि २) वगळुन म्हणजे या दोघात निवडणुक होऊन बाकीचे बाद ठरविले जाईल काय? याची माहिती दयावी.

**विधी सल्लागार :** नाही. यामध्ये अशी पध्दत आहे, जर ११ उमेदवारापैकी एका उमेदवाराला ३१ मते पडली. बाकीच्या सर्वानी मिळुन २९ मते पडली तर ३१ वाला निवडणुकीत निवडुन आला असे घोषित हेईल.

**श्री. केशव सोनवणे :** तशी इतिवृत्तात नोंद घ्यावी.

**मा.महापौर, मा.सचिव :** बॅलेट पेपर तयार करण्यासाठी किती कालवधी लागेल याची माहिती सचिवांनी बॅलेट पेपरवर महापौर पदासाठी उभे असलेले उमेदवाराचे नावे छापण्याच्या प्रक्रियेसाठी कमीत कमी ११/२ ते २.०० तासाचा सचिवांनी द्यावी.

**श्री. केशव सोनवणे :** दरवेळेस जो बॅलेट पेपरसाठी वेळ दिला जातो तोच वेळ देण्यात यावा.

**मा.महापौर :** (दीड तास) ११/२ तासाचा अवधी बॅलेट पेपर तयार करण्यासाठी देण्यात येतो. (अंदाजे वेळ ४.०० वाजता) (सभेला सुरुवात अंदाजे ५.३० वाजता)

**मा.महापौर :** निवडणुक प्रक्रियेला सुरुवात होत आहे. तत्पुर्वी स. सदस्यांना निवडणुकीसाठी नेमलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची नांवे सांगावी आणि पुढील कामाकाजाला सुरुवात करावी.

**मा. सचिव :.** महापौर व उपमहापौर निवडणुक प्रक्रियासाठी ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी काम पहावयाचे आहेत त्याची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) छाननी अधिकारी | १) श्री. एन.ए.वाहुळ |
| | २) श्री. जी.एम.हाशमी |
| २) मतदान अधिकारी | १) श्री. शितोळे ए.बी. |
| | २) श्री. जाधव व्ही.डी. |
| | ३) श्री. गंगावणे एम.एस. |
| ३) मतपेटीजवळ | १) जाधव गणेश |
| ४) इतिवृत्त संकलणासाठी | १) श्री. खोब्रागडे पी.के. |
| १८) | २) श्री. बाहेती एच.आर. |

त्याचप्रमाणे महापौर पदासाठी उभे असलेल्या एकुण ११ (अकरा) उमेदवारांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

१) अजिमखॉ दादामियॉ २) नारायण मोहन ३) जहागिरदार अजीज ४) जावेदहसन खॉ ५) जैस्वाल प्रदिप ६) मिर्झा अन्वर बेग ७) मुजीब आलमशा खान ८) मोहसिन अहमद ९) यादव अशोक सायन्ना १०) स. हुसेन स. अहमद ११) संचेती चेनकरण.

आता मतदान प्रक्रियेला सुरुवात होत आहे. वार्डवाईज स. सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील तेव्हा विनंती की, स. सदस्यांनी मतदानात भाग घ्यावा.

**श्री. अविनाश कुमावत :.** मतदान करण्यासाठी किती वेळ देण्यात आला याची माहिती द्यावी.

**मा. सचिव :** मतदानाकरिता एक तासाचा अवधी देण्यात यावा.

**मा.महापौर :** मतदानासाठी एक तासाचा कालावधी देण्यात येते.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** मतदानास सुरुवात होण्यापुर्वी मतदान कसे करावे या बाबत स. सदस्यांना माहिती देण्यात यावी.

**मा.महापौर :** विधी सल्लागारांनी माहिती द्यावी.

**विधी सल्लागार :** मतदान प्रक्रियेबाबत प्रत्येक स. सदस्यांना एकमत देण्याचा अधिकार राहील. निवडणुकीत दोन्हीपेक्षा अधिक इच्छुक असतील तर ज्या इच्छुकाला सर्वात कमी मते मिळाली असतील त्यांचे नाव वगळण्यात येईल. आणि उरलेल्या इच्छुकांमध्ये पुन्हा मतदान घेण्यात येईल. (सुरुवातीला मतपेटी रिकामी असल्याचे सर्वांना दाखविण्यात आले नंतर मतपेटीला मा. महापौर यांच्या स्वाक्षरीने सर्वासमोर सिल करण्यात आले.)

**मा.सचिव :** आता मतदान प्रक्रियेला सुरुवात होत आहे. वॉर्डवाईज नांवे पुकरण्यात येईल. कृपया स. सदस्यांनी नावाप्रमाणे मतदान करावे (यावेळी वॉर्ड क्र. १ ते ६० प्रमाणे नांवे पुकारण्यात आली. प्रक्रियाला सुरुवात अंदाजे ५.३५ वाजता.)

वॉर्ड क्र. १ ते ३ च्य स. सदस्यांनी मतदान केले. वॉर्ड क्र. ४ चे स. सदस्य श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग सभागृहात उपस्थित नव्हते त्यामुळे भाग घेतलेला नाही. वॉर्ड क्र. ५ ते वॉर्ड क्र. ११ चे स. सदस्यांनी मतदान केले. स. सदस्यांनी मतदान केले वॉर्ड क्र. १२ व १३ चे स. सदस्य श्री. म. अय्युब गुलाम जिलानी व मुजीब आलमशा खान मतदानास उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. १४ व १५ चे स. सदस्यांनी मतदानाचा भाग घेतला तर वॉर्ड क्र. १६ ते १९ चे स. सदस्य श्री. जावेद हसन खॉ कासीम हसन खॉ तकीहसन खॉ कासिम हसन खॉ स. अहमद एकवालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन व मिर्झा अन्वर बेग हमीद बेग हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. २० ते २२ चे स. सदस्यांनी मतदानास भाग घेतला. वॉर्ड क्र. २० ते २२ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतलावॉर्ड क्र. २३ चे स. सदस्य श्री. अब्दुल रशिद खॉ (मामु) अ.हमीदखान हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते वॉर्ड क्र. २४ ते २६ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. २७ चे स. सदस्य श्री. हाजी मोहम्मद हाफीजोद्दीन हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. २८ते ३१ चे स. सदस्यांनी भाग घेतला वॉर्ड क्र. ३२ ते ३६ चे स. सदस्य सर्वश्री. ईस्माइल अ. करीम, फैय्याज खान अहमदखान अलिम खान बेग मिर्झा कमीम बेग, मोसिन अहेमदबशीर अहेमद व स. हुसैन स. अहमद हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. ३७ ते ४० चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. व मा.महापौर यांचे सुचनेनुसार वॉर्ड क्र. ४० चे स. सदस्यांना सहकार्य करण्यास विधी सल्लागार यांना आदेश दिला. वॉर्ड क्र. ४१ चे स. सदस्य श्री. अलफखॉन हुसैनखॉ हे मतदान करण्यास उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. ४२ ते ५२ चे स. सदस्य यांनी मतदानात भाग घेतला. वॉर्ड क्र. ५३ चे स. सदस्य श्री. अजिज जहागिरदार मुख्तार अहेमद यांनी मतदानात भाग घेण्यास उपस्थित नव्हते. तर वॉर्ड क्र. ५४ ते ६० चे स. सदस्य यांनी मतदानात भाग घेतला. पुन्हा मतदानात भाग न घेणाऱ्या स. सदस्यांची नांवे पुकारण्यात आली.

**मा.महापौर :.** महापौर पदासाठी जे उमेदवार उभे आहेत त्यांचे प्रतिनिधी मत पत्रिका छाननिसाठी पाठविण्यास बाबत अर्ज सादर करावे अशी विनंती करण्यात येते.

**मा.सचिव :** मतदानात भाग न घेणाऱ्या स. सदस्यांची नावे पुन्हा पुकारण्यात आली.

**मा.सचिव :** मतदानाची वेळ संपलेली आहे (अंदाजे वेळ ६.०० ) ज्या स. सदस्यांनी मतपत्रिका छाननीच्या वेळी उभे रहाण्याबाबत प्रतिनिंधीनी अर्ज सादर केलेले आहेत त्या स. सदस्यांनी मत पत्रिका छाणणीच्या वेळी उभे राहण्याबाबत प्रतिनिंधी अर्ज सादर केलेले आहेत त्या स. सदस्यांनी मतपेटी जवळ येण्याची कृपा करावी.

(यावेळी छाणणी अधिकाऱ्यांच्या बाजुला आपआपले उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांच्या समोर मतपेटी उघडण्यात आली. छाणणी अधिकाऱ्यांनी मतपत्रिका ताब्यात घेऊन प्रत्येक मतपेटीवर मा. महापौर यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या आणि मतपत्रिका मोजणीला सुरु केली)

**मा. महापौर :** मत मोजणी संपलेली आहे. ज्या उमेदवारांना मते पडली व ज्या उमेदवारांना मते पडली नाहीत त्यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

| उमेदवारांची नावे | पडलेली मते |
|---|---|
| १) श्री. यादव अशोक सायन्ना | २२ |
| २) श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल | २१ |

| | |
|---|---|
| ३) श्री. अजिमखॉ दादामियॉ | ०० |
| ४) श्री. नारायण मोहन | ०० |
| ५) श्री. जहागिरदार अजीज | ०० |
| ६) श्री. जावेद हसन खान | ०० |
| ७) श्री. मिर्झा अन्वर बेग | ०० |
| ८) श्री. मुलिब अलमशाखान | ०० |
| ९) श्री. मोहसिन अहमद | ०० |
| १०) श्री. स. हुसैन स. अहमद | ०० |
| ११)श्री. संचेती चेनकरण | ०० |
| एकुण मते - | ४४ |
| वैध - | ४३ |
| अवैध | ०१ |

**मा. महापौर:** उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी ज्या उमेदवारांनी फॉर्म भरलेले आहेत आणि ज्यांना उमेदवारी परत घ्यावयाची आहे त्यासाठी १/२ तासाचा अवधी देण्यात येते. (अंदाजे वेळ ७.२५)

**मा. सचिव :** उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी एकुण १९ (एकोणीस) उमेदवार उभे असुन ती पुढील प्रमाणे.

१) श्री. अजितकुमार शेळके २) अजीम खॉ दादामियॉ ३) अब्दुल रशिद खान (मामु) ४) कवडे शिवाजी ५) गाडे गंगाधर ६) छापरवाल रमेश ७) जावळे प्रकाश ८) दत्त प्रदिपकुमार ९) नवपुते कचरु १०) परदेशी सुभाष ११) पंडागळे रतनकुमार १२) फैय्याज खान अहमदखान १३) तुळशीराम छगन १४) म. अय्युब गुलाम जिलानी १५) मिर्झा अन्वर बेग १६) मोहसिन अहेमद १७) वंजारे पीटर १८) स. अहमद एकबालुद्दीन १९) सोनवणे केशव.(सभेला सुरुवात अंदाजे ८.२५ वाजता)

**मा. महापौर :** उपमहापौर पदासाठी ज्यांनी उमेदवारी अर्ज भरलेले आहेत ते फॉर्म परत घेण्याची वेळ आता संपलेली असुन आता किती उमेदवार आहेत याची माहिती द्यावी.

**मा. सचिव :** उप महापौर पदासाठी एकुण १९ उमेदवारांनी अर्ज भरलेले होते पैकी ११ (अकरा) उमेदवारांनी आपआपले अर्ज परत घेतलेले आहेत आता ८ (आठ) उमेदवाराचे फॉर्म शिल्लक आहेत. ती पुढील प्रमाणे सर्वश्री. १) अजिमखॉ दादामियॉ २) अब्दुल रशिद खान (मामु) ३) नवपुते कचरु ४) फैय्याज खान अहेमद खान ५) म. अय्युब गुलाब जिलानी ६) मिर्झा अन्वर बेग ७) मोहसिन अहेमद ८) स. अहमद इकबालुद्दीन

**मा. महापौर :** ठिक आहे. आता बॅलेट पेपर तयार करण्यासाठी १/२ तासाचा अवधी देण्यात येतो. (अंदाजे वेळ ८.३५ वाजता) (सभेला सुरुवात अंदाजे ९.०५ वाजता)

**मा. महापौर :** उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी किती उमेदवार आहेत त्याची नांवे वाचुन दाखवावी आणि मतदानास सुरुवात करावी यासाठी १/२ तासाचा अवधी देण्यात येतो) (अंदाजे वेळ ९.१० वाजता)

(यावेळी मतपेटी रिकामी असल्याचे सर्वासमोर दाखवुन मा. महापौरांचे स्वाक्षर निधी पेटीला सिल करण्यात आले)

**मा. सचिव :.** उपमहापौर पदासाठी एकुण ८ (आठ) उमेदवार असुन यासाठी वॉर्डवाईज नांवे पुकारल्या जातील त्या प्रमाणे मतदानास स. सदस्यांनी भाग घ्यावा ही विनंती त्यानुसार मतदानाच्या प्रक्रियेला सुरुवात. वॉर्ड क्र. १ ते ३ चे सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. ४ चे स. सदस्य श्री. अजीजुल्ला बेग सभागृहात उपस्थित नव्हते त्यामुळे मतदानात भाग घेतला नाही. वॉर्ड क्र. ५ ते

११ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. १२ व १३ चे स. सदस्य श्री. म. अय्युब गुलाम जिलानी व मुजीब आलमशा खान हे उपस्थित नव्हते.

वॉर्ड क्र. १४ व १५ चे स. सदस्यांनी मतदानात भागघेतला तर वॉर्ड क्र. २३ चे स. सदस्य उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. २४ ते २६ चे सदस्य उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. २४ ते २६ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. वॉर्ड क्र.२७ चे स. सदस्य हे उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. २८ ते ३९ चे स. सदस्यानी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. ३२ ते ३६ चे स. सदस्य हे उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. ३७ ते ४० चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला मा. महापौर याच्या सुचनेनुसार विधी सल्लागार यांनी स. सदस्य श्री. सुग्रीम रिडलान यांना सहकार्य करण्यास गेले वॉर्ड क्र. ४१ चे स. सदस्य श्री. अलफखान हुसैनखान उपस्थित नव्हते. वॉर्ड क्र. ४२ ते ५२ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला. तर वॉर्ड क्र. ५३ चे स. सदस्य श्री. जहागिरदार अजिज हे उपस्थित नव्हते. तर वॉर्ड क्र. ५४ ते ६० चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला अशा प्रकारे मतदानाची प्रक्रिया संपली (नंतर पुन्हा मतदानात भाग न घेण्याऱ्या स. सदस्यांची नांवे पुकारण्यात आली.)

**मा.महापौर, मा. सचिव :** उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी जे उमेदवार आहेत त्यांनी आप आपले प्रतिनिंधीची नांवे पाठविण्यासाठी अर्ज सादर करावे. (यावेळी प्रतिनिंधीनी अर्ज सादर केल्यानुसार मतपत्रिका छाननी अधिकारी यांचे बाजुला उभे राहीली मतपेटी छाननी अधिकारी यांचे समोर इच्छुक त्या पत्रिका ताब्यात घेतल्या व मा. महापौरांच्या मतपत्रिकेवर आणि स्वाक्षऱ्या करुन मतपत्रिका मोजणीला प्रारंभ झाला)

**मा. महापौर :** मत मोजणी संपलेली आहे. ज्या उमेदवारांना मते पडली त्यांची नांवे पुढीलप्रमाणे आहे.

| उमेदवारांची नावे | पडलेली मते |
|---|---|
| सर्वश्री. १) श्री. अजिमखॉ दादामियॉ | २२ |
| २) श्री.अब्दुल रशिदखान (मामु) | १ |
| ३) श्री. कचरु नवपुते | १९ |
| ४) श्री. फैय्याजखान अहेमदखान | ० |
| ५) श्री. म. अय्युब गुलाम जिलानी | ० |
| ६) श्री. मिर्झा अन्वर बेग | ० |
| ७) श्री. मोहसिन अहेमद | ० |
| ८) श्री. स. अहमद एकबालुद्दीन | ० |
| एकुण - | ४३ |
| वैधमते - | ४२ |
| अवैधमते- | ०१ |

अशा प्रकारे स. सदस्य श्री. अजिमखॉ दादामियॉ २२ विरुध्द १९ मतांनी उपमहापौर पदी निवडुन आलेले आहेत आणि स. सदस्य श्री. कचरु नवपुते या मतदानाबाबत जी आक्षेप घेतलेला आहे त्याबाबत कायदयाप्रमाणे आणि विधी सल्लागार याचेशी सल्ला घेऊनच प्रकरण निकाली काढण्यात येते.

"जन गण मन" राष्ट्रगीताने सभा संपली

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका.औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |